Six months ........3 " 8 as.
Single copy........................4 as.

किरकोळ अंकास.......................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ........०१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines...2Rs.
per line over10... 4as
Repetition derline3as

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII AKOLA MONDAY 6 MAY 1889 NO. 17

वर्ष २३ अकोला सोमवार तारीख ६ माहे मे सन १८८९ इ० अंक १७

HYDERABAD RESIDENCY ORDERS.

NOTIFICATION

No. 89.

*Dated 16th April* 1889.

An examination of candidates for admission to the Subordinate Medical Department, Berar Hospital Assistant Class, will be held at the Medical School, Chandarghat, and at Amraoti in Berar, on the 9th May 1889, and the ten candidates who obtain the highest number of marks out of those examined at both the centres will be elected students in the school. Candidates for examination at Amraoti should apply to the Sanitary Commissioner, Berar.

II. Before a candidate can present himself for examination he will be required to produce—

(1) A certificate of physical fitness signed by a Commissioned Medical officer, unless passed as fit by the Principal of the School.

(2) Satisfactory evidence that his age is between 15 and 19 years, and that he is of respectable family.

*Standard of Examination.*

III. In English a portion not exceeding thirty lines in length selected from a standard English author will be given as an exercise in dictation. Twenty errors in spelling, exclusive of technical or other unusual words, which will not be counted, will exclude the candidate from further competition. Candidates will be required to translate a short exercise from their own vernacular into English, and from English into their own vernacular.

*Native Language.*— To read and write their own vernacular with fluency and accuracy and should their own vernacular not be Urdu, they must be able to speak Urdu fairly well.

*History.*—The leading facts of the History of India.

*Geography.*—The Geography of India.

*Arithmetic.*—The first four rules of arithmetic, vulgar and decimal fractions.

IV. Students will receive the following stipends, which include hutting money:—

1st year ... ... Rs. 11 per month
2nd ,, ... ... ,, 12 ,,
3rd ,, ... ... ,, 13 ,,
4th ,, ... ... ,, 14 ,,

V. From the date of admission successful candidates will be considered Government servants, and will be required to study for four years at the Hydrabad Medical school and Hospital before passing their final examination.

VI. Hospital Assistants must engage to serve the Local Government for seven years in either the military or Civil Department. In both of these departments service will be confined to the Hydrabad Territory and the Hydrabad Assigned Districts, but should the Hydrabad Contingent ever be called upon to undertake duty outside these limits, all Hospital Assistants enrolled in the Military Department will be available for duty with that force wherever it goes.

VII. Civil Hospital Assistants will be held liable for military duty with regiments serving within the limits above mentioned in the event of necessity arising for with-drawing the Military Hospital Assistants from such regiments.

VIII. Successful candidates will, on admission into the Medical school, be required to sign the from of attestation in force in the Bengal presidency before a justice of the Peace.

IX. Appointment to the Civil or Military Department, when the candidate is pronounced duly qualified, must necessarily depend on the requirements of, and vacancies in, each department at the time; but should a candidate express a preference for either, endeavour will be made to meet his wishes on first appointment or by subsequent transfer or exchange as opportunity and the welfare of the public service may permit.

The rates of pay sanctioned for Hospital Assistants are as shown below:—

CIVIL DEPARTMENT

1st Class Hospital Assistant of above 14 year's service Rs. 55. 2nd Class Hospital Assistant of above 7 year's service Rs. 35. 3rd Class Hospital Assistant of under 7 year's service Rs. 25 Passed Medical Pupil Rs.16.

MILITARY DEPARTMENT.

1st Class Hospital Assistant of above 14 year's service Rs. 60. 2nd Class Hospital Assistant of above 7 year's service Rs. 40. 3rd Class Hospital Assistant of under 7 year's service Rs. 25. Passed Medical pupil Rs. 16.

(By order)
G. S. FORBES,
*Secretary for Berar to the Resident.*

वऱ्हाडसमाचार.

मिती वैशाख शुद्ध ६ शके १८११

## हिंदुस्थानचा गहूं.

हिंदुस्थानचा गहूं द्वीपांतरीं जातो तरी गव्हाचा व्यापार अलीकडे पंधरा वर्षांपासून खालावत चालली आहे पूर्वीप्रमाणें हिंदुस्थानच्या गव्हाचा खप देशावर चांगला होत नाहीं असा सर्वत्र बोभाटा झाल्यामुळें हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी हे येत्या बुधवारीं विलायतेंत 'इंडिया आफिस' मध्यें तिकडील मोठमोठ्या व्यापारी मंडळीची सभा भरविणार आहेत. आणि हिंदुस्थानच्या गव्हासंबंधानें व्यापार दिवसें दिवस वृद्धिंगत व्हावा एतदर्थ कोणकोणते उपाय योजिले पाहिजेत त्याचा विचार करणार आहेत. या प्रकरणांत मुंबईच्या चेम्बर आफ कामर्स नांवाच्या मंडळी कडून स्टेट सेक्रेटरीशीं पुष्कळ पत्रव्यवहार झाला तेव्हा हा एवढा बारीक विचार चालला आहे. अर्थात पुढें भरणाऱ्या सभेकडून उभयपक्षीं सुखावह असा निकाल झाला तर हिंदुस्थानच्या व्यापारास चांगली तेजी येण्याचा संभव आहे.

एका देशांतला माल परदेशावर जाऊं लागला ह्मणजे देशांतील सुबत्ता आणि आबादानी कमी कमी होत जाते असा लोकांचा अलीकडे ग्रह होऊं लागला आहे. हा सर्वथैव खरा किंवा खोटें आहे हें सांगणें पंचायतीचें आहे तरी ह्या ह्मणण्याची सत्यता पुष्कळ अंशीं हिंदुस्थानांतल्या धान्याच्या व्यापारा संबंधानें दिसून येईल. हिंदुस्थान देश धनधान्यसमृद्ध आहे ह्मणून सुखसंपत्तीचें माहेरघर आहे अशी सर्वत्र आख्या असे पण प्रस्तुतचा अनुभव उलटा येत आहे. अमल इंग्रजी सुरूं होण्यापूर्वीं हिंदुस्थानांतून धान्य बहुतक बाहेर जात नसे पण चालू शतकाच्या आरंभापासून आज तहत पाऊणशें वर्षें पुष्कळ व्यापारी हिंदुस्थानचें धान्य बाहेर नेत आहेत, आणि हा व्यापार कालक्रमानें फैलावत आहे. तसतसा देशांतला दाणागोटा मिळूनही न पडतां देशोदेशीं बाहेर जात आहे. हिंदुस्थानांत व्यापार वाढण्यास मुख्य कारणें रेल्वे तारायंत्रें वगैरे साधनें होत. ह्यांचा प्रसार होऊं लागला तसे लोकांचें दळणवळण वाढलें. कोणत्याही देशांत दुष्काळ पडो हिंदुस्थानच्या धान्यानीं भरलेलीं जहाजें चाललीं तिकडे असा नेहमीचा संप्रदाय पडला आहे. आमच्या मतें ही सर्व पुन्हा भर धान्याची विपुलता करण्याची पद्धत कांहीं विशिष्ट देशास आहेतावह होत त्या प्रमाणें आह्मांस ती भोवतें आहे. आह्मांस अभिमान वाटतो कीं हिंदुस्थानास कोणत्याही प्रसंगीं अशी पाळी येणार नाहीं कीं बाहेर देशावरून हिंदुस्थानच्या रयतेच्या पोषणासाठीं धान्य आणावें लागेल. सन १३९६ सालांतल्या दुर्गादेवी कृत दुष्काळा सारखा दुष्काळ पडला तर मात्र सर्व मनुष्याचे प्रयत्न हरतील पण असा ईश्वरी क्षोभ झाला तर त्यापासून संरक्षण करून घेण्याची मनुष्यास आशा ही नको. विलायतेंतले लोक अन्नाला महाग झाले ह्मणजे हिंदुस्थानच्या धान्याची लुट कशी होते हें थोड्यादिवसांपूर्वीं आयरलंडांत दुष्काळ पडला होता त्यावरून सर्वांच्या लक्ष्यांत आला असेल. बाकी सन १८७६ सालीं दक्षिण महाराष्ट्रांत सारखीं दोन तीन वर्षें पाऊस नसल्या मुळें पिकपाणी झालें नाहीं तेव्हां वऱ्हाड प्रांत, बेंगाल प्रांत, मध्य प्रांत इत्यादिकांनीं कंबर बांधिली आणि अवघ्या महाराष्ट्रास धान्य पुरविलें. विलायतेहून कांहीं मदत आल्याचें स्मरत नाहीं इतकेंच नव्हे तर मुंबईचे गव्हरनर सर रिचार्ड टेंपल यांनीं सहा पैशांत एकेकाचें पोट भागतें असा ठराव केला होता तो पुष्कळांच्या मनांत पूर्णपणीं खिळला आहे. आपले वाडवडील ह्मणत आले आहेत कीं, पांचपंचवीस वर्षांपूर्वीं लोकांजवळ त्राण होतें तें आतां उरलें नाहीं. लोकांस पोटापाण्याची सुद्धां दिवसानुदिवस भ्रांत पडू लागली आहे. तेव्हां पासून धान्याचे भाव जे एकदां वाढत चालले आणि अखेर कमजास्त प्रमाणानें-पीक चांगलें येवो न येवो सारखी महर्गता कायमची होऊन बसली आहे. अन्य राष्ट्रांशीं व्यापार सुरू झाल्या पासून हा तोटा होत आहे आणि देश निर्धन बनत चालला आहे हें अनेक प्रकारें खरें आहे. ह्याला उपाय इतकाच कीं हिंदुस्थानांतून जाणाऱ्या धान्यावर जकाती बाढल्या पाहिजेत पण हा उपाय सुचविणें ह्मणजे मांजराच्या गळ्यांत घंटा बांधण्या सारखें असून शिवाय राजद्रोहाचें पातक कपाळीं येण्याची मोठी भिती आहे. मानचेस्टरचा कपडा स्वस्त हिंदुस्थानांत विकतां यावा आणि देशी माल मागें पडावा ह्मणून मांचेस्टरच्या मालावर जकात नको हें ह्मणणें एका पर्यायानें युक्तीशीं जुळतें आणि सरकारास पसंत पडते त्या प्रमाणें आमच्या ह्मणण्यास रुकार मिळण्यास राणी सरकारच्या छत्रा खालीं पुष्कळ वर्षें तपश्चर्या करीत बसलें पाहिजे.

परतत हिंदुस्थानच्या गव्हाच्या संबंधानें मोठी ओरड हा आहे कीं त्यांत केरकचरा भारी असतो आणि त्या मुळें विलायतेंतील व्यापारी नाकें मुरडतात. हिंदुस्थानचा गहूं कसदार असून इतर देशांतील गव्हा पेक्षां चांगला असतो अशी सर्वत्र आख्या आहे. हें खरें तरी दुसऱ्या धान्याची मिसळ, गदळ वगैरे फार असतो ह्मणून गव्हाचा व्यापार

मार्गें मार्गें पडत चालला आहे. विलायतेंतील पुष्कळ मिलवाल्यांनीं हिंदुस्थानचा गहूं वरील कारणा मुळें वापरण्याचें सोडलें आहे. गहूं स्वच्छ करण्याचीं यंत्रें प्रत्येक लहान मोठ्या मिलवाल्या पाशीं नसतात ह्मणून त्यांना फार त्रास होतो. शेकडा दोन ह्या प्रमाणें ह्मणजे शंभर खंडी धान्यांत दोन खंडी पेक्षां अधीक इतर मिसळ असूं नये ह्मणजे आह्मास हिंदुस्थानचे गहूं पसंत आहे असा साधारणपणें तिकडील व्यापारी मंडळीचा ह्मणण्याचा आशय दिसतो. वर जरी हा व्यापार वृद्धिंगत होऊं नये असें संदिग्ध रितीनें प्रतिपादिलें आहे तरी तो सध्याच्या पद्धतींत फेरफार झाल्यास दुसऱ्या कांहीं राजकीय कारणा मुळें आपणास ग्राह्य म्हणून मानला पाहिजे म्हणून आम्ही ह्या सभेच्या निर्णयाकडे डोळे लावून बसलों आहे. तिकडे निकालास गोष्ट लागली म्हणजे या संबंधानें आणखी कांहीं गोष्टी सुचविणें नीट दिसल्यास त्या लिहूं.

## अकोला मुनसिपालिटी.

मुनसिपालिटी सारख्या स्थानिक स्वराज्याच्या संस्थेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष कोणकोणते गृहस्थ नेमावे ह्या प्रश्नाचा निकाल करणें अत्यंत महत्वाचें आहे. ही गोष्ट खरी तरी त्या प्रकरणांत विशिष्ट व्यक्तीसंबंधानें लिहितांना वर्तमानपत्रकर्त्यांनीं मोजक्या शद्बा पलीकडे आणि कार्यभागापलीकडें उहापोह करीत बसण्यांत अर्थ नसतो असें आम्ही समजतों. अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्या निवडणुकी संबंधानें वर्तमानपत्रांतून लोकांचे विचार संदिग्ध रितीनें समजलें तरी त्या पासून सभासदांस योग्य माहिती मिळते, आणि काम व्यवस्थेशीर होते. पाल्हाळिक रित्या न्यायाच्या तराजूनें निरनिराळ्या गृहस्थांची लायकी आणि योग्यता मापण, इतकेंच नव्हे तर त्या संबंधानें वर्तमानपत्रा सारख्या खुल्या दरबारांतून वाद चालविणें आह्मांस प्रशस्त वाटत नाहीं. शुद्धवऱ्हाडी आणि वैदर्भ निकरावर येऊन लढू लागले आणि उखळ्या पाखळ्या काढू लागले हें पाहून सखेदाश्चर्य वाटतें.

अलीकडे जो तो आपणांस सर्व-संग्रही-शहाणा समजतो म्हणून पुष्कळ वेळां त्याला दुसऱ्या पक्षाचें म्हणणें नीटपणें ऐकणें महत्पाप वाटतें ' शुद्धवऱ्हाडी ' च्या आक्षेपांचें विवेचन करिते वेळीं वैदर्भकारांची सर्वथैव घाईनें नजरचूक झाली आहे असें दिसतें. ' वैदर्भ ' कारांचे विचार किती ही वरष्टस्या पोक्त दिसले तरी ' शुद्धवऱ्हाडी ' कारांचे विचार आह्मांस विशेष ग्राह्य वाटतात. बहुतेक आमचें मत त्यांच्या सारखेंच आहे.

वैदर्भकर्ते ह्मणतात डेपुटी कमिशनर मुनिसिपालिटीचे प्रेसिडेंट नसावेत, आणि ' शुद्धवऱ्हाडी 'कर्ते ह्मणतात कीं डेपुटी कमिशनर असावेत. ' वैदर्भ 'कारास असें प्रतिपादल्या नंतर सुचविणें भाग पडलें कीं इतर सभासदांवर दरारा आणि रुबाब बसण्या साठीं अन्य युरोपियन प्रेसिडेंट असावेत. आणि त्यावर जबाबांत 'शुद्धवऱ्हाडी' प्रतिपादितात कीं युरोपियन पाहिजे असल्यास डेपुटी कमिशनरच बरे. निष्पक्षपात, समन्यायबुद्धी आणि आपण एकाच देवाचीं लेंकरें अहों इत्यादि गोष्टी वागणुकींत आणण्याच्या धोरणानें कोणी मुसलमान गृहस्थ व्हाईस प्रेसिडेंट असावेत ह्मणून वैदर्भकारानें कळकळीनें सूचविलें आहे त्यावर 'शुद्धवऱ्हाडी' कर्त्यांनीं आपल्या शुद्ध आणि वऱ्हाडी रितीनें वैदर्भकाराचा मनोरथ सफल होणें किंवा निष्फळ होणें सारखेंच आहे असें स्पष्ट दाखवून नसत्या उठाठेवीचा फांस वैदर्भकारास कितपत साधला आहे हेंही व्यक्त केलें आहे.

कांहीं अनुभवी आणि व्यवहारदक्ष गृहस्थांचें मत आहे कीं डेपुटी कमिशनर मुनसिपालिटीचे प्रेसिडेंट असावेत आणि तेच प्रेसिडेंट असल्यानें मुनसिपालिटीचा खरोखर फायदा आहे. असल्या प्रकारच्या वादांत जो तो आपापल्या मताचें समर्थन बाईटबरें करील तेव्हां तें मत खोटेंच आहे ह्मणून ठरविणें दुरापास्त आहे. स्थानिक स्वराज्य पद्धती पूर्तेपणीं अंमलांत आणण्यास मंडळीमध्यें हिम्मत आणि एकोपा आहे अशी खात्री होत असल्यास नेटिव प्रेसिडेंट आणि व्हाईस प्रेसिडेंट नेमणें वाईट नाहीं. ह्या जागीं निवडण्या सारखे गृहस्थ अनेक आहेत तरी राव साहेब देवराव विनायक आणि राजमान्य राजश्री विष्णु मोरेश्वर हे उमेदवार अधिक हक्कदार आहेत. शिल्लकेंत राहिलेले गृहस्थ पुष्कळ आहेत परंतु ते तरतरीत नाडेभरडे विद्वान आहेत, तेव्हां त्यांनीं सभासद या नात्यानें आणखी वर्ष दोन वर्षें काम बजावलें आणि नंतर वरील श्रेष्ठ पदव्यास आपला अधिकार दाखविला तर आम्हास विशेष आनंद वाटेल.

आतां वरील दोन गृहस्थांपैकीं रावसाहेबांस अध्यक्ष नेमावें आणि राजश्रीस उपाध्यक्ष नेमावे असें आम्ही सुचावितों. नुसती विद्वत्ता दाखविण्याची वेळ आली तर अध्वर्युपणा अण्णासाहेबाकडे जाईल परंतु मुनसिपालिटी सारख्या नेहमीच्या व्यवहारांतल्या कामांत बाबासाहेब अधीक उपयोगी पडतील अशी आमची खात्री आहे. शिवाय अण्णासाहेब सरकारचे ताबेदार आहेत आणि बाबासाहेब स्वतंत्र सुखवस्तु वकील आहेत. व वर्षांतून चार साहा महिने अण्णा साहेबांस बाहेरगांवीं फिरावें लागतें तर हे उपाध्यक्ष झाल्यानें दुय्यम प्रतीचे अधिकारी बाहेर असल्यामुळें कमी नड पडेल हें उघड आहे. कोणाच्या आंगीं कर्तृत्व कितपत आहे किंवा अधिकारांवर बाहाल असतांना कोण अधीक लोकप्रिय होतील हें पाहणें आह्मी मुनसीपालिटीच्या सभासदांवर सोंपवितो. बाबासाहेबांनीं सारखी सातवर्षें निरपेक्षबुद्धीनें लोकांचा उत्कृष्ट सेवा केली आहे तिच्या बद्दल कृतज्ञ असणें लोकांकडे आहे ह्मणजे त्यांच्या तर्फेनें मुनसिपालिटींत काम पाहणाऱ्या सभासदाकडे आहे. तेव्हां ह्या संधीस बाबासाहेबांस अध्यक्ष नेमिल्यास गुणाची पारख चांगली होईल आणि ही निवडणूक हेंच लोकांचें त्यांना मानपत्र असें आह्मी मानूं. प्रत्यक्ष अण्णासाहेब ह्या कामीं पुढारीपण घेतील आणि जेडगोळी प्रमाणें आपली खोल मसलत व धोरधोर विचार बाबासाहेबांस सांगतील तर आम्ही सर्व लोकांस भरवंशानें अश्वासन देऊं कीं अकोल्यांतील मुनसिपालिटीचें काम फारच फार चोख आणि वाखाणण्या सारखें चालेल.

मि. आर एटकीन यांस युरोपियन म्हणून अध्यक्ष नेमणें म्हणजे बळजोरीचा राम राम ठोकण्या सारखें होणार आहे खुद्द साहेब इकडे अनोळखी आहेत आणि मुनसिपालिटीच्या कामांत माहीतगार व अनुभविक नाहींत तेव्हां ते ही जागा पतकरण्यास नाखुष असणें रास्त आहे आणि आम्हीं हीं सध्यां त्यांच्यावर बोजा घालूं इच्छीत नाहीं. स्टेशनच्या संबंधानें ते मुनसीपालिटीचें काम चांगलें बजावतील अशी सर्वांची खातरी आहे त्या प्रमाणें ते सभासद या नात्यानें मागें पुढें सरणार नाहींत हें कोणी ही कबूल करील आम्हीं आरंभीच म्हटलें आहे कीं युरोपीयन कांहीं राजकीय आणि गूढ कारणा साठीं पाहिजे असल्यास डेपुटी कमिशनर पेक्षां दुसरे अधिक चांगले गृहस्थ मिळणार नाहींत. या वादग्रस्त निवडणुकीचा प्रश्न हातकरूं सभासदां पुढें उभा आहे तेव्हां स्वतांचें सामर्थ्य पाहून भिडमाड न धरतां आपलें खरें खरें मत देतील आणि प्रश्नाचा उलगडा होईल अशी आम्ही उमेद बाळगतों.

---

प्रसिद्ध मि. क्राफर्ड यांजवर लांचाचे आरोप शाबीत झाले नाहींत तेव्हां त्यांनीं स्वतांस झालेल्या खटल्याच्या खर्चाच्या रकमेबद्दल सरकारपाशीं मागणी केली आहे. मागें खंबायतच्या खटल्यांत अशा मागणी प्रमाणें खर्च सरकारांतून परत मिळाला होता तेव्हां निदान प्रस्तुत प्रसंगीं मि. क्राफर्ड साहेबांस यश मिळेल अशी त्यांच्या वकिलांची खातरी असावी असें वाटतें.

---

The Berar Samachar

MONDAY MAY 6 1889.

### THE 'LONDON TIMES' ON INDIAN FINANCE.

The 'Times' of London is aptly called the 'Thunderer' and there is no doubt that it wields an enormous power over the public mind in England. That such papers when writing on Indian topics ought to take the greatest amount of care goes without saying; for when the leader in the Times announces certain things relating to Indian matters, people in England naturally take the facts mentioned in it as incontrovertibly correct and this leads to an amount of mischief. We are not prepared to accuse the Times with any intentional mistatement of facts; but what we say is that want of due care and caution in stating facts in such a Journal as the 'Times' is in itself highly culpable. Erroneous impressions are thus created and the public mind probobly remains undeceived. We refer to the following remarks 'From many essential points of view India is not poor. Wages it is said are advancing everywhere more rapidly than the cost of living. An annual coinage of a hundred million rupees is, we are told all absorbed in the agricultural districts; and never returns. An immense revenue is collected; yet the pressure of taxation is lighter than was ever before known in the history of India. Few as are the fresh sources of revenue the old exhibit continual elasticity. No country is properly described as poor of which such statements are made without manifest inaccuracy.' These are broad conclusions of fact unsupported by facts and figures, which would be easily swallowed by the believing public in England. Mr. Dadabhai Naoroji, the celebrated statistician in India has unmistakably shown in his writings on the 'poverty of India' that India is a poor country and almost all the propositions affirmatively put forward here have been disproved by reasoning of an unexceptionable nature the facts and figures all taken generally from the records prepared by Parliament or the Government of India.

As to the rise in wages Mr. Dadabhai has shown that as a matter of fact wages have not substantially risen except in places where a surplus outlay on public works is being made or in places through which a new line of railways is being opened up. Of course both these are abnormal circumstances and cannot warrent the proposition that wages have risen throughout the land. In Berar itself there is a very slight increase in wages, but the rise in wages falls far below the rise in the price of the very prime necessities of human life. Wages are not 'advancing more rapidly than the cost of living.' Those who live amongst the agricultural and laboring classes know their utter poverty and destitution. The number of days that they earn such slightly increased wages must also be considered. And if all these circumstances are considered it will be found that wages even when they appear to be slightly increased are not at all sufficient to maintain the laboring classes. Again as regards 10 crores of rupees being absorbed in the agricultural districts and never returning that is another statement based, on we do not know what. As Mr. Dadabhai has shown, the Government requiring the payment of revenue in coin and not in kind as under the previous rulers has necessitated an enlarged currency; so that if more coin is taken up there are causes for it too, and the fact if it be one, is no index to the increasing prosperity of the nation. As to an immense revenue being collected and the pressure of taxation being lighter than in the previous history of India, Mr. Dadabhai has pointed out that the average annual income of a person in India is 20 rupees a year while he pays nearly 22 per cent on his income; in the United Kingdom itself the average annual income is 33 £ and the taxes paid 8½ per cent. Sir E. Baring has made an official admission of this shameful minimum of the income of Indian people to

be Rs. 27 a head and so it may safely be admitted as correct. What is more barefaced under these circumstances than to say that the pressure of taxation is light? People in England can afford to pay what they do because their capacity to suffer taxation is so much more. But the poor Indian! He is simply crushed by the pressure, light as it may at first sight appear; for the capacity to bear taxation which is always commensurate with one's income is so small. The income from the Salt Tax, the revenue derived from Forests and the income from the Income Tax--are all these ungrudgingly borne by the people? Has not the whole native press in India been unanimous in condemnation of these taxes? Is this evidence that the tax is all lightly borne? The present taxation, it has been pointed out, can never bear comparison with that under previous rulers. In former days the **WHOLE TAX RETURNED to the PEOPLE** back again; while nearly 18 crores fly to England every year! What country can bear such a drain? If the money remained in the country, the pressure would be hardly felt as is actually the case in Native States at present. These facts have been so often controverted and the inaccuracy and one-sidedness of the statements made by the Times has been so repeatedly pointed out that better would have been expected of the Times. Nobody denies the difficulties of the problem of Indian administration; and nobody wants to blame the Government of India more than they deserve it; but what we say is, in giving facts to the public about that Government due care and caution as lawyers call it, is not taken, it may amount to a want of *bona fides*. Let the Thunderer be only fair and that is all we want.

## THE CRAWFORD COMMISSION.

The Report of the Commission appointed to inquire into the charges against Mr. Crawford and the learned minute of Sir Raymond West the legal member of the Bombay Council thereon are now before the public who will be able to judge of the whole matter for themselves. The inquiry was such a protracted one that few of our readers if any must have gone through the proceedings from the first to the last. No doubt when it commenced several were eager to read the proceedings given in extenso in the columns of the Bombay dailies. But as day after day the same sickening events were repeated and as the charm of novelty gradually wore out few cared to read the *in extenso* proceedings the generality contenting themselves with the telegrams which, we are afraid, were often meagre and sometimes failed to correctly represent the state of facts. The consequence was that after the first few days people formed their own opinion about the result of all the cases without seeing what the evidence was or would be. The inquiry still continued to a tiresome extent and eventually the Commissioners made their Report. The verdict of the Commissioners was an official secret for the time being but like most official secrets it was what may be called an open secret. It was however believed in certain quarters that the verdict was not unanimous but was 2 against 1 for acquittal. But this belief has been now proved to be false.

On the Report being forwarded to the Bombay government the Honorable Sir Raymond West was asked to go through the proceedings and write a minute on behalf of H. E. the Governor of Bombay in Council. This he did and did in a way worthy of admiration not only by his friends but even by his foes (if he has any). The minute in question is a very lucid and ably written document and the Bombay Government can justly feel proud of having a legal member of Sir Raymond's stamp. To a clear head and a comprehensive intellect the Honorable gentleman combines an intimate acquaintence of the Bombay presidency and its people acquired by long residence among them and judicial experience as a judge of the Bombay High Court and as such is eminently fitted to sift the huge mass of evidence that was offered before the Commission on both sides.

On a dispassionate reading of the Report and the minute one cannot help siding with Sir Raymond. He has most clearly and convincingly pointed out where the Commissioners have erred and how the methods they adopted for judging of the evidence were faulty. Both the documents are too long to be quoted here but we should certainly recommend our readers to place the two side by side and peruse them together and we are sure the irresistible conclusion they will be driven to will be that in many instances Sir Raymond has brought guilt home to Mr. Crawford. We are even inclined to think that the cautious words used by the Secretary of State as to the charges of corruption are in a great measure due to that minute. Lord Cross does not trust himself to decide the question but finds a very plausible argument in the strength of the Commission. One however cannot help noting the striking change that seems to have come upon the noble Lord who only two years ago unhesitatingly set aside the opinion of two able Bombay Civilians sitting in judgment on a brother civilian such opinion having been accepted by the Bombay Government whereas the Commission in the present case consisted entirely of foreigners who knew nothing at all about the character of the sort of witnesses that came before them. But sometimes as they say fact is stranger than fiction.

The result however is that Mr. Crawford is dismissed from the service although there is nothing very pleasurable in the ignominious fall of such an eminent officer, the public ought to be so far satisfied that the Service is purged of a huge scandal.

---

Mr. J. M. Maclean M. P. has provided a delightful half-hour in the new number of the Asiatic quarterly Review for all who like racy writing. If the National Congress,--'the Home rule movement in India he calls it-- does not instantly expire it will be clearly wanting in all sense of fitness and propriety. He is as eager as a man can be that the Congress should be suppressed and calls upon the Government to do its duty. He is all against education if he could he would stop all grants-in aid of education and put the Indian clock back at least fifty years. Mr. Maclean's article is outspoken in parts, especially where he ridicules Sir John Gorst for treating the Congress seriously and for looking to more education as an antidote for present so-called evils. "More education" shrieks Mr. Maclean "why it is education which has brought you to the present discreditable condition of affairs." In his final paragraph the Anti-Indian-factory-man puts in the most clear and unmistakable terms that the Indian people have no rights, that England holds India for her (England's not India's) own interest, and urges that the sooner the humbug of holding the country for the benefit of its people abandoned the better." B. G.

---

The Governor General in Council is pleased to apply to the Hyderabad Assigned Districts the provisions of the Code of Criminal Procedure, Act X. of 1882, as modified by Acts III of 1884, X of 1886, and V of 1887, so far as the same may be applicable.

Provided that references to a Local Government shall be read as referring to the Resident at Hyderabad, and references to British India or the territories subject to a Local Government as referring to the Hyderabad Assigned Districts.

Provided also that for the purpose of facilitating the application of the provisions of the Code hereby applied any Court in the Hyderabad Assigned Districts may construe them with such alterations, not affecting the substance, as may be necessary or proper to adapt them to the matter before the Court. G. I.

---

## वऱ्हाड.

मि. सी. जे. लालकाका डेपुटी पोस्ट मास्तर जनरल यांची स्वारी आजरोजीं नागपुराकडून तपासणी साठीं येथें येणार आहे.

---

कर्नल सी. एस. लेन पोलीस, रजिस्ट्रेशन इत्यादि खात्याचे इनस्पेक्टर जनरल यांची स्वारी दीड दोन महिन्यांत पंधरा महिन्यांच्या फर्लोवर विलायतेस जाणार आहेत म्हणून ऐकतों. आमच्या प्रांता बाहेरील 'नागपुरसमाचार' कर्त्यांच्याही मतें साहेबांचे मागें मि. एफ् राईट पोलीस सुपरिनटेंडेंट हे योग्य हकदार आहेत तेव्हां या फर्लोच्या रजेंत ते इंस्पेक्टर जनरल होतील तर गुणानुरूप योजना झाली असें होईल.

---

सर्जन मेजर सी. रिटल सानिटर कमिशनर हे दोन तीन दिवसांनीं तीन महिन्यांच्या हकाच्या रजेवर विलायतेस जाणार आहेत. त्यांच्या रजेंत मध्य प्रांतांतील छिंदवाडा जिल्ह्याचे सिव्हिल सर्जन डाक्टर मारटीन यांची नेमणूक झाली आहे असें नागपूर टाईम्स वरून समजतें.

---

येथील स्पेशल असिस्टंट कमिशनर मि आबर्ड साहेब यांची रजा येत्या शुक्रवारीं संपते तेव्हां त्यांची पुढें मि. नीलिस साहेब यांच्या रजेंत वाशिमास डेपुटी कमिशनरचे जागीं नेमणूक होईल असा लोकांचा तर्क आहे.

---

महाराणी सरकारची संमती मिळाल्यास फर्लोवर असलेले डेपुटी कमिशनर कर्नल जेम्स फीट्झ्जरल्ड साहेब यांस त्यांच्या बेंगालच्या लष्करी खात्यांतून गेल्या महिन्याच्या १९ वे तारखे पासून स्वगृहीं स्वस्थपणें कालक्षेप करण्याची परवानगी मिळाली आहे.

---

रा. रा. रामचंद्र भास्कर जयवंत यवतमाळचे नायब तहशिलदार यांची मलकापुरास बदली झाली आणि त्यांच्या जागीं तेथील नायब तहशिलदार मि० रहिमतुल्ला यांस नेमिल आहे हे बरेंच दिवस आजारी ही होते ते बरें होऊन गेल्या पहिले तारखेस यवतमाळास आपल्या कामावर रुजूं झाले.

---

येथील मुनसिपालिटीनें अगरवेशी जवळ गांवांतील मोऱ्यांचें पाणी नदींत जाऊं नये म्हणून केळी वगैरे झाडांचा बगीचा नवीन केला आहे त्याप्रमाणें आणखी पुढें नदीच्या कांठावरील खिडी मध्यें अशींच झाडेंझुडें लावून घाणपाणी नदींत न जाईल अशी व्यवस्था केल्यास पुष्कळ प्रकारें लोकांस सौख्य होईल.

---

मि. एफ. राईट पोलिस सुपरिनटेंडेंट अकोला हे दोन तीन महिन्यांच्या रजेवर लौकरच जाणार आहेत. त्यांच्या रजेंत उमरावतीचे असि० पो० सुपरिनटेंडेंट मि० व्हिकाजी हें काम पाहतील असें कळतें. तेव्हां कर्नल लेन साहेब यांच्या रजेंत दुसरे कोणते गृहस्थ इन्स्पेक्टर जनरल होतील तें अद्याप समजलें नाहीं.

---

अकोला शहरांतून जाणारा इंगोली रस्ता अगदीं खराब होऊन ठिकठिकाणीं खळगे पडून दगड वर आले असल्या मुळें लोकांस मनस्वी त्रास होतो तरी इकडे आमचे एक्झीक्युटीव्ह इंजिनियर मि. टी. लाब हे लक्ष पुरवितील अशी आशा बाळगतो.

---

इनाम खात्याकडील डाक्टर मंदी हे पुष्कळ दिवसांच्या रजेवर हैदराबादेहून विलायतेस जाणार आहेत असें म्हणतात. इंग्लंडमधील कांहीं समाजापुढें तें हिंदुस्थान संबंधानें कांहीं व्याख्यानें देण्यासाठीं जात आहेत ही गोष्ट खरी असल्यास निजाम हैदराबाद आणि वऱ्हाड या दोन्ही संबंधानें बराच उल्लेख होईल असा अंदाज आहे.

---

चोहोगांव येथील सेशन मोकदम्याचा गेल्या आठवड्यांत निकाल होऊन त्यांतील अपराध्यांस पांच वर्षे सक्त मजुरीची शिक्षा झाली. मे. मेकेंझी साहेब जुडिशियल कमिशनर हे एक दिवस सेशनसाठीं राहून लागलेंच परत उमरावतीस गेले.

---

पोंच—'सोलापूर स्टांडींग कमिटीचा सन १८८८ सालचा' रिपोर्ट, आणि 'श्री भारत विजय' या दोन पुस्तकांचा आम्हीं आभार पूर्वक स्वीकार करितों. अभिप्राय पुढील अंकीं देऊं.

---

## वर्तमानसार.

महामारी प्रीत्यर्थ बळी—धर्मभोळेपणाचा कळेलोट झाली म्हणजे मनुष्याच्या प्राणांघर येऊन बेतण्यास उशीर लागत. मार्हीं थोड्या दिवसा पूर्वीं निजाम सरकारच्या हद्दींत चेनुर तालुक्यांतील एका खेडेगांवीं पटकीचा वाखा फार फैलावला तेव्हां तेथील अज्ञाणी लोकांचा पक्का समज झाला कीं कांहीं धनगरांनीं जादुटोणा केल्यामुळें हा उपद्रव झाला आहे. ह्मणून गांवकऱ्यांनी दोघा धनगऱ्यांस बेलाशक पकडलें आणि मार हाण करीत गळ्या इतक्या खड्यांत उभें पुरलें. खळग्या सभोंवार चिता पेटविली आणि त्या बिचाऱ्यांस जाळून टाकिलें. हें अघोरकृत्य करणाऱ्यांस पकडून चौकशी अंतीं अपराधाच्या मानानें कांहीजणास चौदा चौदा वर्षें आणि कांहीं जणांस सात सात वर्षें अशा शिक्षा देण्यांत आल्या आहेत.

हल्लीं जी आरमारांत भर होत आहे ती अगदीं यथायोग्य आहे व ऐर्लंडांत स्वतंत्र सरकार दिलें असतां आपल्याच पायावर आपणच धोंडा मारून घेतल्या सारखें होईल असें मुख्य प्रधान लार्ड सालिसबरी यांनीं ता. २४ मिनहु रोजीं बोलून दाखविलें. युरोपच्या एकंदर स्थितीचें अवलोकन केलें ह्मणजे यांचें हें पहिलें वाक्य यथायोग्य आहे पण दुसरें मात्र ऐर्लंड व इंग्लड यांच्यांत अधिक द्वेष उत्पन्न करणार आहे. रक्तपात न होतां आज ऐर्लंड शत्रुप्रमाणें वागेल हें मनांत देखील आणावयास नको हें खरें आहे. इंग्लंड आह्मांस आज थोडा थोडा अधिकार देत आहे, तरी हिंदुस्थानानें नेहमीं गुलामगिरी खालीं रहावें ही इंग्लंडची मूळ इच्छा असें जर आह्मी नेटिव उघड ह्मणून लागलों तर इंग्लंडाला किती बरें राग येईल? चोराच्या मनांत चांदणें ह्मणतात तें खोटें नव्हे.

नबाब मेहदीअली हा आपल्या जाग्याचा राजिनामा देत नाहीं असें आतां पायोनियरनें प्रसिद्ध केलें आहे.

मी कोणत्याही बक्षीस समारंभाला येणार नाहीं किंवा कुलांपासून मी मानपत्रें घेणार नाहीं असें करणें ह्मणजे मुलांनीं आपला वेळ व्यर्थ खर्च करण्या सारखें आहे व त्यांनीं तसें न करतां ती वेळ अभ्यासांत घालवावी असा कलकत्याचे ले. गव्हरनर सर स्टुअर्ट बेली यांनीं ठराव केला.

नवीन तऱ्हेच्या तोफा ओतण्यांत आल्या असून त्या लवकरच सरहद्दीवर पाठविण्यांत येणार आहेत.

जो बाबू नुकतांच कलकत्यास विमानारोहण करणारे मि. स्पेन्सर बरोबर वर उडाला होता त्याच बाबूनें मि. स्पेन्सर पासून एक विमान विकत घतलें असून तो इतक्यांत आपण स्वतः विमानें उडाण करणार आहे असें त्यानें प्रसिद्ध केलें आहे. धाडस असावें तर असें असावें. जो आज लाखो रुपये आमच्या देशांतुन नेत आहे ते जाऊं नयेत ह्मणून ती विद्या ग्रहण करणें फारच उत्तम पण त्या मार्गाचें अवलंबन न करितां मुद्दाम काटेरी मार्गानें जाण्याची आमच्या इकडील पुढारी ह्मणविणाऱ्यास संवयच लागून राहिली आहे.

ठा. अ.

म्युनिसिपालिटीच्या वहिवाटीस असलेली रस्त्याच्या बाजूची जागा तिला ती कमिशनर साहेबांचे परवानगी वांचून विकतां येणार नाहीं असा सरकारानें ठराव केल्याचें कळतें.

गांव— पोलीस कायद्याच्या १४, १५, व १६ कलमा प्रमाणें डि० माजिस्ट्रेटास एका पोलीस पाटलाकडील फिर्याद दुसरे पोलीस पोलीस पाटलाकडे काढून देतां येणार नाहीं असा ही एक ठराव झाला आहे.

सरकारी ठराव— सरकारी नोकरास कोणच्या ही कंपनीचें किंवा बँकेचे डायरेक्टर होण्यास सरकारची परवानगी लागत असे. तिची गरज नाहीं असे स्टेट सेक्रेटरीनीं ठरविलें आहे.

नायगरा धबधब्याचा आवाज— नायगरा धबधब्याचा अवाज विलायतेस पाठविण्याचा विचार ठरला आहे. कांहीं दिवसांपूर्वीं हें ह्मणणें अगदीं असंभाव्य झालें असतें परंतु सांप्रत एडिसनच्या अद्भुत कल्पनेच्या फोनाग्राफच्या द्वारें अवाज हा इतर पदार्थां प्रमाणें या शहरांतून त्या शहरांत नेतां येऊं लागला आहे. शास्त्रीय शोधाचा हा असामान्य प्रभाव होय!

उपयुक्त माहिती— पितळेचा गंजलेला खंडी पदार्थ तो मेणानें आणि मिठानें आरशा सारखा चकचकीत करता येतो. एका फडक्यांत मेणाचा गोळा बांधून ठेवावा. नंतर लोखंड तापवून त्यावर प्रथम त्या मेणाच्या पुरचुंडीनें चोळावें, व मग थोडयांडे मीठ घेऊन कागदानें किंवा चिंधीनें पालीस करावें

न्या० सि०

*K. B. Rele and co.s' most efficacious.*
*PREPARATIONS.*

१ धातु पौष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या ह्याच आहेत अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणानीं झालेली क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांढुरता, मनाची उदासीनता, जीर्णज्वरानें, हगवणीनें खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वप्नावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, निद्राभंग, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलास्थीतमिध्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वप्नें पडणें, हीं ह्यांच्या सेवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर टवटवी येते मज्जातंतूस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढते. ते प्रत्येकानें ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे.

२ परम्यावर मात्रीचे वस्ताद औषध.

हें बिनधोक अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात परमा किती ही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हें ही परम्यावर रामबाण आहे. किं० ०८ आणे.

४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या ह्यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तशुद्धि होऊन शक्ति येते. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध

वरील औषधा बरोबर हें वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें क्वचितच. किंमत ०८ आणे.

६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम.

दद्दा, घांदी, सर्व नव्या व जुन्या जखमा वाव इ० मिटविणारे मलम कायतें हेंच कि० ८ आणे.

७ खोकल्यावर अचुक औषध.

ह्यानें कफ सुटा पडतो, पडसे, दमा जातो, क्षयाचा, ढांग्या वशांत गुदगुली होऊन येणारे इ० खोकले अचुक बरें होतात. किं. १२ आणे.

८ तापावर रामबाण औषध.

हिंवताप, पाळीचाताप, अंतरताप, जीर्णज्वर, ह्यांवर तर हे रामबाण आहे जंगल किंवा म्यालेरियल नांवाच्या तापावर हें वस्ताद आहे. ह्यानें भूक लागते अन्न पचतें. किंमत १२ आणे.

९ अजीर्ण, अतिसार, ह्यांवर औषध.

अजीर्ण, अतिसार. संग्रणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यांत हें कधींच मागें हटलें नाहीं. किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकीटा मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांशः—

"के. बी. रेळे यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेलीं सर्व (वरील) * औषधीं मी लक्ष पुर्वक तपासून पाहिलीं. तीं फार गुणकारी असून निर्धोक आहेत.

( सही ) डाक्टर वि. वि. गोखले,
"एम. ए. एम. डी"

सूचना--अनुमानाचा कागद औषधा बरोबर असतो घाऊक घेणारास चांगलें कमिशन मिळेल. प्याकिंग व पोस्टेज शिवाय पडेल.

विशेष सूचना—आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारची दुसरी इंग्रजी औषधें जसे, पेनकिलर, क्लोरोडाइन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, वाघ्याचीं तेलें मलम, साबू, पॉम्याश, टिंकचर्स, सल्फाईन्स, इनोज, फ्रूट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारी औषधें व शस्त्रें, वगैरे व तरुण व वृद्ध ह्यांस लागणारे उत्तम गारेच चश्म, मुद्दाम आल्या शिवाय, लागण्या योग्य नंबरांचे पाठविण्यांत येतील त्याच प्रमाणें औषधांचीं व इतर पुस्तकें ही पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्हाल्युपेएबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं नाटपेड पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खालील पत्यावर करावा.

पत्ता. के. बी रेळे कंपनी,
जुबिली मेडिकल हॉल
कावसजी- पटेल ट्यांकरोड मुंबई
हीं औषधें सर्व इंग्रजी औषध विकणाराकडे व मालकाकडे मिळतील.

नोटीस.

रा० गणेश केशव देशमुख राहणार रावेरी प्रगणें राळेगांव तालुके केळापूर जिल्हे वणी यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीसीचा जबाब देण्यांत येतो कीः— तुम्ही वऱ्हाडसमाचार अंकांत तारीख १५ एप्रील सन १८८९ इसवी रोजीं नोटीस दिली ह्मणून कळविण्यांत येतें कीं, कलबे वणी तुमचें शेत बनाम जेताईचें इसवी सन १८६९ साला पासून आम्हास तुमचा सासरा नामें गुजाबा जोशी यानें वहितासाठीं तिजाई हिशानें दिलें असून तेव्हां पासून आजपर्यंत मी वाहतो आहे तकार कधींच झाली नाहीं. हल्लीं तुम्ही ह्मणतां कीं इ० स० १८८९ सालास ह्मणजे या सालास तिजाई बटाईनें आह्मी तुह्मास देत नाहीं. सालोना ठेका रुपये ४० चाळीस द्यावे तरी तुमचें ह्मणणें आह्मी कबूल करित नाहीं. माझी आज वीस वर्षें वहिवाट असल्यामुळें शेत वाहणें मी सोडीत नाहीं. उत्पन्नाचा तिसरा हिस्सा दरसालप्रमाणें मी बिनहरकत देईन. परंतु तुह्मास हें कबूल नसल्यास अन्य रीतीनें तजवीज करावी. आह्मास विनाकारण तुह्मी नोटीसीचा खर्च पाडला तरी तुह्मास मालाचा हिस्सा देतांनां त्यांतून नोटिसी बद्दल झालेला खर्च काढून घेऊं. कळावें तारीख २८ एप्रील सन १८८९ इ०

( सही. )
पैकूजी वल्दद जगनाजी
गाईकवाड रहाणार वणी
ता० गजकूर नि० खुद
हातची कल्यार.

नोटिशीचें उत्तर.

जवलाबाई जवजे शिवजीराम अगरवाले राहणार पातुरंड तालुके जळगांव वऱ्हाड यांस नोटीस देणार गिरधारी जगन्नाथ गौडब्राह्मण राहणार पातुरडे नोटिशीनें असें कळवितों कीं तुह्मी ता० २२ माहे एप्रील सन १८८९ चा नोटीस दिली ती पावला तुह्मी नोटिशींत लिहिलेलें घर मकान आह्मी मारुती जयराम नाईक घाटोळे पातुरडेकर याजपासून रु० १०० यांस घेतलें आहे. सबब तुह्मांस आम्ही जाणत नाहीं. तुह्मी आम्हास जें बक्षीसपत्र दिलें आहे त्यांतील शेत सरवई नंबर १२४ च तुम्ही आह्मास जानतलब खाणेस दिलें आहे यास्तव बक्षीसपत्र रद्द नाहीं. इतकेंच नाहींतर त्यात तुम्ही आम्हास दिलेलें बक्षीस घर तुम्हास आह्मी राहण्यास दिलें आहे तें नोटीस पावल्यापासून एक महिन्यांत खालीं करून द्यावें असें नाहीं झालें तर रीतिप्रमाणें काम चालवून अखेर निकाल होईपर्यंत जें नुकसान होईल तें व ह्या नोटिशीचा खर्च वगैरे सर्व भरून घेतलें जाईल म्हणून दिली नोटीस सही ता० ३० एप्रील सन १८८९ इसवी.

ताजाकलम तुह्मांकडे आपचा माल तुम्ही राहतां त्या मकानांत चिरहर मिळून १२५ रु० आहे व नोकरीचा पगार येणें वर्ष २॥ चा रु० ३०० असे मिळावे. सर्व तुह्मी सदरील लिहिल्याप्रमाणें निकाल करावा कळावें.

( सही )
गिरधारी जगन्नाथ गौडब्राह्मण

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास.................... ४

...टीबद्दल.
१० ओ ...चे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ......०१

Six monthly............3 ... as.
Single copy..............................4 as

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10... 4as
Repetition derline3as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII — AKOLA MONDAY 13 MAY 1889 — NO. 18

वर्ष २३ — अकोला सोमवार तारीख १३ माहे मे सन १८८९ इ० — अंक १८

## गरमीचे रोगावर औषध.

शरीरांत गरमी होऊन धातु बिघडते व ती स्त्री संग समयीं पांच दोन मिनिटांतच पतन होते. झोंपेत व मुत्र बरोबर पतन होते परम्याचा रोग उत्पन्न होतो शरीराचा दाह वगैरेकरून अनेक पीडा होतात हा रोग ज्यांस आहे त्याणी अवलेह घ्यावा. थोड व अनुभविक आहे. एक डब्यांत तोळे २८ किंमत रुपये २ डाक खर्च १० आणे.

## अन्न पचन होण्याचें औषध

अन्नपचन नाहीं त्यास मळमुत्र साफ होत नाहीं. पोट दुखतें, पोटांत वायु धरतो, छातींत कफ पित्त होऊन मळमळतें, ओकारी होते, मळमार्गीनें शेम पांढरे रंगाची पडते, शरिरांत वात फिरतो, अशक्तता येते. हा रोग ज्यांस आहे त्याणी पाकवडी औषध घ्यावें एक डब्यांत तोळे १६ किंमत रुपये २ डाक खर्च ९ आणे.

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन वैद्य पेठ सदाशिव पुणें सिटी.

## न्यायदर्पण.

(मासिक पुस्तक-अगाऊ किंमत रुपये ६ मागाहून किंमत रुपये ८.)

ह्यांत मध्यप्रांतांतील मे० जु० कमिशनर यांच्या फैसल्यांचें मराठी भाषांतर प्रसिद्ध केलें जाईल. वर्गणी खालील पत्त्यावर पाठवावी:–

केशव लक्ष्मण जोरवेकर
नारायण केशव कावळे.

## ढेंकूण हारक.

ढेकुणांचा उपद्रव नाहीं, असें ठिकाण क्वचितच असेल. तशांत हल्लींच्या गरमीच्या दिवसांत ढेंकणांच्या उपद्रवानें फारच त्रास सोसावा लागतो. ह्मणून मुद्दाम हें चूण तयार केलें आहे. त्या सोबत दिलेल्या माहितीप्रमाणें ह्या चूर्णाचा उपयोग केला असतां ढेंकणांचा उपद्रव नाहींसा होतो. [ १५ ] तोळे चूर्णाच्या पुडीची किंमत ( १० ) आणें, व्हा० पे० व ट० वगैरे खर्चासह किं० १ रुपया पडेल. हें चूर्ण आह्माकडे विकत मिळेल.

भाऊ चिमणाजी महाबळेश्वरकर.
ठि० सोनार आळी, मुंबई.

## नोटीस.

रायभान वलद झिंगराजी घोटे राहणार कसबे आकोट तालुके मजकूर जिल्हा आकोला यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं, तुह्मी आकोला शुद्धवऱ्हाडी पत्राच तारीख १८ एप्रील इसवीचे अंकांत मजला जी नोटीस दिली त्याचें उत्तरः–तुह्मी आमचे मुलीचा विवाहसंबंध तोडल्या बद्दल आकोटात चार पंचा समक्ष तारीख २९ जुलाई सन १८८८ इसवी रोजीं फारकत लिहून दिली सबब आतां आमचे मुलीवर तुमचा कोणते ही प्रकारें हक्क राहिला नाहीं. तुह्मी जो नोटीशींत मजकूर फारकतीच्या संबंधानें दर्शविला आहे. तो केवळ तुह्मी दिलेली फारकत पुढें मागें बनाऊ सिद्ध करण्यासाठीं तुमचा प्रयत्न आहे हे आह्मी समजतो. कळावें तारीख ७ माहे मे सन १८८९ इ०

( सही. )
विठोबा वलद भगाजी दहीभात राहणार मौजे वडाळी ता० अकोट नि० खुद्द हातची.

## नोटीस.

कणीराम मोतीराम मारवाडी बस्ती लिंबी यांस कळवितों कीं तुमचें गहाण आह्मापाशीं सहा वर्षे आहे तर आतां आठ ८ दिवसांत न सोडविल्यास तें विकून आमची भरती करून घेऊं. कमी पडेल ती रकम फिर्यादीनें घ्यावी लागेल. कळावें अकोला ता. १०-५-८९

( सही ) तात्या बापूजी कोरडे–पुणेकर द. खु.

वऱ्हाडसमाचार.

मिती वैशाख शुद्ध १३ शके १८११

हैद्राबादेच्या जमाबंदीची हकीकत मागें आम्ही वाचकासाठीं दिली आहे ह्या अंकीं खर्च वाढण्यास कारणें झाली आहेत त्यापैकीं कांहीं मुद्याची आणि मौजेची आहेत तीं सांगण्याचा इरादा आहे. जमा थोडी आणि खर्च फार असा पुष्कळ अंशी प्रकार आहे तरी राज्यकारभाराची व्यवस्था नीटपणें सुयंत्र चालावी ह्मणून नवीन फेरफार करावे लागले आहेत. ते फेरफार किंवा त्या सुधारणा अमलांत आणण्याकडे दिवाण साहेब सर अस्मानजहा यांचा रात्रंदिवस प्रयत्न चालला आहे. त्यांच्या म्हणण्यावरून अशी खातरी होईल कीं दिवाणी फौजदारी खात्याकडील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पगार वाढविल्या शिवाय न्यायमनसबी चांगली होणार नाहीं. आणि राज्यकारभार व्यवस्थेशीर व आटपशीर चालणार नाहीं. चांगल्या पगारांची मंडळी असली ह्मणजे सर्व गोष्टी नीटमार्गास लागतात हा सिद्धांत खरा होण्यास पगाराच्या मानानें हुशार आणि विद्वान गृहस्थ कामगार नेमिले पाहिजेत पण त्याप्रमाणें निरनिराळ्या हुद्यांचे पगारांचे दर्जे वाढविले तेव्हां नवीन नवीन तरतरीत हुशार कामगार नेमिले आहेत असें खत्रीनें सांगतां येत नाहीं. 'डेकन मायनिंग' प्रकरण अद्याप संपलें नाहीं तरी तें जारीनें पुष्कळ दिवस चालल्यामुळें दिवाण साहेबांस राज्यकारभारांत पाहिजे तसे लक्ष्य पुरवितां येत नसे. मि. अबदुल हक्क यांचा समाचार घेण्यांत त्यांचा बराच वेळ व्यर्थ गेला. म्हणून पोलीसखातें आणि दिवाणी खातें सुधारण्यास दिरंगाई झाली; परंतु त्यांच्या स्वतांच्या देखरेखीनें हल्लीं हीं दोन्हीं खातीं सुरळीतपणें आपापलीं कामें बजावीत आहेत हे दिवाण साहेबांच्या कारकीर्दीस भूषणाई आहे. हायकोर्ट आणि त्या खालील न्याय कोडतांत न्यायाचीं कामें होईल तितकीं शिस्तीवर आणून ठेविलीं आहेत.

हैदराबाद संस्थानची सालिना जमा होती तिचा खर्च काटकसरीनें होण्यासाठीं आणि सरकारी खजिन्याचा गैरवाजवी मार्गानें उपयोग होऊं नये ह्मणून दिवाण साहेब आणि नबाब मेहदीअली हे उभयतां फार दक्ष आहेत. मागील कर्जाची फेड हळूहळू व्हात जावी आणि खजिनांतल्या शिलकेंत तूट पडू नये ह्मणून कडेकोट तयारी चालली आहे. इंग्रजी अंमलाखालीं रजिस्ट्रेशन खातें आहे त्या धर्तीवर हैद्राबादेस निराळें खातें सुरू करून संस्थानचें उत्पन्न वाढविण्याच्या विवंचनेंत सध्यां दिवाण साहेब गुंतले आहेत. तुरुंगांत ही कांहीं ठीकठीकाण सुधारणा केल्या आहेत त्यामध्यें कोणी कैदी वीस वर्षे पर्यंत नेकीनें आणि प्रामाणिकपणानें आपलें काम चोख बजावील तर त्यांस खुलें करण्याचा नवीन नियम काढिला आहे. इंग्रजांच्या प्रमाणें 'इरीगेशन' खातें नवीन उभारलें आहे त्या पासून प्रथमतः फायदा दिसून येणार नाहीं हें उघड आहे. मागील अंकीं शाळा खातें अनेक विघ्नें येत असूनही कसकसें सुधरत चाललें आहे तें दाखविलेंच आहे. शाळांतून मुसलमानी मुलांस धर्म संबंधीं शिक्षण सुरू केलें आहे आणि तें चांगलें चाललें आहे. हिंदु मुलां साठीं सर्व धर्मास साधारण अशी क्रमिक पुस्तकें नवीन तयार होत आहेत. धर्मसंबंधीं शिक्षण देणें फार कठीण आहे खरें तरी तें साध्य होण्या विषयीं कांहीं खटपट होणें फार अवश्यक आहे आणि त्या प्रमाणें हैदराबाद सारख्या मुसलमानी अमलांत मुसलमानी धर्माचें शिक्षण मिळत गेल्यास तेथील शाळा खात्याच्या ह्या नवीन सुधारणेंत चालले यश येईल असा आम्हास भरंवसा आहे.

राजमार्ग धरला आणि दीर्घ प्रयत्न चालविला म्हणजे यश केव्हां तरी मिळतें त्या प्रमाणें मि. केन साहेब यांचे मद्यपानाच्या निषेधा संबंधानें अहर्निश चाललेले प्रयत्न सफळ होतील असें आतां वाटूं लागलें आहे. मद्यपानादि प्रचार मोडण्याचा साहेबांनीं विडा उचलला आहे. सहा सात महिन्या पूर्वीं साहेबांनीं हिंदुस्थानची सफर केली आणि ह्या देशाची स्थिती प्रत्यक्ष पाहिली तेव्हां त्यांस ह्या देशाच्य सुधारणेच्या बडेजावा खालीं दिवसेंदिवस वाढत असलेल्या निकृष्टावस्थे बद्दल फार वाईट वाटलें. हिंदुस्थानचा मूळचा धर्म अस्तास चालला आहे तेव्हां हिंदुस्थानची कालांतरानें कसकशी अधोगती होत जाईल हें त्यांनीं अनेक वेळ हिंदुस्थानांत असतांना बोलून दाखविलें आहे. पांच पन्नास वर्षा पूर्वीं मि. केन हिंदुस्थानांत आले असते तर आमची खात्री आहे कीं त्यास व्याख्यानें देण्याचा आणि हिंदुस्थानचा कैवार घेऊन पार्लमेंटांत भांडण्याचा प्रसंगही आला नसता.

प्रस्तुत पूर्वीचा मनु पालटला आहे. हिंदुस्थानची जमाबंदी वाढविण्याच्या फिकिरींत सरकार होते तेव्हां त्यांनीं अपकारी खातें काढिलें. केवळ पैसा गोळा करण्याचा मुद्दा नसला तरी सरकारास अपकारी खातें हें एक नागवें कोल्हें भेटलें आहे म्हटलें तरी चालेल. वर्षानुवर्षे ह्या खात्याचें उत्पन्न वाढत आहे तसतसें सरकार लोकांच्या पिण्यापाण्याची व्यवस्था चांगल्या ठाकठीक रीतीनें लावून देत आहे. सरकारी दप्तरीं लेख आहेत कीं मद्यपानादि व्यसनांस धरबंध व्हावा आणि लोकांची नीती वाढावी अशा तऱ्हेनें अपकारी खात्याची पद्धत ठेविली आहे. पण खरोखर कोरड्या मनीच्या गप्पा प्रमाणें कागदांतील विचार कागदांत आहेत. अलीकडे लोकांच्या सोयी इतक्या सुबक झाल्या आहेत ठिकठिकाणीं दारूचे गुत्ते आणि मदतखाने खुले आहेत. राजदरबारच्या थाटमाटा प्रमाणें संध्याकाळीं रोषनाई होत असते आणि आल्या गेल्या पाहुण्याचा व्यवस्थशीर समाचार घेतला जातो. पेढीवाल्या प्रमाणें हे दुकानदार

मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या व श्रीमानांच्या नांवचो खातीं घालून ठेवितात आणि महिन्यामहिन्यांनीं पगाराच्या वेळीं दर्शनी हुंड्या पाठवितात त्यांचीं उदाहरणें मुलानाळांच्या ही पहाण्यांत आहेत तेव्हां प्रत्यंतरा साठीं निराळें लिहिणें नको.

क्षयरोगी बरा होण्यास जसा धन्वंतरी पाहिजे त्या प्रमाणें आमच्यांतील मद्यपानादि दुष्ट व्यसनें बंद होण्यास मि. केन साहेबांसारखे कोणी तरी हिम्मत बहाद्दर गृहस्थ पाहिजे होते. प्रस्तुत मि. केन साहेबांनीं हिंदुस्थानचें अपकारी खातें हा विषय हातीं घेतला आहे आणि त्याचा ते अखेर निकाल लागे पर्यंत पिच्छा पुरविणार आहेत. परक्यांनीं येऊन आह्मास शहाणपण शिकवावें ही शोचनीय स्थिती खरी तरी त्यावरून आपणा नेटिवांमध्यें तसे हुशार नाहींत असें नाहीं. परंतु ते सर्वैव पंगु आहेत. पाठबळ ह्मणून तें त्यांस बिलकूल नाहीं. अनेक प्रसंगीं ते लोकांच्या उपहासास ही पात्र होतात. असो. पदरीं असेल तो दाम ह्मणून आह्मी हिंदुस्थानचे कैवारी मि. केन साहेब यांचे फार फार आभारी आहों आणि त्यांच्या प्रयत्नांस एकदां यश येवो ह्मणून ईश्वरा जवळ प्रार्थना करीत आहों.

दहा बारा दिवसां पूर्वीं मि. केन साहेबांनीं आपले स्नेही आणि त्यांच्या 'टेम्परन्स असोशियेशन' मंडळीचे अध्यक्ष मि. स्यामुयल स्मिथ यांच्या मार्फत पार्लमेंट मध्यें सूचना केली कीं, हिंदुस्थान सरकारच्या जमाबंदीच्या पद्धती पासून लोकांच्या ह्मणण्या विरुद्ध दारू अफीम इत्यादि पदार्थांचीं दुकानें नवीन नवीन स्थापन होत आहेत आणि लोकांस सहजी मद्यपानादि करणें सोईवार पडूं लागलें आहे ह्या मुळें उद्योग धंदा करणारे लोक अठरा विस्वे दारिद्र्यांत बुडून वाहूं लागले आहेत तेव्हां इंडिया सरकारांतून या प्रकरणांत ताबडतोब तजवीज झाली पाहिजे. ह्या सूचनेवर हिंदुस्थानचे पार्लमेंटांतले दफ्तरदार सरजान गार्स्ट यांनीं अनेक आक्षेप घेतले कारण राज्य कर्त्यांस यामुळें लांछन येतें असें त्यांस वाटत असेल हेंही उघड आहे. पण अखेरीस त्यांचे सर्व उपाय हरले आणि १०३ मतां विरुद्ध मि. केन साहेबांच्या पक्षास ११३ मतें मिळाल्यानें ती सूचना कायम ठेवावी लागली ही सूचना विलायतेहून येउ हिंदुस्थानचे व्हाईसराय लॉर्ड लॅन्डस् डाऊन यांजकडे विचारा साठीं आली आहे. ही गोष्ट एवढ्या निकरावर येत आहे तेव्हां ह्या प्रकरणांत चांगला कसोशीनें विचार होईल असा रंग दिसत आहे.

---

मुंबईस गेल्या चवथ्या तारखेस नाथद्वारचे महाराज यांजवर दिवाणी पकड वारंट बजावलें ह्मणून तेथील गुजराथी वैष्णव मंडळींत चळवळ उडून राहिली आहे. गुरु महाराजावर हा प्रसंग गुजरला हें पाहून शेंकडों धार्मिक आणि देवभोळे लोक फार कष्टी आणि खिन्न झाले आहेत. श्री महाराज गोवर्धन लालजी हे उदेपूरच्या राण्याच्या ताब्यांतील नाथद्वार देवळाचे तक्ताधिपती महाराज आहेत. ह्यांचे तीर्थरूप महाराज असतांना राणासाहेबांकडे देवळांतून पानसुपारी राजवाड्यांत धाडावी लागे. हा संप्रदाय तीर्थरूपांनीं मोडला आणि राणेसाहेब यांच्या मनांत वैषम्य आलें. अर्थात देवसंस्थानचा पूर्वापर चालत आलेल्या क्रमा प्रमाणें नाथजीच्या तक्तावर चिरंजीवास रेसिडेंट साहेबांच्या परवानगीनें राणे साहेबांनीं स्थापिलें तेव्हां पासून प्रस्तुतचे श्री महाराजांस लोक फार फार चाहूं लागले आहेत. ही गोष्ट सन १८७८ सालीं मार्चांत घडली.

कनक आणि कांता ह्या दुनियेंत अजब चीजा आहेत त्यांच्या पुढें सर्व गोष्टी लटपटतात. वरील प्रकरणांत धनाचा संबंध उभा राहिल्यामुळें पितापुत्रांचा ईश्वरीसंबंध बाजूस पडला आणि उभयतां बापलेंक वादीप्रतिवादी बनले आहेत. हें पकड वारंट निघालें त्याचें कारण असें सांगतात कीं मुलगा महायात्रेच्या निमित्तानें बाहेर मुलखी मुंबई कडे गेला आहे तेव्हां तो पुढें कोठें तरी देशावर फरारी होईल ह्मणून ताबडतोब कायद्या प्रमाणें जबरें पकडसमन्स अंमलबजावणींत आणिलें आहे. दावा बत्तीस लाख रुपयांचा आहे. वादी ह्मणतात कीं माझी वडिलोपार्जित ३२ लक्षांची मालमत्ता श्री नाथजीच्या देवालयांत सांठविली होती ती मी पदभ्रष्ट झाल्यावर मुलाच्या अधिकाराखालीं तशीच होती. पण हल्लीं प्रतिवादी ही गोष्ट नाकारतात आणि ही सर्व जिनगी देवस्थानची आहे ह्मणतात. दिवाणी कोडतात खटला चालला आहे त्याचा कायद्या प्रमाणें निकाल होईल तेव्हां होवो त्या संबंधानें आह्मांस कांहीं बरें वाईट वाटत नाहीं पण वडिलांनीं मुलांवर वारंट काढिलें हें पाहून विस्मय व दुःख वाटतें.

शनिवारीं सायंकाळीं पांच वाजतां श्री महाराजास पकडलें आणि उमरखाडीच्या दिवाणी तुरुगांत ठेविलें आहे. ही बातमी चोहीकडे पसरतांच पुष्कळ वैष्णव मंडळी सर चार्लस सार्जंट चीफ जस्टिस यांजकडे रातोरात गेली आणि जामिनीवर सोडण्यासंबंधानें विनवणी केली. ही वेळ मोठी कठीण आली होती. शनिवारीं कोर्ट बंद झाल्या नंतर हा सर्व प्रकार घडला. दुसरे दिवशीं पडला आदितवार तेव्हां सर्व उपाय हरले. चीफ जस्टिस यांनीं रात्रीं शेरीफकडे जाण्यास सांगितलें. शेरीफ रा. रा. जव्हेरीलाल उमियाशंकर यांनीं लोकांच्या जामिनावर आणि त्यांच्या जबाबदारीवर महाराजांस खुलें केलें. पुढें गेल्या सोमवारीं हायकोर्ट कडून जामिनीवर सोडण्याची परवानगी मिळाली. हा खटला हाय कोडताच्या हद्दींत येत नसल्यामुळें पुढील चौकशी जिकडच्या तिकडे होईल.

---

## रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांचा मृत्यु!

आह्मांस कळविण्यास अत्यंत दुःख वाटतें कीं रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक सी. एस्. आय. यांस गेल्या गुरूवारीं मुंबई मुक्कामीं देवाज्ञा झाली. रावसाहेब मंडलिक थोड्या दिवसां पूर्वीं हाय कोडतांत काम चालवीत असतां घरी येऊन बेशुद्ध पडले तेव्हांच लोकांच्या तोंडचें पाणी पळालें. परंतु त्या नंतर औषधोपचार दोन दिवस चालले तेव्हां ते पूर्ववत् देहभानावर आले आणि आतां प्रकृती सुधरेल अशी पुष्कळ उमेदही आली पण सर्व निराशा झाली आणि गुरुवारीं पहाटेस चार वाजण्याचें सुमारास रावसाहेब परलोकवासी झाले. वर्षभरा पूर्वींच रावसाहेबांनीं हा उपद्व्याप सोडावा आणि सुखानें कालक्षेप करावा ह्मणजे प्रकृती चांगली राहील असें त्यांस त्यांच्या आप्तमित्रांचें ह्मणणें असे; परंतु सदैव उद्योगांत निमग्न असण्या बालाभ्यास पडला म्हणून मरणकाल पावेतों त्यांच्या नित्यक्रमांत मोठासा फरक पडला नाहीं.

रावसाहेबांच्या मरणानें हिंदुस्थानचा एक मोहरा हारपला! जुनेनवे ही जगाची राहटी आहे खरी, परंतु मंडलिकासारखे गृहस्थ फार विरळा ह्मणजे त्यांच्या मागें त्यांच्या तोडीचे पुरस्कर्ते अन्य मिळत नाहींत; ह्मणून सर्वांस ही दुःखवार्ता ऐकून हळहळ वाटल्या वाचून राहणार नाहीं. रावसाहेबांचा नांवलौकिक सर्व हिंदुस्थानभर आहे आणि ते आपल्या सोज्वळ गुणांनीं आबालवृद्धांस मशहूर आहेत. त्यांचा जन्म थोरकुलांत असून प्रत्यक्ष त्यांच्याच घराण्यांतील अखेरचे बाजाराव पेशव्यांची नायकी होती. मूळ घर कोंकणांत रत्नागिरी जिल्ह्यांत मरुड गांवीं आहे. त्यांचा विद्याभ्यास लहानपणीं चांगला झाला आणि ते कांहीं दिवस स्वतांच्या कालेजचे ह्मणजे एलफिनस्टन कालेजचे गणिताचे प्रोफेसर होते. सन १८५२ सालीं ह्मणजे आपल्या वयाचे विसावे वर्षीं हे सिंध प्रांतचे पोलिटिकल एजंटचे हाताखालीं प्रथम सरकारी नोकर झाले. पुढें ह्यांनीं हायकोर्ट वकिलीची परीक्षा दिली आणि नंतर सन १८७६ सालीं मुंबईचे गव्हर्नमेंट प्लीडर झाले. सन १८८० पासून तहत आठ वर्षें मुंबईच्या कायदेकौन्सीलचे हे सभासद होते आणि यांचे थोर विचार आणि न्यायाच्या पोक्त मसलती पाहून लार्डरिपन साहेबांनीं त्यांस इंडियासरकारचे कायदे कौंसिलचे सभासद नेमिलें होतें त्या प्रमाणें त्यांनीं आपलें काम सन १८८८ साला पर्यंत चार वर्षें सर्वांनीं वाखाणण्या सारखें केलें. इंडिया कायदे कौंसिलांत रावसाहेबांची निवड झाली हीच पहिली नेटिवांची निवड होय. मुंबई युनिव्हार्सिटीनेंही गेल्या फेब्रुवारींत 'आर्टस' कडील 'डीन' रावसाहेबांस नेमिलें आणि त्यामुळें नेटिवांची पायरी प्रथमतः युनिव्हार्सिटीमध्यें एवढ्या श्रेष्ट पदवी पर्यंत पोंचली.

बुद्धि विशाळ असली, शिक्षण चांगलें मिळालें आणि दीर्घ उद्योगाचें बाळकडू पाजलें ह्मणजे मनुष्य काय काय करील ह्याचें उत्कृष्ट उदाहरण रावसाहेब मंडलिकांचें चरित्र होय. रावसाहेब पुरे जुन्या मताचे ब्राह्मण असत. जुन्या चाल रितीशीं समतोल सुधारणा करणें त्यांस फार आवडे. पेशव्यांच्या दरबारचे निस्पृहते संबंधानें रामशास्त्री विख्यात आहेत तसें नियमितपणा आणि नेमस्त वर्तन या संबंधानें विश्वनाथ नारायण मंडलिकांचें नांव बहुमुखीं ऐकूं येतें. हे वचनाचे धड असत ह्मणून ह्यांच्या शब्दांची मातबरी लोक फार मानीत. ह्यांचें वाचन फार मोठें होतें. इंग्रजी, मराठी, गुजराथी, आणि संस्कृत अशा चार भाषा मध्यें हे चांगले निष्णात होते. ह्यांची स्मरणशक्ति ह्मणजे दोलदप्तरच होतें ह्मटलें तरी चालेल. निरनिराळ्या ग्रंथकर्त्यांचे उत्तम उत्तम उतारे ते मुखोद्गत आमरण ह्मणत असत. वाचनाच्या व्यासंगा प्रमाणें ह्यांचा खासगी पुस्तकसंग्रहही फार मोठा आहे आणि तो केवळ शोभे साठीं नसून उपयोगांत आणिलेला आहे. मुंबईंतील वजनदार वर्तमानपत्र 'नेटिव ओपिनियन' उदयास येण्यास कारण हें कीं रावसाहेबांकडे त्याचें कर्तृत्व असे. ह्यांचे लेख वाचून विद्वान् लोक माना डोलवितात. ह्यांचीं लहानमोठीं पुस्तकें 'संचय व अभ्यास' हिंदूचे स्थित्यंतर, एल्फिनस्टनचा गुजराथी आणि मराठी इतिहास 'हिंदुधर्म शास्त्र,' मनुस्मृति' खोतीचें वतन, रेव्हिन्यु जुरिसडिक्शन, म्हैसूरचे संस्थान संबंधानें 'दत्तक आणि खालसा' इत्यादि अनेक आहेत त्यांत हिंदुधर्म शास्त्रावरील पुस्तकें वेदप्रमाण आहेत तशीं तीं हिंदुस्थान सरकारही न्यायाच्या कोडतांत कायद्या प्रमाणें मानितात. रावसाहेब मंडलिकांची विलक्षण विद्वत्ता कायदेकानूंत धूर्तता, निस्पृहते मुळें आणि नेमस्तपणा मुळें बाणीदार वर्तन, गर्भश्रीमंती व सर्वांत दैवाची अनुकूलता हीं पाहून सर्व लोक आश्चर्य करीत आणि रावसाहेबांच्या ठिकाणीं पूज्यभाव ठेवीत असत. राव साहेब हिंदुसमाजाचे सर्वोपरीनें अग्रणी असत आणि हिंदुधर्माचे एक भक्कम आधारस्तंभ होते ह्मणून नव्या मताचे उच्छृंखळ सुधारकांस निमूटपणें स्वस्थ बसावें लागत असे आणि त्यांचे कोटि क्रम व वाक्पांडित्य हीं वृथा होत असत. ह्या गोष्टीची प्रचिती सन १८८६ सालीं मुंबईस माधव बागत सभा भरली होती तेव्हां सर्वांस आली आहे. मलबारीचें ह्मणणें कीं बालविवाह निषेधासंबंधानें कायदा असावा ह्मणून त्या ह्मणण्यावर विचार करण्यासाठीं ही सभा भरली होती. राव साहेब मंडलिक अध्यक्ष होते ह्मणूनच सभा निर्विघ्नपणें सिद्धीस गेली. असो, हें चरित्र फार मोठें आहे आणि लिहावें तितकें थोडें वाटतें ह्मणून आम्ही आपला लेख थोडक्यांत आटपतों.

रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक सी. एस्. आय. हे कैलासवासी झाले तरी पुस्तक रूपानें सदैव आम्हापाशीं राहतील आणि देहत्यागामुळें नश्वर भाग संपला व आतां अजरामर किर्ती मात्र उरली आहे. तेव्हां रावसाहेब मंडलिकांच्या महात्म्यास उत्तमगती प्राप्त होवो ह्मणून आम्ही ईश्वराजवळ हात जोडून प्रार्थना करितों.

The Berar Samachar

MONDAY MAY 13 1889.

A great man has passed away from among us-a man that was admired, respected and revered by all classes of the community Hindus and Mahomedans, Parsees and Europeans. We allude to the late Rao Saheb V. N. Mandlik. It is with deep and profound regret that we have to record his death which melancholy event took place on Thursday the 9 th Instant at 4 A. M. in Bombay. Though the Rao Saheb was ailing for some time past it was not expected that the end would come so soon.

It is but necessary that we should give a short sketch of the life of our distinguished and illustrious countryman whose death it has fallen to our lot to record. Vishwanath Narayan Mandlik was born at Murud in the Ratnagiri District in the year 1883 so that at his death his age was only 56 though hard work had made him look much older. He was born of a wealthy family his father being a Vatandar Khot. His descent can be traced on the mother's side to the family of the Peshwa, and his ancestors had rendered some signal service in the time of the Peshwas.

At an early age he commenced his education in the Elphinstone Institution of which he rose to be a rare scholar winning most of the prizes. His contemporaries at the College were our respected citizen Mr. Dadabhai Nowroji and the late lamented Nowrojee Furdoonji who by his good acts won the title of the Tribune of the People.

Mr. Mandlik's record of service before he took to the Bar is also noteworthy. Begining life as a professor of Mathematics in which capacity he acted for two months he served variously as chief clerk to the Sind Political Agent, Deputy Educational Inspector, Munsiff, Curator of the Government Book Depot Bombay and personal Asst:- to the Income Tax Commissioner. In 1863 he passed the pleaders' Examination and commenced to practise as a pleader on the appellate side where he rose to be the government Pleader which office he held till his death.

In the small compass of this article we can note only a few of the many bodies with which the Rao Saheb was connected much to his credit and even more to their credit. He was a zealous member of the Bombay Municipal Corporation of which body he was twice President, of the Town Council where he worked to the satisfaction of all, a Fellow of the Bombay University where his holy name deserves to be and is partially enshrined, and of which body he was for long a Dean and a member of the Board of Accounts, a Justice of the Peace, a member of the Bombay Legislative Council for 8 years and of the supreme Council for 4 years in both which places he made his mark, an active worker in the Royal Asiatic Society of which he was the Vice. President, President of the student's Literary and scientific society-a society to which Bombay owes its girl schools and female education, Vice President of that Presidency Association, honorary member of the British India Assn:- and chairman of the Bombay Branch of the East Indian Assn.

Having thus taken a brief resume of the Rao Srheb's life and career let us see what made him what he was. It is an undisputed fact that he was popular among all classes of the community what could be the secret of this? The Secret would be found in a little Marathi essay that he once read before the S. L. and S. society and which is generally to be found in every Marathi Library on "Habits and study." Valuable as is the advice given there the Rao Saheb always acted up to it. By his conduct he showed most clearly that example was certainly better than precept. He said whaat he meant and he meant what he said. He was a man of thoroughly independent character and of machine like regularity. The like of him it is difficult to get. His death has left a void which it is impossible to fill at least for several years to come. His death will be deplored as a national loss and people will long miss him. He leaves an adopted son who we may hope will follow in the footsteps of his father.

In Conclusion we shall only say not as a matter of form but with profound sincerity 'May his Soul rest in peace'

---

## THE REVISION SURVEY AND ASSESSMENT IN BERAR.

The province is well nigh upon a fresh survey and assessment of cultivated lands. The survey and assessment in all the districts was not simultaneous and in all probability the fresh survey would commence in the order it was first undertaken. In this province the lands are held on what is known as the *ryotwari* tenure, under which the ryots pay directly to government and there is no medium between the two. There are other tenures also such as the Izara and he Palampat tenure but the greater portion is ryotwari. Under this tenure the ryot holds his land on a fixed rent for thirty years; after which it is liable to a revision. And now that the thirty years will be complete in the first talook that was surveyed and assessed, the taluka will be liable to revised assessment. We believe that Government intends to make a fresh survey as well as fresh assessment of lands and our remarks are based on this understanding.

We would suggest that it is not necessary to have a fresh survey at all; a fresh survey is only so much more additional expense to the province without any adequate return. The only object of a fresh survey is the rectification of any mistakes in the previous survey, or to find out any encroachments on the part of the cultivators on adjacent lands belonging to government. Now we think that both these objects can be attained without bringing in an expensive machinery of a survey officer and his staff. The Tahsildars in charge of Talukas have 'Moonsarims' and survey clerks who are called 'Classers' under them. The Patels and Patwaris of villages in a taluka should be asked to report if they think or find that there are any serious mistakes in the measurement of lands at the first survey which require correction; as also any encroachments, if any, on government land. All such reported doubtful cases should be checked by the Tahsildars under their personal supervision with the aid of the *classers* and *moonsarims*; a dissatisfied ryot having the right of appeal to the Deputy Commissioner or a right to sue and get declared in the civil court the exact amount of land in his possession. No body thinks that the first survey was incomplete or unnecessarily hurried; if the first survey officers have done their duty, and it is only a correct presumption to say that they have done it, there is no reason why there should be any very serious mistakes in the measurement of acreage at the first survey. The mistakes therefore if any, must necessarily be very few and certainly not worth having a fresh survey for. This limitted number of mistakes can be easily dealt with by the Tahsildars and if the ryot is not satisfied with the Deputy Commissioner's decision on appeal, he must take his chance in a Civil Court. This last provision is necessary in the interests of the ryot as well as the government; as the 'classers' and those who superintend them would do their work carefully-being apprehensive of an enquiry by the Civil Court; and the Civil Court may sometimes find out that the ryot has more land in his possession, and thus benefit government.

There is also sometimes another object in having a fresh survey and it is this, that the classification of the soils has to be corrected. Lands are classed according to their supposed capacities of yielding produce; and it is necessary to see, if the lands are improperly classified— higher kinds of land being put down in the lower class, and the lower kinds being put down in the higher classes. This is however not of much importance in Berar. Many of the lands that have been brought under cultivation during the last thirty years are fresh lands and it is well known that although these virgin lands yielded considerably during the first ten years of their cultivation, they have latterly deteriorated. When therefore they were surveyed 30 years ago the probability is that the lands were put in the higher class than they would deserve to be in at present. It cannot be denied that the *natural* yielding capacities of the soil 30 years ago which formed the basis of classification at the first survey must have been more than at present and so they must have been classed higher than what they would be now. It may be argued that as the *natural* capacities of virgin soils might have deteriorated during the last 30 years, so some lands must have been improved in the meantime and government would be a loser, if these lands are kept in the class in which they have been put at the first survey, when at present they would be put to a higher class. The answer to this objection however is, that, if any lands have improved in the meantime, they could not have improved of themselves; the quality must have been higher only by putting manure in the soil or by some other methods in which the application of capital and personal labor of the ryot must have formed an essential factor; and government has, certainly no right to tax any improvements in the nature of the soil brought about by the industry and capital of the ryot. That would be equivalent to discouraging ryots to make any improvements in the soil. So a fresh survey is not necessary to find out any mistakes in favor of the ryot in the first classification, that is, mistakes in which lands have been put down in the lower class than they deserved to be; and a fresh survey is also unnecessary in those cases where the lands of ryots have been classified in a class higher than they really otght to be. Such cases would be amply provided for by ryots complaining of that grievance, having the right to challenge a fresh survey for a correct classification of their lands subject always in cases where the ryot has unnecessarily made a complaint to the charge of surveying his land fixed at a certain rate. The ryot is also to have the right to go to Civil Court to get his land correctly classified. With rules such as these or in a similar spirit, the Tahsildars and the Deputy Commissioners would be able to correct the few mistakes if any, in the first survey; and thus the cost of a fresh survey might be avoided altogether.

(To be continued).

---

## वऱ्हाड.

मि. डब्ल्यू जेकब जंगलखात्याचे डेपुटी कानसरव्हेटर वर्ग पहिला यांनीं पेनशन घेतल्या मुळें वऱ्हाडांतील डेपुटी कानसरव्हेटर मि. जी.एफ्. प्रेव्हास्ट यांचा वर्ग चवथा होता तो तिसरा झाला, आणि मि. जी. एफ्. टेलर हे असिस्टंट कानसरव्हेटर पहिला वर्ग होते ते चवथ्या वर्गाचे डेपुटी कानसरव्हेटर झाले आहेत.

मि. सी. ए. फ्रेझर आफि. पोलिस सुपरिंटेंडेंट इलिचपूर यांस १३ दिवसांची हक्काची रजा मिळाली; त्यांच्या रजेंत मि. एच्. व्ही. कालिन्स पोलीस इनस्पेक्टर ह्यांनीं काम पहावें असें ठरलें आहे.

मि. ए. इलियट आफि. डेपुटी कमिशनर उमरावती यांस क्रिमिनल प्रोसिजरच्या आक्टांतील तीसावे कलमान्वयें सर्व हक्क अग्रिशान रेसिडेंट साहेबांनीं दिले आहेत.

रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे बी. ए. एल. एल. बी. आणि एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस सन १८८९ च्या चौतिसाव्या बुकसरक्युलर प्रमाणें असिस्टंट कमिशनरचे जमाबंदी कडील पूर्ण अधिकार देण्यांत आले आहेत.

चांदूरचे आक्टींग तहशिलदार रा. रा. गोविंद गंगाधर यांस दुसरे वर्ग माजिस्ट्रेटचा आणि बत्तीसावे कलमा प्रमाणें फटक्याची शिक्षा देण्याचा अधिकार मिळाला आहे.

रा. रा. पंडित सुरज नारायण असिस्टंट कमिशनर आणि पहिले वर्ग माजिस्ट्रेट यांस वाशिम जिल्ह्यांत क्रिमिनल प्रोसीजरच्या १३३ आणि ११० या उभय कलमा प्रमाणें अधिकार देण्यांत आले आहेत.

हैदराबाद कांटिनंट मधील दुसऱ्या घोडेस्वार पलटणीचे लेफ्टेनंट एफ्. एल्. राइट यांस औरंगाबादेस पोलिस सुपरिंटेंडंट नेमिलें आहे.

येत्या बुधवारीं वाशिमास नवीन बांधलेल्या टाऊन हालचा उपयोगांत आणण्याचा समारंभ मि. नीलीस साहेब डे० क० यांच्या हातून होणार आहे. साहेब रजेवर गेल्या नंतर पुन्हा परत येणार नाहींत असें ह्मणतात.

## वर्तमानसार.

गोल्डनग्यांग पैकीं एक गार्ड विलीयम. नेल याच्यावर खटला लागू होऊन सहा वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा त्याला देण्यांत आली.

शेकएल सेकशी यांच्या हातांत खार्टूम गेलें असें केरोच्या ता० १० एप्रिलच्या तारेवरून समजतें.

कराचीस देवीची सांथ आली आहे व त्यामुळें तेथील मुलें फार मरत आहेत.

चालूं महिन्याच्या २० तारखेस पुण्यास प्रोव्हिंशीयल कनफरन्स भरण्याचें ठरलें आहे.

लंडन व पारिस यांच्या दरम्यान टेलिफोनच्या योगानें काम चालवावें ह्मणून तेथील टपाल व तारायंत्रांचे मुख्य अधिकारी एम. कुलन हे विचार करीत आहेत. व या संबंधानें उत्तम व नामांकित अशा एंजिनियरांची ते मतें घेत आहेत.

गव्हरनर जनरलचे मध्याहिंदुस्थानांतील एजंट मि. हेनरी हे तीन महिन्याच्या रजेवर स्वदेशीं जाणार आहेत.

प्रतिवर्षी ७१ टन मीट जगांत तयार होतें. सु० प०

निझामाला बुडविणाऱ्या डेकन मायनिंग कंपनीशी हल्लीं जो पुन्हा करार होत आहे त्यामुळें निझामचें फार मोठें नुकसान होण्याचा संभव आहे तसेंच कंपनीची जी लुच्चीगिरी बाहेर आली आहे त्यावरून कंपनीशीं केलेला तो करार अजीं मोडून टाकावा अशा प्रकारचे कांहीं विचार पार्लमेंट मेंबरांत आपसांत चालूं आहेत. हा सर्व प्रकार इतक्यांत पार्लमेंट पुढें ठेवण्यांत येईल असें ही ह्मणतात.

परळ स्टेशनाजवळ जें मैदान आहे तें मुंबईच्या राष्ट्रीय सभेकरतां देण्यांत येणार आहे असें ह्मणतात.

निजाम सरकाराकडून धुलिपार्सिंगाच्या नांवें पाठविलेलें एक पत्र सांपडलें आहे असें कळतें हें लचांड! किंवा कुभांड?

मराकटो येथें एक बकरी ज्याली; तिला जें करडूं झालें त्याला एक तोंड, एक धड, दोन शेपुटें दोन नाकें, तीन डोळे. चार कान आठ पाय असें विलक्षण जन्मलें.

माझ्या संस्थानच्या कोणाही मनुष्यानें विलायती कापड वापरू नये असें जोधपूरच्या महाराजांनीं हुकूम फर्माविला आहे. हा हुकूम फारच उत्तम असून असल्या प्रकारच्या कांहीं सुधारणा आमच्यांत होतील तर किती बरें होईल

रंगूनच्या सरहद्दीवर पुन्हा गडबड सुरूं झाली आहे. इंग्लिश लोकांस मदत केली ह्मणून सावल्याच्या शिपायांनीं करेनी सरहद्दीवर ८१ लोकांस ठार मारलें. ठा०

पाऱ्याची खाण— रेवदंड्यास जाऊं येसु सुखा याचे परसांत विहीर खणीत असतां पाऱ्याची खाण लागली आहे. त्यानें त्याबद्दल सरकारांत कळविलें असून सदर पारा कोणीं काढूं नये अशाबद्दल बंदोबस्त ठेवण्यांत आला आहे असें इं० प्रि० वरून कळतें.

सरकारचा योग्य ठराव—जज्ज असि० जज्ज व सब जज्ज यांनीं ११ वाजल्यापासून ५ वाजे पर्यंत काम केलेंच पाहिजे असा एक ठराव सरकारनें नुकतांच केला आहे. हें ऐकून आह्मी समाधान मानतों. पण पूर्वी असा ठराव नव्हता असें नाहीं, मग आतांच असा ठराव करण्याचें सरकारास काय प्रयोजन पडलें असें सहजच मनांत येईल. तर त्यांचे समाधान असें आहे कीं, डिस्ट्रिक्ट व ताबे कोर्टांत साल अखेरीस अतिशय मुकद्दमे शिल्लक राहतात, त्यामुळें असिस्टंट जज्ज व मदत सब जज्ज देऊन कामाचा निकाल करून घेणें सरकारास भाग पडतें. त्यामुळें सरकारावर खर्चाचा जास्त बोजा बसतो. जज्ज, असिस्टंट जज्ज, आणि सब जज्ज वेळच्या वेळीं कोर्टांत येत नाहींत, वेळ होण्या पूर्वीं कोर्टें बंद करितात त्यामुळें अतिशय काम शिल्लक पडतें, आणि सरकारास जास्त खर्च करावा लागतो. गत वर्षी कित्येक डिस्ट्रिक्ट कोर्टांत अशी कामाची शिल्लक राहिल्या मुळें सरकारानें त्याच्यावर चाबूक ओढले होते त्या मुळें न्यायाधिकारी आमच्या हायकोर्टास राग येऊन हायकोर्टाचा व मुंबईसरकारची कागदीं चकमक बरेच दिवस झडत होती. हा ठराव त्याच चकमकीचा परिणाम आहे असें आह्मास वाटतें उशिरां येणें व लौकर कोर्टें बंद करणें यानें कामाची शिल्लक तर तुंबतेंच पण पक्षकार व साक्षीदार यांची अतिशय गैरसोय व नुकसान होतें. हें सर्वांना माहीत आहेच. तेव्हां झालेला ठराव योग्य झाला, पण ज्यांच्या संबंधानें सरकारनें तो केला त्यांनींच तो अमलांत आणावयाचा आहे तेव्हां कितपत उपयोग होईल याचा आम्हास संशय वाटतो. इतर कचेऱ्यांत इतर नोकरांच्या जशा हजेऱ्या असतात तशा जज्ज, असिस्टंट जज्ज, सबजज्ज इत्यादिकांच्या हजेऱ्या कां ठेऊं नयेत?

दारू गाळण्याची औटस्टील सिस्टीम सगळ्या हिंदुस्थानांत अगदीं बंद व्हावयाची आहे असें कलकत्याच्या मार्निंग पत्रास खात्रीलायक मोठ्या आधारावरून समजलें आहे. शु० सू०

स्वप्रासादं सुरम्यं वरमथ कुतुकात्पेशवा धीसखं वै । पश्यन्त तं निजामः कचि—दहानि मलोत्सर्गगेहे सुचित्रम्।
दृष्ट्वेहेदं स राजा रमति तव सदा पा-र्थिवश्चाऽत्र चित्रं । तेनापृच्छैत्तदानीं खलु च तव मलोत्सारणायत्येवादि॥

अर्थः—'कोणी एके दिवशीं पेशव्याचा वकील आपला सुंदर आणि श्रेष्ठ असा महाल कौतुकानें पहात असतां, त्यास निजामानें आपल्या शौचकुपांतील एका सुंदर तसबिरीकडे पाहून म्हटलें कीं, वकील साहेब! आपले राजे येथेंच सर्वकाल रममाण आहेत! हें आश्चर्य नव्हे काय? हें ऐकतांच वकिलानें लागलेंच निजामास मोठ्यानें उत्तर दिलें कीं, साहेब! आपणांस शौचविधि साफ व्हावा म्हणूनच मुद्दाम ही योजना आहे!!' भा.वि.

याचें नांव औदार्यः— बाबूसागरदत्त या महा उदार गृहस्थानें मरतेवेळीं तीस लाख रुपये आपल्या दरिद्री देशबांधवाच्या उपयोगी करितां बंगालचे आडमिनीस्ट्रेटर जनरल याचे स्वाधीन केले. हल्लीं या रकमेंत एक हास्पितळ व एक कालेज स्थापण्याचें ठरलें आहे. या कालेजांत फी मुळींच न घेतां निव्वळ फुकट शिक्षण दिलें जाणार आहे.

सुभाषित—(१) धीरांचा पराक्रम त्यांच्या संकट कालींच व्यक्त होतो. सुखसंपत्तीच्या वेळीं कळून येत नाहीं. चंदनाचा सुगंध तो अग्नीवर टाकल्यानंतर जसा समजतो तसा अगोदर समजत नाहीं! (२) दुष्टांच्या भाषणरूप अग्नीनें ताप झाला तरी सज्जन हा कांहींएक बोलावयाचा नाहीं. चंदनाला अग्नीवर टाकून तो जळत असला म्हणून आपला स्वाभाविक सुवास टाकून देतो काय? (३) धीरांचे मनोरथ पूर्ण करण्यास धीरच समर्थ आहेत. हलक्या सलक्याकडून तें पुरें व्हावयाचें नाहींत. तापलेल्या पर्वताचा दाहशांत करण्यास मेघच पाहिजेत भलत्यानें तें काम व्हावयाचे नाहीं! (४) झाडांच्या मुळाशीं पाणी घातलें तरी ते धान्यांच्या शेवटीं पोंचलेले दिसतें. त्या प्रमाणें एकीकडे जरी पानांवर उपकार केला असला तरी त्याचा तें चोहोंकडे गवगवा करून देतात. न्या० सिं०

संधीवातावर विलक्षण दवा— गार्डनर्स क्रानिकल' नामक एका जर्मन वर्तमानपत्रांत असें लिहिलें आहे कीं, संधीवात ज्यास इंग्रजींत रुम्याटिझम ह्मणतात, तो मोठा खडतर रोग आहे. मधमाशीकडून संधिवाताच्या रोग्यास कित्येकवेळ दंश करवून तो रोग बरा होतो, असें एका जर्मनवैद्यानें अनेक वेळ अनुभव घेऊन सिद्ध केलें आहे. एकंदर ११३ अशा रोग्यांस १९००० वेळ मधमाशाकडून त्यानें दंश करविला आहे. प्रथमच दंश होण्याबरोबर फार वेदना होति, पण पुढें पुढें ती वेदना कमीकमी होत जाति, ती वेदना अगदीं होईनाशी झाली म्हणजे रोगी निखालस बरा झाली असें समजावे, असें तो डाक्टर आपल्या अनुभवावरून म्हणतो. सु० सिं०

---

नोटिस.

१ विठोबा २ यशवदाबाई ३ पारवतीबाई ४ इसराम केंधळें ५ कृष्णागुंगे ६ नागो ७ माहादु गाढवे ८ रावजी बोरूळ ९ मानाजी वलद विठोबा १० पिराजी बाघ ११ हरणी तळेंकर सर्व राहणार करिगांव ता० मेहकर जि० बुलठाणें यांस खाली सही करणार या नोटिशीनें असें कळवितो कीं तुह्मी सर्व आमचे जहागीरगांव करिगांव येथील शेतें वहीत करीत आहांत. त्याजबद्दल सारा सन १२९९ फसली सालाकरितां बागाईतास दर एकरी ४ रु० व जिराईतास २ रुपये प्रमाणें सारा द्यावा लागेल. वर लिहिलेले प्रमाणें आपआपल्या शेतांचा सारा ठरवून घेवून घेऊन कबुलायती, या नोटिशीचे तारखेपासून १५ दिवसांचे आंत आमचे कडे लोणार येथें येऊन लिहून द्याव्यांत. तसें सदरहु मुदतींत न केल्यास तुम्हां सर्वांनीं वरील दराप्रमाणें सारा देण्याचे कबूल केले असें समजून योग्य कोर्टांत फिर्यादी करून शेताचा सारा रु० वसूल केले जातील कळावे. ता० ७ मे सन १८८९ इ०

(सही)
गणेश सदाशिव जागीरदार
संस्थान श्री मारुती क०
लोणार दस्तुरखुद.

---

नोटिस.

तुकाराम वलद लक्ष्मण तेली रहाणार तराळे तालुका मंगरूळ जिल्हा वाशीम. यांस नोटिस देणार खुशाल वलद शिवराम पाटील रहाणार चिखलगांव तालुका व जिल्हा अकोला नोटिशीनें असें कळवितों कीं तुह्मी तारीख २२ माहे एप्रिल सन १८८९ इसवी रोजीं नोटिस पोस्टमार्फत दिली ती पावली. तुह्मी नोटीशींत कळविलें आहे कीं तुह्मी अज्ञान असतांना तुमचे मातोश्री पासून अडीशें २५० रुपयांचा गहाणखताचा दस्तऐवज करून घेतला व या पैशाचे तारणार्थ तुमची शेतें ५ पांच घर, गाय गोऱ्हे चरवी, कोपर व आंब्याचे झाडाचा हिस्सा वगैरे जें लिहून घेतलें तें गहाणखत ताबेगहाणखत नसतांना आमचे मातोश्रीस फसवून तुह्मी आपल्या ताब्यांत ही सर्व मिळकत घेतली त्यांस आठ वर्षांवर काळ होऊन गेला आहे व गहाणखताचे शर्तीं बाहेर ही मिळकत ताब्यांत घेतल्या मुळें वर लिहिलेल्या मुदतींत हक्क नसतांना जो फायदा आपण भोगिला तो गैर कायदेशीर असल्या मुळें आह्मास परत देण्यास तुह्मी पात्र आहांत. वगैरे मजकुराची जी नोटिस आह्मास मिळाली तिचा जबाब आह्मी असा देतों कीं, आपल्या लिहिल्या प्रमाणें सर्व गोष्टी आह्मी कबूल करूं शकत नाहीं फक्त एवढेंच कळवितों कीं गहाणखत, ताबेगहाण खत नाहीं हें खरें आहे परंतु आपले लिहिल्या प्रमाणें त्यांत लिहिलेला मल तुह्मी आमचे ताबेंत दिला नाहीं. व आह्मी ताबेंत घेतला नाहीं. व या कारणा मुळें त्याचे वर लिहिलेल्या मुदतींतील उत्पन्न नफ्या करितां आम्ही कोणचेही रितीनें जबाबदार होऊं शकत नाहीं.

शिवाय हल्लींचे नोटिशीनें तुह्मास असें हो कळवितों कीं वर लिहिलेल्या दस्तऐवजावरून मुद्दल व आज पर्यंतचे व्याज मिळून दाम दुपटावर रक्कम झाली आहे त्यापैकीं कायदेशीर रितीनें जी रक्कम वसूल करण्यास आह्मास हक्क आहे ती ही नोटिस आपल्यास पावल्या पासून आठ ८ दिवसांचे आंत आह्मास पावती करावी त्या प्रमाणें जहालें नाहीं तर आह्मी रिती प्रमाणें कोर्टांत दावा आणून तारण असलेले मालावर हुकूमनामा मिळवून कर्ज वसूल करण्याची तजवीज करूं व अखेर निकाल होईपर्यंत जें नुकसान वगैरे व या नोटिशीच्या खर्चासुद्धां सर्व भरून घेतलें जाईल. याप्रसंगीं आणखीही एक गोष्ट कळविणें रास्त आहे ती ही कीं तुमचे सदरील लिहिलेल्या गहाण जागेवर आम्ही सखाराम पाटील व पुरणाजी पाटील व नरशिंग पाटील या सर्वांची बळदें व आमचा कोठा तुमचे बापाचे वेळे पासून आहेत व गहाणखत हें नंतर फार मागाहून झालें आहे म्हणून कोठें व बळदें यांचा व गहाणखताचा कोणच्याही प्रकारें संबंध नाहीं. म्हणून दिली नोटिस सही तारीख ७ माहे मे सन १८८९ इसवी.

सही
सहीची निशाणी खुशाल वलद शिवराम
पाटील यांच्या हातची असे.

---

☞ हें पत्र अकोला येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

स उभरवेर ... ६८
किरकोळ अंकास............................०४
नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ..........०१

Per annum ...

Alvert
Below
per li
Repetiti

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII | AKOLA MONDAY 20 MAY 1889 | NO. 19

वर्ष २३ | अंकोला सोमवार तारीख २० माहे मे सन १८८९ इ० | अंक १९

*K. B. Rele and co.s' most efficacious.*
*PREPARATIONS.*

१ धातु पौष्टिक शक्तिवर्धक
गोळ्या.

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या याच आहेत अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणांनीं झालेली क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांढुरता, मनाची उदासीनता, नीर्णज्वरानें, हगवणीनें खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वमावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, निद्राभंग, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलात्वीतीच्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वमें पडणें, हीं ह्यांच्या शेवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर टवटवी येतें मज्जातंतुस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढते प्रत्येकानें याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे.

२ परम्यावर खात्रीचे बहतार
औषध.

हें बिनधोक अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात परमा कितीही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हें ही परम्यावर रामबाण आहे. किं० ०८ आणे.

४ धुपणी ( प्रदर ) वर अ-
, मोलिक औषध

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तवृद्धि होऊन शक्ति येतें. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध

वरील औषधा बरोबर हे वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें क्वचितच. किंमत ०८ आणे.

६ सर्व प्रकारच्या जखमांवर
मलम.

घट्टा, चांदी, सर्व नव्या व जुन्या जखमा घाय इ० मिटविणारे मलम कायतें हेंच किं० ८ आणे.

७ खोकल्यावर अचुक औषध.

यानें कफ सुटा पडतो, पडसें, दमा जातो, क्षयाचा,, डांग्या घशांत गुदगुळी होऊन येणारे इ० खोकले अचुक बरें होतात. किं. १२ आणे.

८ तापावर रामबाण औषध.

हिवताप, पाळीचाताप, अंतरताप, जीर्णज्वर, यांवर तर हे रामबाण आहे नंगळ किंवा म्यालेरियल नांवाच्या तापावर हें वस्ताद आहे. यानें भूक लागते अन्न पचतें. किंमत १२ आणे.

९ अजीर्ण, अतिसार, यांवर औषध.

अजीर्ण, अतिसार. संग्रणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यांत हें कधींच मागें हटलें नाहीं. किंमत १२ आणे.

या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकीटा मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांशः—

"के. बी. रेळे यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेलीं सर्व (वरील) * औषधीं मी लक्ष पुर्वक तपासून पाहिली. तीं फार गुणकारीं असून निर्धोक आहेत.

( सही ) डाक्टर वि. वि. गोखले,
"एम. ए. एम. डी."

सूचना--अनुपानाचा कागद औषधा बरोबर असतो घाऊक घेणारास चांगलें कमिशन मिळेल. प्याकिंग व पोस्टेज शिवाय पडेल.

विशेष सूचना—आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारची दुसरी इंग्रजी औषधें जसे, पेनकिलर, क्लोरोडाईन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, वाऱ्याचीं तेलें मलम, साबू, पोंव्हाश, टिंकचर्स, सल्याईन्स, इनोज, फुरुट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारी औषधें व शस्त्रें, वगैरे व तरुण व वृद्ध यांस लागणारे उत्तम गारेचे चष्मे, मुबईंत आल्या शिवाय, लागण्या योग्य नंबरांचे पाठविण्यांत येतील त्याच प्रमाणें औषधांची व इतर पुस्तकें ही पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्ह्यालुपेएबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं नाटपेड पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खालील पत्यावर करावा.

पत्ता. के. बी रेळें कंपनी,
जुबिली मेडिकल हॉल
काळबादेवी- पटेल स्वांकरोड मुंबई
हीं औषधें सर्व इंग्रजी औषध विकणाराकडे व गांधीकडे मिळतील.

## गरमीचे रोगावर
## औषध.

शरीरांत गरमी होऊन धातु बिघडत व ती स्त्री संग समयीं पांच दोन मिनीटांतच पतन होतें. झोपेंत व मुत्र समई पतन होतें परम्याचा रोग उत्पन्न होतो शरीराचा दाह आदीकरून अनेक पीडा होतात हा रोग ज्यांस आहे त्याणी अवलेह घ्यावा. गोड व अनुभविक आहे. एक डब्यांत तोळे २८ किंमत रुपये २ डाक खर्च १० आणे.

## अन्न पचन होण्याचें
## औषध

अन्नपचन नाहीं त्यास मळमुत्र साफ होत नाहीं. पोट दुखतें, पोटांत वायु वरतो, छातींत कफ पित्त होऊन मळमळतें, खोकला होतो, मळमार्गानें शेव पांढरे रंगाचो पडत, शरिरांत वात फिरतो, अशक्तता येते. हा रोग ज्यांस आहे त्याणी पाकवडी औषध घ्यावें. एक डब्यांत तोळे १६ किंमत रुपये २ डाक खर्च ९ आणे.

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन
वैद्य पेठ सदाशिव पुणें सिटी.

## विक्रीस तयार.

कळविण्यांत येतें कीं बंगाल नागपूर रेल्वे स्टेशन गोंदिया येथें ऐन व बिजाच्या चांगल्या सरळ व जुन्या अशा मयाली सुमारें २००० आहेत. लांबी बारा फुटापासून वीस फूट पर्यंत व चौरस एक फुट. याची माहिती पाहिजे असल्यास खालीं सही करणाऱ्याकडे मिळेल.

आपाजी विनायक कॉनन्ट्राक्टर गोंदिया.

वऱ्हाडसमाचार.

मिती वैशाख वद्य ६ शके १८११

पारीस येथील मोठें प्रदर्शन गेल्या पंधरवड्यांत खुलें झालें. मागें अकरा वर्षां पूर्वीं पारीस शहरीं असेंच मोठें प्रदर्शन भरलें होतें. त्या वेळच्या प्रदर्शनांत आणि प्रस्तुतच्या प्रदर्शनांत नवीन अस्मानीचें अंतर आहे. मागें माल नेण्या आणण्याचा खर्च निरनिराळ्या सरकारांतून मिळत असे आणि लोकांकडून पैशाचा पुरवठा चांगलाहोत असे. परंतु या वर्षीं तसा कांहीं प्रकार नव्हता. सरकारापाशीं किंवा लोकां जवळ पैसा बिलकूल मागितला नाहीं. खर्च पाहून किरकोळ कर वगैरे प्रदर्शना निमित्त बसविले होते त्या मुळें सर्व व्यवस्था चांगली झाली. हिंदुस्थानांतील जिन्नसासाठीं 'हिंदुस्थानचा राजवाडा' नांवाची नवीन इमारत उभारली होती. हिंदुस्थानांतील कलाकौशल्य पाहून सर्व लोक थक्क झाले. चहाची लागवड करणाऱ्या मंडळीनें हिंदुस्थानचा चहा प्रदर्शनात विकण्याच्या अटीवर ५००० पौंडाची उदार देणगी दिली होती. हिंदुस्थानची माहिती असलेले गृहस्थामध्यें सर जार्ज बर्डउड साहेब 'इंडियन प्यालेस' संबंधानें मुख्य अध्यक्ष होते. या वेळीं हिंदुस्थाना निमित्त किती खर्च झाला हें कळलें नाहीं. तरी सन १८८४ सालीं व्हियना शहरीं प्रदर्शन झालें होतें त्या वेळीं हिंदुस्थान सरकारांतून ३०००० पौंडाची मोठी मदत मिळाली होती त्यावरून हा एक बडा खर्च या सालच्या प्रदर्शनानें आपल्या युक्तीनें वांचविला आणि परभारें प्रदर्शना पासून जबरें उत्पन्न करून भागविलें हें लक्षांत ठेवण्या सारखें आहे.

गोरगरिबांच्या सोयी साठीं उन्हाळ्या निमित्त कांहीं दिवस व्यवस्था सरकारांतून होईल काय ह्मणून आह्मी दोन तीन आठवड्या पूर्वीं प्रश्न केला होता पण त्या संबंधानें एक चकार ही कोणी काढिला नाहीं. मोघमांत लिहिण्या पेक्षां कांहीं थोड्या नेमक्या गोष्टी सुचविणें प्रथम फलद्रुप होईल अशी उमेद धरून आज लिहीत आहों. 'बहिमनजी' धर्मशाळा अकोल्यास मध्यंतरी आहे तेव्हां त्या ठिकाणीं सर्व ज्ञातींच्या लोकांच्या उपयोगीं साठीं पाणपोईची तजवीज व्हावी; आणि मोलमजुरी झाल्या नंतर घटका दोन घटका विश्रांती घेतां येईल अशा तऱ्हेची तटीमिटी लावून ऐन दुपारच्या वेळेस आरामाची गार हवाशीर जागा करून द्यावी. घड घर ना दार व ओली कोरडी मीठभाकर मिळणाऱ्या लोकांस वरील व्यवस्था करून देण्या कडे आमची गर्भश्रीमान व सुखवस्तु मंडळी चार पैसे खर्चीं घालील तर सरकारांतून ही थोडीबहुत मदत मिळेल आणि त्याच्या मोबदला अनाथ दुबळे लोक सप्रेम दुवा देतील त्याचीं मातबरी आह्मी गजान्त लक्ष्मी पेक्षां ही अधीक मानतों. ह्या सूचना अगदीं साध्या व सोप्या आहेत त्यांकडे थोडाबहुत कृपाक्षेप झाल्यास या प्रकरणांत मागाहून सविस्तर लिहिणार आहों. दैववशांत् या धर्मशाळेचे संस्थापक मे. बहिमनजी जामासजी सी. आय. इ. हे खुद्द अकोल्यास आहेत तर ते या कामीं मोठ्या उत्सुकतेनें साह्य करतील आणि आपल्या नांवलौकिका प्रमाणें हे छोटेखानी श्रेय जोडतील अशी आशा वाळगतों.

बेलेवर बेल आणि शिमग्यावर खेळ ह्या ह्मणी प्रमाणें प्रसंग येत गेल्या शिवाय गोष्ट निर्णयास लागत नाहीं. प्रेताचें दहन करावें किंवा प्रेताला मुठमाती द्यावी या संबंधानें मोठा तंटा युरोपांत उपस्थित झाला होता त्यावर वादविवाद व्हावा तितका न होतां तो

पुष्कळ वर्षे मागें पडला होता. हल्लीं पुन्हा हा प्रश्न लार्ड एग्नो मेले तेव्हां पासून पूर्ववत् निघाला आहे. हिंदु लोकांचे प्रेत दहनाची चाल चांगली अशी पुष्कळ राष्ट्रांतील लोकांची अलीकडे पक्की खातरी होत आहे. ह्या दहनाच्या चालीवर लार्ड श्याफ्टबरी यांनीं आक्षेप काढिला होता कीं धर्मी करितां प्राण देणारे साधु लोक धर्मा साठीं स्वतांस अग्नी मध्यें जिवंतपणीं जाळीत असत तर हल्लीं सर्व लोक प्रेतें दहन करूं लागले तर मागील साधूंची स्पर्धा व अवहेलना केल्या सारखें होईल. ह्या कोटीक्रमांत हांशील नाहीं तरी मौजेचा खरा. पाद्री हावीस साहेब यांनीं आणि मि. हेनरी थामसन यांनीं दहन विधीचा प्रघात इंग्लंडांत आणि फ्रांसांत सुरू करण्या साठीं दीर्घ प्रयत्न चालविले आहेत. अन्य खंडांतल्या लोकांना न सांगतां न सवरतां आपल्यांतील चांगल्या गोष्टीचें अनुकरण होत आहे. परंतु आमच्या देशांतील कांहीं जातीच्या लोकांस ही सुधारणा करणें अद्याप आवडत नाहीं हें आश्चर्य नव्हे काय! सरकारी कायदेकानु सारखी वैद्याची रामबाण गोळी मिळाल्या शिवाय गुण येणें मोठें कठीण आहे.

वर प्रेत दहना संबंधानें लिहितांना अकोलेकरांस एक जुनी सूचना करण्याची दुबारणी करणें आम्हांस विशेष अगत्याचें वाटतें ही सूचना येथील स्मशानभूमीच्या प्रकरणांत आहे. दोन अडीच वर्षांपूर्वीं येथील स्मशानांत बसण्यास ठिकाण नाहीं, निवाऱ्याची जागा नाहीं, पाउसाळ्यांत लोकांचे फार हाल होतात इत्यादि कारणामुळें सुमोर चारशे रुपयापर्यंत वर्गणी जमा केली होती आणखी त्या रकमेंत आमचे उदार रावसाहेब देवराव विनायक वकील हे स्वतः पांचशेपर्यंत देणगी देणार होते. जमा झालेली वर्गणी अनामत आहे. आणि कांहीं वसूल होणें आहे. परंतु थोड्या दिवसानंतर सर्व हालचाल बंद झाली कांहीं मंडळीच्या अंगांत स्मशान वैराग्याचें वारें शिरलें तेव्हां ह्या वर्गणी गोळा करण्याचा आणि बाबतेत बसविण्याचा बार उडाला पण नळी फुंकली सोनारें इकडून तिकडे गेलें वारें या म्हणी प्रमाणें पुढील प्रकार दृष्टीस पडत आहे. पावसाळा समीप येत चालला आहे, आणि प्रसंग पडतो तेव्हां स्मशानास जाणें चुकत नाहीं तर ह्या बिनतोड गैरसोयीची दैना मनुष्याच्या हातून होईल तितकी दूर करण्या साठीं अकोलेकरांनीं आणखी एक वेळ कंबर बांधावी आणि पतकरलेलें काम शेवटास न्यावें.

'श्री भारतविजय' ह्या नांवांचें मासिक पुस्तक चालूं वैशाख महिन्यापासून निघूं लागलें आहे. त्याचा पहिला अंक आह्माकडे अभिप्रायासाठीं आला असल्याबद्दल आभार पूर्वक स्वीकार पूर्वीं केलाच आहे. ह्या पुस्तकाचा साचा रायलडेमीचा अष्टपत्री आहे. एकंदर पृष्टें सोळा आहेत. पुस्तकाची वर्गणी अवघी दोन रुपये आहे. टपालखर्च वर्गणीदारांवर पडणार नाहीं. यांत सर्व तऱ्हेच्या विषयांचा संग्रह होत जाईल. इतर मासिकपुस्तकापेक्षां यांत विशेष सोयी ह्या आहेत कीं हुषार विद्वान वर्गणीदारांकडेस ह्या पुस्तकांत निबंध लिहिणें सोपविलें आहे, आणि त्यांनीं महिन्यापूर्वीं नमुद केलेल्या विषयावर लेख लिहिण्याचें मनावर घ्यावें ह्मणून विषयाच्या महत्वाच्या मानानें निरनिराळीं बक्षिसें ठेविलीं आहेत. अर्थात् उत्तम निबंध लिहिणाऱ्या वर्गणीदारांस ठरविलेलें बक्षीस मिळावयाचें हें उघड आहे. ह्या मासिक पुस्तकाचे प्रकाशक 'जे भारतिया आणि ब्रदर्स' हे आहेत. यांनीं 'भारतविजय' सदोदित सुरळीत चालावें ह्मणून वरील बक्षीसाची साधी आणि फायदेशीर सोय काढली आहे यामुळें त्यांच्या मतें लोकाश्रयाची कमताई पडणार नाहीं; तेव्हां अशा भक्कम पायावर उभारलेल्या मासिक पुस्तकाच्या इमारतीस तालावर ताल चढतील आणि वर्षानुवर्षे त्या ठिकाणीं भरभराटी होत जाईल तर मूळ उद्देशाप्रमाणें कार्यसिद्धी होत आहे हें पाहून आह्मांस मोठा आनंद वाटेल.

परंतु प्रस्तुतच्या 'भारतविजयाच्या' छोट्या स्वरूपावरून पहातां कोल्ह्याच्या शिकारीला वाघाच्या शिकाराची सामुग्री नेण्याचा घाट घातला आहे. मागें आम्ही आपल्या वर्तमान पत्रांतून 'मेसर्स जे भरतिया आणि ब्रदर्स' या मंडळीच्या मोठमोठ्या जाहिराती महिनेगणती प्रसिद्ध केल्या आहेत. त्यांत १५००० रुपये आणि १०००० रुपये वांटून द्यावयाचे आहेत. त्यांत जशी मानसिक श्रमानें सहज मोठमोठीं बक्षिसें मिळवितां यावी म्हणून योजना केली आहे त्याप्रमाणें ह्या मासिक पुस्तका संबंधानें नवीन भगीरथ प्रयत्नानें युक्ति काढली आहे. 'भारतविजयाच्या' वर्गणीदाराकरितां शिवाय थोड्या रुपया भराच्या खर्चांत रुपये १०० ची पालिसी ह्मणून आयुष्याची विमा उतरण्याची पद्धत सुरू केली आहे. वरील मंडळीनें आपले मांडवल आणि आपली स्वतांची आजपर्यंत केलेल्या कामाची हकीकत प्रसिद्ध केल्यास त्यांच्या ब्रह्मघोटाळ्या सारख्या भासणाऱ्या जाहिरातीची आणि 'भारतविजयाची' मातबरी विशेष होईल असें आह्मांस वाटतें. पहिल्या अंकांत प्रसिद्ध झालेले विषय साधारण असून एकंदरीनें मासिक पुस्तकासंबंधानें अपवाद घेण्या सारखें कांहीं दिसून आलें नाहीं. अखेरीस हें मासिक पुस्तक उत्तरोत्तर विजयी आणि चिरायु होवो असें आम्ही मनापासून इच्छितों.

दिवाण सर सालर जंग हे महाबळेश्वरीं संधिवातानें बेदम आजारी पडले होते पण हल्लीं त्यांची प्रकृती चांगली सुधरत आहे आणि प्रस्तुतच्या माना वरून लवकरच ते चांगले निकोप बरे होतील असें वाटतें. ही आनंदाची खबर ऐकून बहुतेकांस आनंद झाल्या वाचून राहणार नाहीं.

'सोलापूर स्टांडींग कमिटीचा सन १८८८ सालचा रिपोर्ट' त्या कमिटीचे सेक्रेटरी रा. रा. प्रभाकर लक्ष्मण नागपूरकर यांज कडून आह्मा कडे येऊन बरेच दिवस झाले आहेत तरी रिपोर्टाच्या महत्वाच्या मानानें त्यांतले कांहीं मुख्य मुख्य मुद्दे वाचकां समोर आणणें फार जरूरीचें काम आहे. हा रिपोर्ट थोडक्यांत पण मोठ्या धोरणानें चटकदार असा लिहिला आहे. राष्ट्रीय सभेचे पूर्ण द्वेष्टे सर सय्यद यांनीं स्थापिलेल्या 'इंडियन पेट्रिआटीक असोसियेशनची ठिणगी दक्षिणेस हैदराबादे पर्यंत जवळ येऊन पोंचली व मुंबईहून पश्चिमेच्या वाऱ्या बरोबर कदाचित सोलापुरास आली तर प्रलय करील' ह्मणून वरील स्टांडींग कमिटी स्थापण्या साठीं सभा भरल्या आणि त्यांत ही कमिटी नेमली गेली. तारीख ९ सप्टेंबर सन १८८८ सालच्या भरलेल्या सभेंत अध्यक्षस्थान सर्वांनुमतें मि. पीरमहंमद यांनीं स्वीकारलें होतें. दुसरी सभा नंतर आठ दिवसांनीं सोलापूरच्या जुम्मा मशीदींत भरली होती तेथें 'राष्ट्रीय सभे'स सर्वांचें अनुमोदन घडलें हें पाहून रा. रा. नागपूरकर यांनीं विनंती केली कीं, आज ही संमति प्रत्यक्ष जुम्मा मशिदी सारख्या पवित्र जाग्यांत मे. खतीबसाहेब व काजीसाहेब अशा सारख्या लोकांचेसमक्ष देण्यांत आलेली आहे; तरी याचें महत्व नीट ध्यानांत आणावें आणि सर सय्यदसारखे लोक जर येथील कोणी मुसलमान लोकांस कांग्रेसचे पक्षास मिळूं नये ह्मणून फसवितील तर त्या जाळ्यांत कोणी सांपडूं नये याच सभेस आमचे बंधु 'नर्मदासिंधु' कर्ते रा. रा. यशवंतराव गोविंदराव केसकर यांनीं सुरस व मनोवेधक व्याख्यान दिलें; त्यांत वऱ्हाडांतील राष्ट्रीय सभे संबंधानें फंड वगैरे माहीती देऊन वऱ्हाडी मंडळीचा दृढ संकल्प सांगितला. ह्या रिपोर्टाच्या अखेरीस जमाखर्चाचें टीपण वगैरे देऊन शेवटी अलहाबादच्या 'राष्ट्रीय सभे'च्या समारंभांत जातीभेद वगैरे मनांत न आणितां सोलापुर जिल्ह्यांतील मंडळी एक दिलानें कशी झटली त्याचें निरुपण केलें आहे.

यंदाची 'राष्ट्रीय सभा' मुंबईस दिसेंबरच्या २६वे तारखेस भरण्याचें ठरलें आहे. चालू सालीं रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांस राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष नेमण्याचा पुष्कळ गृहस्थांचा मानस होता पण ईश्वरी संकेता पुढें इलाज नाहीं. वऱ्हाडांतील मंडळींनीं या सभे संबंधानें अद्याप पर्यंत कांहीं गोष्ट काढिली नाहीं, लोकांस तिची माहिती दिली नाहीं, यंदा त्या सभेंत करण्याच्या कामाचा मसुदा मुदतांत ठरला नाहीं तर लोकांच्या पुढें आणणें फार लांब आहे. वऱ्हाडांतील 'राष्ट्रीय सभेच्या' फंडाची शिल्लक साखळी किती आहे हें कोठें बाहेर आलें नाहीं. ही अनास्था पाहून खरो खर वाईट वाटतें. सोलापूरच्या मंडळीचे ह्या बाबदींत वास्तवीकपणें कित्ता घेण्या सारखें वर्तन आहे. वरील रिपोर्टा वरून आणखी एक सूचना करण्या सारखी आहे ती ही कीं वऱ्हाडांतील प्रमुख प्रमुख मुसलमान लोकांनीं त्यांच्या सोलापुरा कडील भाईबिरादरशीं प्रत्यक्षपणें पत्रव्यवहार ठेवून त्यांच्या मताचें चांगलें मनन करून नंतर राष्ट्रीय सभेस अनुकूळ किंवा प्रतिकूळ व्हावें.

निजाम हैदराबाद कडील कोळशाच्या खाणी दिवसें दिवस एजंट मि. लाविनस्काय यांच्या देखरेखी खाली चांगल्या भरभराटीस येतील असा अंदाज आहे. हल्लीं दर आठवड्यांस पुर्वी पेक्षा जास्त कोळसा बाहेर निघतो तो २००० टना पर्यंत वाढला आहे. शिवाय चाळीस हजार रुपये खर्च करून पाण्याची विपुलता केल्या मुळें खाणींतील मजूरदारांस खाणीचें काम फार सुखावह झालें आहे.

चालू जमाबंदी सालांतल्या हैदराबाद संस्थानच्या बजेटा संबंधानें कांहीं विचार करण्या साठीं पोलिटीकल आणि फायन्यानशियल सेक्रेटरी यांच्या वाड्यांत एक कमीटी गेल्या सोमवारीं भरली होती. तिथे अध्यक्ष नबाब मोहसीनउलमुल्क हे असून खाजगी निरनिराळ्या खात्याचे सेक्रेटरी सभासद होते. मि. डी. गांटलेट पब्लिक वर्क्स खातें, नवाब इमामउद्दवला. शाळा खातें, सय्यद अली बेलग्रामी खासगी खातें, इंतेसरजंग जमाबंदी खातें व इमादजंग न्याय व पोलीस खातें, हे सेक्रेटरी आणि ह्या शिवाय रेव्हिन्यु कडील इनस्पेक्टर जनरल मि. ए. जी. डनलाप, व मेजर गफ मिलीटरी सेक्रेटरी हे उभयतां मिळून आठ जणाची कमिटी नेमली होती. मोठमोठे अधिकारी इतके लदय लावून व एके ठिकाणीं जमून विचार करित आहेत तेव्हां निजाम सरकारचें ह्या कमिटी पासून अनेक प्रकारें हित होईल असें धोरण दिसतें.

# The Berar Samachar

MONDAY MAY 20 1889.

## THE REVISION SURVEY AND ASSESSMENT IN BERAR.

(Continued from our last issue.)

There is also another reason why a fresh survey of lands should not be held in Berar. It is well known that at the time of a survey, the subordinate officers can make their offices instruments of oppression against the ignorant kunbis by threatening them with an increase in the acreage of lands or with classifying the lands higher than they really deserve to be. The intentions of the Government might be of the very best; but as the Government is not a hundred-eyed Argus to scrutinize all the acts of the Carcoons and other subordinates much 'zoolum'

would be the result. We know how at the time of the census some of the clerks and others take an opportunity of levying their black-mail from the ignorant kunbis and a fresh survey would be very probably used for similar sinister purposes. Government might avoid all this unnecessary 'soolum' and annoyance by not having a fresh survey at all but adopting some such policy as above indicated.

The Government of Berar have not yet made public the lines they are going to adopt either regarding the fresh survey or the revised assessment. In fact the Government is consistent for it is not at all usual to publish any account of a step government intends taking with regard to the public. The public are very likely to be deeply affected by any measures Government might take so as to be prejudicial to the public; and we think that Government ought, in fairness to give out the line of policy they are going to adopt in the matter and invite criticism there on. But if this does not suit Government they might make the line of policy known to associations like the 'Berar Sarvajanik Sabha' and to other influential non official persons who are likely to know about this and whom the Government might think competent to give an opinion. If every thing is kept behind the curtain in matters like these and not allowed to come before the profane gaze of the public, the Government can not very well blame the public for mistaken criticism which the latter might make with regard to the motives and measures of government. The public must be necessarily be groping in the dark, before they get any authoritative information from responsible officers of Government. We learn that the Sarvajanik Sabha of Berar is going to apply to the Commissioner to be informed of the views of Government in the matter, and if the Government does not take the initiative by asking the Sabha's opinion, we fully trust our worthy Commissioner will duly inform the Sabha of the views of Government. Indeed, if Government wish in any way to be in touch with public opinion, and care to see that its measures are properly understood by the public, they ought to supply the Sabha with the necessary information.

So far we have tried to show that a fresh survey of land for purposes of remeasuring or reclassifying them is unnecessary. We now proceed to point out that a fresh revised assessment is neither desirable nor in any way requisite for the needs of the province. The peculiarity of the Indian government is that it is a huge land owner and the income of government is principally from that land. The needs of Berar government are very limited indeed. The province is owned by the Nizam nominally and the surplus of every year has to be given back to the Nizam. The Assigned Districts are therefore a trust in the hands of the British government and the Nizam a *cestui que trust*. The British government as trustee is bound to manage the province fairly and look to the interests of the Nizam, but they are not bound to go out of their way to benefit the Nizam by increasing the already burdonsome impost called land-revenue. The British government have no interest themselves in increasing the land revenue in Berar; for the surplus revenue if any, cannot go to swell the Imperial Exchequer, and as trustees for Nizam they are only pledged to take an ordinarily fair care of the estate under their charge. So there is really speaking no such reason as in the territories directly under British rule, to increase the land tax.)

But apart from this, is the land tax in Berar lighter than in the other provinces, and how is it borne by the people? The experience is that the land tax in Berar cannot be considered as lightly borne by the people. Berar is a fertile country and the lands here are comparatively to other districts, more yielding; and so it may perhaps be argued that the lands here can always bear a greater burden than lands in other provinces. When the first assessment was made, the capacities of the soils to yield were tested and rates were settled. The lands were then yielding on account of their being newly brought under cultivation and during the last 30 years many lands have been brought under cultivation and have by their continuous enjoyment been exhausted of their yielding capacities. It is very well known that the produce of lands 20 years or even 10 years ago was much more than at present and that lands are daily being made poorer and poorer. The vigour of the soil is not kept up by a steady system of manuring and lands consequently have begun to yield very much less than what they used to. If this element be considered even the rates of the lands as originally assessed would appear to be high.

(To be continued).

---

A critic has often asked us whether India finds a parallel in Ireland with regard to her relations with the ruling nation. We shall leave him to settle the question himself if he can find some ground to base his arguments upon in the following remark on the condition of Ireland:—

The roots of Ireland's afflictions.:—"It would be necessary, Sir Charles Russel maintains, to trouble them with a political retrospect and with the social history of Ireland. He gathered that the four main predisposing causes were these: (1) the restrictions of Irish commerce and the suppression of Irish manufacture (2) the Penal Code which, while the Commercial legislation had, on the one hand, thrown the people up on the land as their only means of their livelihood, on the other hand came in to prevent the bulk of the people acquiring any permanent interest in land (3) the uncontrolled powers of the land-lords in the exaction of oppressive rents, and(4) the general misgovernment of the country, and the consequent mistrust of that government which was generated thereby in the Irish mind. It was true to say that Ireland in that crisis.

Famine is on thy cheeks,
Need and oppression stareth in thine eyes.
Upon thy back hangs ragged misery.
The world is not thy friend, nor the world's law.

Those events taught the Irish people the necessity of combining themselves together resolutely to fight for their lives in that extremity. He did not say that they were not unworthy men who took part in the struggle but he affirmed that broadly in its main character and its main object, this was a movement and a combination which was not only justifiable before god and man, but inevitable in the state of things which then existed."

---

## वऱ्हाड.

नानारत्ना वसुंधरा म्हणतात त्याची प्रचिती मेहेकर तालुक्यांत वर्ष सहा महिन्या पूर्वी येऊन चुकली आहे. तेथें सांपडलेली श्री विष्णूची मूर्ती फारच हृदयंगम आहे. ही मूर्ती चतुर्भुज असून प्रभावळी नंतर दशावताराच्या मूर्ती खोदलेल्या आहेत. प्रभावळी सहीत उंची साधारण मनुष्याच्या उंची पेक्षां अधीक असावी. प्राचीन काळची जुनी कामें किती विलक्षण व अनुपम असतात ह्याचा दाखला सदर्हू मूर्ती वरून सहजी येईल. यात्रा मोठी भरत असते आणि देव संस्थानचें उत्पन्न देवभोळ्या भाविक मंडळीच्या श्रद्धे मुळें व नवसा मुळें चांगलें येऊं सागलें आहे रा. रा अंबादास संतो एक्ट्रा असी कमिशनर आणि रा. रा. बाळकृष्ण काशिनाथ तहशीलदार यांच्या पैरवी खाली वर्गणी पुष्कळ जमा झाली आहे आणि देवालय बांधण्याचें काम कडेकोट चालले आहे.

रा. रा. अंबादास संतो एक्ट्रा. असी कमिशनर यांच्या घरीं शिरपुरास लग्न होतें त्या समारंभा साठीं उभारलेल्या मांडवास बंदुकीच्या गोळीचा गुल भलत्या ठिकाणीं न कळतां पडल्या मुळें आग लागून बरेंच नुकसान झालें. नवशीक्या मंडळींनीं बंदुकीचे बार काढते वेळीं किंवा दारू उडवितें वेळीं हुराळल्या सारखें न करितां मोठ्या खबरदारीनें वागलें पाहिजे. ही गोष्ट लक्ष्यांत वागविली नाहीं तर अनेक प्रकारची हानी होते इकडे सर्वांनीं अवश्य लक्ष्य पुरवावें; किंवा सरकारांतून लग्न मौजींत दारू उडविण्याची परवानगी देते वेळीं कांहीं नेहमींच्या तरबेज मनुष्यां शिवाय परवानगी देऊं नये असा नियम ठरल्यास फार चांगलें होईल.

गेल्या मंगळवारीं आमचे काठेवाडचे बडे पाहुणे कुमार श्री हरबानजी असि. कमिशनर यांच्या अध्यक्षते खालीं टाऊन हालांत अकोलें तालुका बोर्डची सभा भरली होती तींत रा. रा. बाळकृष्ण बगाजी नाईक, रा. रा. पांडुरंग बापुजी रानदेकर, आणि रा. रा. विनायक नारायण कोल्हटकर यांस अनुक्रमें प्रेसिडेंट, व्हाईस प्रेसिडेंट, आणि सेक्रेटरी नेमण्यांत आलें आहे.

मे. दस्तूर बहिमनजी जामासजी सी. आय. इ. हे गेल्या गुरुवारीं आपल्या कुटुंबा सह वर्तमान महाबळेश्वरीं उन्हाळ्या निमित्त गेले आहेत.

येथील एक दारूबाज परीट अनिवार मद्यपानानें आणि उन्हाळ्याच्या तडाख्यामुळें प्राणास मुकला. हाडीं खिळलेलीं व्यसनें पाळण्यासाठीं तरी निदान मनुष्यानें बेताळ न वागण्याचें शहाणपण शिकावें.

इलिचपूरचे पेनशनर गृहस्थ रा. रा. रामचंद्र यशवंत गोडबोले आपली अल्पवयी कन्या तेथील एका वृद्ध बाईच्या हवाली करून परगांवीं गेले. पुढें त्या बाईस उत्तर हिंदुस्थानांत स्वगृहीं जावें लागलें म्हणून ती त्या मुलीला घेऊन एकाएकीं गेली तेव्हां मुलगी पळविली म्हणून बोभाटा झाला होता तसा कांहीं एक प्रकार नाहीं. मुलगी सुखरूप त्या बाई बरोबर आहे.

येथील नदीच्या पाण्यासंबंधानें मुनसिपालिटीस सुचना करावी तेव्हां थोडीबहुत व्यवस्था होते त्याप्रमाणें प्रस्तुत एक महिन्यानंतर पुन्हा पाळी आली आहे. मुनसिपालिटीस एकाच प्रकरणांत वारंवार विज्ञप्ती करणें आह्मांस प्रशस्त वाटत नाहीं कारण समंजस शहाण्या मंडळीस ह्या गोष्टी सहज कळण्यासारख्या असतात. परंतु नाइलाज झाला आहे कांकीं पाण्यास फार वास मारूं लागल्यामुळें तें पिण्यासारखें राहिलें नाहीं ह्मणून आह्मी मुनिसिपालिटीस आणखी एक वेळ विनवितों कीं, त्यांनीं पाण्याच्या संबंधानें अगोदर व्यवस्था करावी आणि लोकांस सौख्य द्यावें.

अकोल्यास एक पांथस्थ गृहस्थ काळोख्या रात्री मुळें स्वतांस झालेल्या हालाचें निवेदन करितांना कळवितो कीं येथील स्टेशनवरील व गांवांतील धर्मशाळेंत कंदील नसल्या मुळें उतारूंस भारी त्रास व गैरसोय होते तर धर्मशाळा स्थापन करण्याचे हेतु मनांत आणून मुनसिपालिटीनें कंदिलाची तजवीज लौकर करावी अशी त्यांस आमची शिफारस आहे.

रा. रा. केशव जयकृष्ण एक्ट्रा असि. कमिशनर यांची स्वारी रजेवरून परत आल्या नंतर यवतमाळास नेमणुक झाल्या प्रमाणें तिकडे आपले कामावर रुजूं झाली.

अकोटचे तहशीलदार मि. मुबारक अली यांस सव्वा महिन्याची रजा मिळाली आणि त्यांच्या रजेंत रा. रा. बाळकृष्ण बळवंत सुळे यांस आक्टिंग तहशीलदार नेमिलें आहे असें कळतें.

बऱ्या वाशिल्या खेरीज वऱ्हाड दरबारांत पाय शिरकत नाहीं. असें पाहून आमचे विद्वान मित्र रा० रा० बस्तासिंग दुनिया सिंव्ह बी ए. हे बडोदें सरकारच्या पदरीं लष्करी खात्यांत सरनोबत बनले होते हें पुष्कळांस स्मरत असेल. तिकडे त्यांचा बाजबा ठीक बसला होता. ते हल्लीं चौथ्या बट्यालियनचे आक्टिंग कम्पांडंट होते परंतु सरकारी हुकुम मोडला ह्मणून त्यांस कामावरून दूर केलें अशी वाईट वार्ता आली आहे. रात्रीची हाजिरी साडेनऊ वाजतां घेण्याचा लेखी हुकूम फिरला होता त्याप्रमाणें सुभेदार मेजर कडून अंमलबजावणी झाली नाहीं असें राजेश्री बस्तासिंग यांचें ह्मणणें आहे. चौकशी अंती हे दोषमुक्त ठरलें ह्मणजे आम्हास मोठा आनंद होईल.

---

## वर्तमानसार.

लार्ड लिटन माजी गव्हरनर जनरल फार आजारी आहेत.

Per annum ...
Per annum in advance



'आह्मा इंग्रज लोकांस आवडते कशानें होऊं' या प्रश्नाचा उलगडा महाराष्ट्रमित्र करेशात कीं लोभविष्ट जो पर्यंत त्यांची वृत्ती आहे तो पर्यंत आह्मी राज्यप्रभूंच आवडते होणार नाहीं परंतु जेव्हां भिक्षुकीबाणा बंद होईल व पूर्वी मुनी होते व ते आपपर न मानतां शरण आलेल्यास आपलेसें मानून प्रेम करीत होते, जसें वाल्ह्याकोळ्यास शिकवून वाल्मिक बनविला, कोळ्याचीं पोरें शिकऊन व्यास केला तसें हल्लींचे गोरे भट मुनी बनतील व आमची खरी सेवा तेथपर्यंत पोंचवितील तो पर्यंत हल्लींची स्थिती कायम राहील. त्यांचें वर्तन बदललें कीं, आह्मी सुखाचे मार्गास लागूं व तसें झालें ह्मणजे आह्मी तेव्हां च आमचे राज्यकर्ते प्रभूचे आवडते होऊं व त्याचे बांगुलपणाचें गोडवें गाऊं.

खाटमंडूच्या राजवाड्याची ठेवण फारच सुंदर असून शहरच्या मध्य वस्तींत अंगठींत हिरा बसवावा तशी बसविली आहे. हें शहर हिंदुस्थानच्या ईशान्य बाजूवर विष्णुमती नदीच्या कांठीं वसलें आहे. लढाईच्या कसबांत पुरे दरद्री असल्याची खात्री करून देणारे जे गुरखे लोक त्यांच्या जन्म भूमीचे हें ठिकाण आहे. या ठिकाणचे लोक फार कडवे असून अतिशय धाडशी आहेत. धारातीर्थी मरणें हें आपल्या अंतकाळचें सार्थक समजतात. अलीकडे आमचे इकडील राजेलोक विलायती धाटावर मोठाल्या इमारती उठवून निळाल्या संपत्तीचा देखावा दाखवितात. परंतु गुरखे लोका प्रमाणें राज्यभक्त प्रजा न करतां बरांगनादि नाड्या पोरींनीं आपआपलीं इंद्रभुवनें साजरी करण्यांत हजारों रुपये खर्च करून धन्यता दाखविणारास असल्या लोकांनां वेडे ह्मणावें कां शहाणें ह्मणावें? त्यांनीं हें खाटमांडू शहर व तेथील देखावा व प्रजेचे प्रेम, त्यांच्या आंगांतील धमक, त्यांची लढण्याची छाती पाहून आपल्या इकडील कसबकामास मदत देऊन आपल्या देशी पोशाखानें व विस्तीर्ण उपयोगीं, इमारतीनें आपआपल्या राजधान्या सुशोभित करून दियाख दाखविल्यास त्यांत कांहीं तरी नवरा दृष्टीस पडणार आहे. म. मि.

गुर्जर किंवा गुजराथ असें नांव पडण्याचें कारण इ. स. ३०९ या वर्षी गजर नांवाचे एक राजे तिकडल्या प्रांतीं राज्य करीत असत. त्यांनीं जंबूसरच्या ब्राह्मणांना पुष्कळ [illegible]इनाम देऊन आपल्या पदरीं ठेऊन घेत[illegible]. असा लेख खेडा येथील एक ताम्र[illegible] आहे. श्री दुशाली व श्री जयभट्ट [illegible]र्जर वंशांतील राजे होते. आणि त्यां[illegible]व हें भूमिदान केलें ह्मणून त्या ब्राह्मणांना व देशाला गुर्जर-गुजराथ-असें ह्मणतात.

नाशींस एक नवरा बायको एकमेकाच्या अग्र्यांवाटेवर आडव्या घागरी देऊन पाणी नेत होते. हें पाहून एका भामट्यानें मध्येंच नवरीला गाठून मुक्याट्यानें आपली लोखंडी घागर तिचे हातांत दिली व तिचे डोकी वरील घागर घेऊन चालता झाला. पुढें पाणी आणणें झाल्यावर घरीं येऊन पहातात तों दोन्ही ही घागरी लोखंडी! तांब्याची घागर गेली ती गेलीच.

कार्ड साहेब ब्रांयास होते ते आठ दिवसां पूर्वी गुप्तपणें आगबोटींतून पळून गेले. कोणी ह्मणतात ते आस्ट्रेलियाला गेले. खरा पत्ता कोणासच माहीत नाहीं. सावकार लोक मात्र सर्व बुडाले.

तात्या भिल्लाच्या पाठलागा साठीं पाठविलेल्या एका पोलीस अंमलदारास तात्या भिलानें न्हाव्याचा वेष घेऊन, एका रानांत गांठलें, आणि त्या अंमलदाराची हजामत करीत असतांना तात्याच्या गोष्टी काढून अखेरीस त्यास "असें पकडावें" असें ह्मणून त्या सोंगाड्या न्हाव्यानें त्या अंमलदाराच्या नाकाची बोंडी कापिली आणि आपण पलायन केलें. तात्याचा पुनः पत्ता नाहीं. क. त.

योग्य ठराव— शंभर रुपयाच्या आंतील पगाराच्या नौकरांनीं कधीं हक्काची रजा घेतली तर त्यांच्या कामावर सरकार कधीं घस सोसून उमेदवार ठेवीत नसे. आतां असा ठराव आल्याचें समजतें कीं वरील कामदारांनीं एक महिन्याची हक्काची रजा घेतली आणि त्यांचे कामाकरितां कोणी उमेदवार नेमिला तर त्याचा पगार सरकारांतून खर्च घालून द्यावा. रजा सांचवून एकदम हक्काची रजा घेणारांनीं मात्र या पुढें सावध व्हावें. धा० वृ०

उसाच्या चोथ्यापासून उत्तम प्रकारचा कागद करितां येतो हे " रेव्हू सीआन्टीफिक " नामक एका फ्रेंच पत्रावरून कळतें इंग्लंडांतील न्यूअरलान्स प्रांतांतील गृहस्थ मि० वालटर फारक्स यांनीं, ह्या चोथ्यापासून निरनिराळ्या प्रकारचे उंची कागद तयार केले आहेत. आमच्या इकडील कागदांच्या गिरणीवाल्यांनीं येथें जरूर लक्ष द्यावें. व उसाचा रस काढल्यावर जो चोथा निरोपयोगी म्हणून आमच्या देशांत फेकण्यांत येतो, त्यास अवश्यमेव उपयोगांत आणावें.

हंसवणारे झाड— पाल्ग्रेव्ह यांणी गद्य व पूर्व अरिबयांवर एक ग्रंथ लिहिला आहे, त्यांत त्यांणीं असें लिहिलें आहे कीं, त्या भागांत एक झाड आहे. त्याच्या बियांनें हास्यवायू सारखे परिणाम घडतात. कासम आणि ओमन या प्रांतात हीं झाडें फार आहेत. यांची उंची ३-४ फूट असते, व यास पिंवळ्या फुलांचे झुबके येतात. यांच्या फळांत तीन काळ्या बिया असतात. त्या पाण्यांत वाटून त्याचा घोट घेतला असतां मनुष्य मोठमोठ्यानें हंसतो, खिदळतो, गातो, नाचतो, तात्पर्य सर्व प्रकारच्या चेष्टा करीत सुमारें तासभर मोठ्या आनंदाच्या आवेशांत रहातो. तो आवेश गेला ह्मणजे एक तासभर त्यास झोंप लागते. जागा झाल्यावर पहिल्या कृतीचा यत्किंचितही स्मृति त्यास रहात नाहीं. दी० बं०

कैलासवासी विश्वनाथ नारायण मंडलिक यांनीं अनेक शोधकरून मोठ्या परिश्रमानें 'पद्मपुराण' छापण्यासाठीं तयार केलें आहे. हा ग्रंथ मोठा असून फार जुना आहे. त्याचें पुनर्जीवन रावसाहेबांनीं केलें आहे त्या प्रमाणें तो लवकर छापून प्रसिद्ध होईल तितकें बरें.

सदुद्योगास योग्य आश्रय— बाबु प्रतापरायचंद्र हे अनेक वर्षे महाभारताचे इंग्रजी भाषांतर छापून प्रसिद्ध करीत आहेत. त्याचा उद्योग अगदीं निरपेक्ष असून त्याचा खर्च स्वतांच्या पैशावर व मोठमोठ्या संस्थानिकांच्या उदार देणग्यावर चालला आहे. म्हैसूर संस्थानांतून मागें पांच हजार रुपये मिळाले होते त्यांस हल्लीं आणखी तीन हजार रुपयांची भर त्यांच संस्थानांतून घालण्यांत आली आहे.

समाजापासून फायदे आहेत त्या प्रमाणें तोटे ही आहेत. गेल्या नव्वे तारखेस वेस्टफालिया येथील खाणींत काम करणाऱ्या ३९००० मजूरदारांनीं एकदम काम सोडलें. हा कट कशामुळें झाला आहे हें कळलें नाहीं परंतु प्रस्तुत मोठा बंडावा माजला आहे आणि खाणीचें काम बंद पडल्यामुळें मोठा गवगवा झाला आहे. ह्या मजूर लोकांनीं त्रेधा उडविली आणि बेताल शिरजोरा वर्तन करूं लागले ह्मणून लष्कर बोलावून शांतता करणें भाग झालें.

एखाद्या मोठ्या मनुष्याचा स्नेह संपादन करून त्याजपासून ज्या कोणास महाश्रमानें ही असाध्य अशीं महत्कार्यें साध्य करून घ्यावयाचीं असतील; गुप्त चौरकर्मे करून, दरोडे घालून, लुटालूट करून, खून करून उलट स्वतःस साव ह्मणून घेण्याची उत्कंठ इच्छा असेल, त्यानें "अन्यायदेवते"च्या राज्यांतील स्तंभाचा "ग्लिड लांच– राजमार्गिकडील." रस्ता सुधारावा. हा लांचमार्ग राजमार्ग असून फारच प्रशस्त आहे. या राजमार्गाच्या दोहों बाजूस मुर्खपणाची चिरेबंदी गटारें बांधलीं आहेत. "दुःखाच्या डोंगरा" वर पर्जन्यातिशय झाला म्हणजे, दुःखीयानें ही गटारें तुडुंब भरून वाहूं लागतात. ठिकठिकाणीं रस्त्याच्या दोहोंबाजूंनीं कंदील स्तंभारूढ आहेत. "अन्यायदेवता" फार धनाढ्य असल्या कारणानें हें रात्रंदिवस जळत असतात. कितीही झंझावात सुटला तरी हें विझावयाचे ह्मणून नाहींत. "अज्ञानदीपस्तंभ" ह्मणून जे ह्मणतात ते हेच. रस्त्याच्या दुतर्फा गगनचुंबित असे 'कांचनवृक्ष' घनदाट लागून राहिले आहेत. या वृक्षावरील क कवल्लींनीं तर रस्त्याच्या दोहों बाजूंच्या समोरासमोरील वृक्षांचें मित्रत्व जुळवून आणण्याकरितां आपआपले हस्त पुढें सरसावून अगदीं तयारी दाखविली आहे. भुकेल्या प्रवाशाकरितांच जणूकाय, वृक्षसमूह कटुफलांच्या मोठमोठ्या घोसांच्या असह्य भारानें अगदीं ओथंबून गेले आहेत तान्हेल्यांसाठीं ठिकठिकाणीं "विषवाटिका" "अबलेशाला" "बाटलपेढी" (पाणपेई नव्हे हो!) "मांसविक्रयगृहें" "अफेयपेयगृहें" (जेथें अपेयेपानाची अगदीं रेलचेल उडून जात आहे.) अशा एक ना दोन हजारों "नवीन" "अगदीं नवीन" अशा अक्षरांनीं सुशोभित केलेल्या पाट्या फडकत असणाऱ्या संस्था! वि० ज्ञा० वि०

आपले लोकांत घरासमोर बगीच्या राखण्याचा शोक फारच थोड्या लोकांस आहे ही वाईट वाटण्यासारखी गोष्ट आहे. घरासमोर बाग करून त्यात चार घटका खपण्याचा नाद लागल्यास त्या पासून आपल्या आरोग्यावर हितकारक असे परिणाम घडतात इतकेंच नव्हे तर त्याचे परिणाम आपल्या वित्तशक्तीवर ही चांगले होतात. या संवयीपासून मनुष्याचे अंगीं एक प्रकारची विलक्षण भूतदया उत्पन्न होते व तिचे परिणामही फारच चांगले होतात. देवपुजेसाठीं आपल्या हातानें केलेल्या बागांतून तुळशी, बेलफुलें तोडून आणून ईश्वरार्पण करण्यात जास्त भूषण वाटतें असे लोक आपणास अजून ही दृष्टीस पडतात. परंतु नशा इतर चांगल्या गोष्टी आपल्या मधील नाहींशा झाल्या तशीच ही ही एक नाहींशी झाली असल्यामुळें त्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठीं जशी आपली खटपट चालूं आहे. तशीच माळीपणाचें कसब सुधारण्याविषयीं झाल्यास आपला अनेक तऱ्हेनें फायदा होण्याचा संभव आहे. शि. वि.

मुंबईस हल्लीं ग्यासाचे दिवे लावतात त्याचा मक्ता एका कंपनीकडे आहे. या मक्त्याची मुदत एकवर्षानें संपते तेव्हां पुढें विजेचे दिवे शहरभर लावावे ह्मणून मुंबई मुनसिपालिटीचे सभासद मि० कोब्राजी यांनीं सुचना केली होती ती मंजुर झाली आहे. निदान मुंबईस आतां वर्षभरानें विजेचे दिवे सुरू होतील ही मोठी आनंदाची गोष्ट आहे.

'बिव्हानिया एन सायक्लोपिडीया' नांवांची सर्व ज्ञानसंग्रह ग्रंथाची द्वितीय आवृत्ति झाली आहे. त्याची मोठमोठीं वीस एकवीस पुस्तकें बांधलीं आहेत. त्यांत जे लेख आले आहेत त्यांच्या लिहिणारांची नामावळी प्रसिद्ध झाली आहे त्यांत वाईट वाटण्या सारखी गोष्ट ही कीं हिंदुस्थानांतील एकही नेटिव गृहस्थ नाहींत.

अरिष्ट प्रस्तावना— लाहोर कडील एका सुज्ञ तत्ववेत्यांनीं भविष्य केलें आहे कीं प्रस्तुतचे तिकडील हवामान बदलेलें आहे तें साधारणपणें सन १८८९ सालच्याप्रमाणें सर्वथैव भासतें तेव्हां त्या सालप्रमाणें यंदा ही लहान मोठे धरणीकंप काश्मीरकडे होतील आणि तीन वर्षापुर्वीप्रमाणें लोकांचे जिवित्वावर मोठें संकट येऊन पडेल. ईश्वर करो आणि हा इडापिडा टळो.

नवीन मोर्चा— इंडिया आफिसांतील लष्करी सेक्रेटरी जनरल एलन जानसन यांच्या जागीं मेजर जनरल न्यूमार्च यांची नेमणूक झाली आहे तेव्हां हा नवीन मोर्चा हिंदुस्थानास कितपत लाभतो पहावें.

कन्या विक्रय— मुंडी संस्थानांत सुमारें वीस मुली दासीबटक्याप्रमाणें विकल्याबद्दल कुलूचे कमिशनर पुढें तक्रार आली आहे. योग्य चौकशी होऊन हा गुलामगिरिपेक्षां अधमपणाचा व्यापार बंद होईल तितका बरा!

चितगांग आणि आसाम रेलवे कंपनीनें मागणें केलें आहे कीं एक मैल रेल पडण्यास दहा मैल जमीन देण्यांत यावी. देणार घेणार निराळे आणि मूळचा मालक निराळा असला ह्मणजे अशा प्रकारचा सौदा लवकर पटतो.

हिंदुस्थानचा तेजस्वी 'तारा' सर सय्यद अहमद यांचा प्रकाश दिगंतरीं फांकला असें वाटतें. थोर गृहस्थांस मान कोठें ही मिळावयाचा त्याप्रमाणें ह्या गृहस्थांस एडिनबरो युनिव्हरसिटीकडून सन्मानार्थ 'डाक्टर आफ लॉस' अशी पदवी मिळाली आहे. अलीगरचें मुसलमानी कालेज, राष्ट्रीय सभा इत्यादि गोष्टीमुळें मशारनिल्हे सय्यद विख्यात आहेत.

---

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

पहामाही " ३ " ८९
साळभरेर " ७ " ८९
किरकोळ अंकास.............................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .........०३

Per annum in advance 5 Postage 13 as.
Per annum in arrears 7 "1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as.
Single copy..................................4 as

Advertisements
Below 10 lines...2Rs.
per line over10... 4as
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII | AKOLA MONDAY 27 MAY 1889 | NO. 20

वर्ष २३ | अकोला सोमवार तारीख २७ माहे मे सन १८८९ इ० | अंक २०


## पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यां च्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

मुक्काम वाशीम तारीख २०।५।८९

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांसः—

कृतानेक साष्टांग नमस्कार वि० वि० ह्या ठिकाणीं सार्वजनिक कामा साठीं स्वतंत्र इमारत नसल्या मुळें फार अडचण पडत असे. ती दूर व्हावी असें पुष्कळांचे मनांत येई. परंतु त्याला पैशाची मदत पाहिजे त्या बद्दल कांहीं उपाय सुचेना. तेव्हां तें काम तसेंच लांबणीवर पडलें होतें. दोन वर्षां पूर्वीं चक्रवर्तिनी श्री व्हिक्टोरिया महराणी यांच्या कारकिर्दीस आरंभ झाला त्यास पंनास वर्षें झाला त्या प्रित्यर्थ महोत्सव झाला त्या वेळीं त्या महोत्सव बद्दल जिल्ह्या जिल्ह्यांत वर्गणीची रकम जमली होती त्या रकमे विनिमय कसा करावा अशा विषयीं विचार करितां असें ठरलें कीं ही रकम खर्च करून येथें एक जुबिलीचें स्मारक ह्मणून (Town Hall) टाऊन हॉल बांधावा परंतु इतक्या रकमेंत इमारत होणार नाहीं. या साठीं आणखी वर्गणी जमा करण्यांत आली. तिचा तपशील येणें प्रमाणेः—

१००० जुबिलीच्या रकमे पैकीं शिलक.
२१००८।२०३ ह्या कामा साठीं लोकांकडून जमा केलेली वर्गणी.
१००० म्युनिसिपालिटीनें दिलेली रकम.
१५०० लायब्ररीची जुनी इमारत विकून आलेला पैसा.

६१००८।२०३

इतक्या बाबतींतून ही रकम जमा करण्यांत येऊन गांवांतील सभ्य गृहस्थांच्या मतें चावडी समोरील पाडलेल्या गढीच्या ठिकाणीं ह्या इमारतीचा (Foundation stone) पायाचा दगड चार पांच महिन्या पूर्वीं बसविण्यांत येऊन मि. उइलसन साहेब ओव्हरसीयर यांचे देखरेखी खालीं ही इमारत तयार झाली. ह्या इमारती मध्यें तीन कामांच्या सोई केलेल्या आहेत. मध्यें एक हॉल व दोहों बाजूस दोन खोल्या आहेत. एक वाचन गृहा करितां (Library Room) व दुसरी म्युनिसिपल आफिसा करितां. हॉलाचा उपयोग मुख्यत्वेंकरून सार्वजनिक कामा साटीं सभा वगैरे जेव्हां भरावयाची असेल तेव्हां करावयाचा. ह्या इमारतीचें लांकूड मुंबई कडील आणिलेलें आहे असें दिसतें. खिडक्या मोठ्या मोठ्या असून दरवाजेही फारच मोठे असल्या कारणानें इमारत हवाशीर व आंत उजेड पुष्कळ पडतो. अद्याप पुष्कळ काम होणें राहिलें आहे. छावणीवर टिनाचे पत्रे घातले आहेत व आंतून फळ्या मारल्या आहेत तेणेंकरून लहान परंतु थोडक्यांत टुमदार इमारत दिसते. ह्याहून थोडी मोठी झाली असती तर विशेष शोभा आली असती. परंतु आमच्या वाशिमा सारख्या ठिकाणीं ही तरी झाली हें तरी आमचें नशीब समजलें पाहिजे. व या बद्दल मि. नबलीस साहेब डेपुटी कमिशनर यांचीं जितकी तारीफ करावी तितकी थोडीच आहे. हे साहेब बहादूर स्वगृहीं लवकर रजेवर जाणार या कारणानें तारीख १७ माहे मजकूर रोजीं ह्या इमारतीचा प्रवेश समारंभ (वास्तुशांती) झाला. ह्या इमारतीच्या सभोंवार सुमारें इमारती पासून दहा बारा फुट लांबीवर एक लांकडी कमान केली होती. त्याजवर पणत्या लाविल्या होत्या इमारतींत जाण्या करितां एक मोठा तांबड्या कागदाचा दरवाजा कातरून त्यावर मोठीं अक्षरें कातरून जुबिलीचें स्मारक अशीं अक्षरें लाविलीं होती. त्या कठड्या सभोवार चित्रविचित्र रंगाचीं निशाणें व केळीचीं झाडें लाविल्यानें बाह्यात्कारें फार शोभा दिसत होती. आंतील देखावा पहातां इमारतीच्या भिंतीला नूतन सफेदी दिलेली होती आंत बांकांच्या रांगा व त्यांच्या पुढें खुर्च्यांची दुतर्फा ओळ ठेविली होती. जिल्हाधिपतीची स्वारी इतर युरोपियन मंडळीसह विराजमान व्हावयाची त्या ठिकाणीं दोन वाटोळी मेजें जोडून ठेविली होती. त्यांजवर (Table cloth) आच्छादन नव्हतें यामुळें थोडेसें व्यंग दिसत होतें. या टेबलांच्या मागें खुर्च्या ठेविल्या होत्या. भिंतीना खिळे मारून त्याजवर चिमन्या लाविल्या होत्या. छत दिलें पाहिजे होतें परंतु व्यवस्थापक मंडळीच्या लक्षांत ही गोष्ट कशी आली नाहीं कोण जाणें. हें नसल्यामुळें थोडेसें कमीपणास कारण झालें. गांवांतील सभ्य लोकांस निमंत्रणपत्रिका अकोल्याहून छापून आणलेल्या वाटिल्या होत्या. निमंत्रणाशिवाय इतर मंडळी बरीच जमली होती. दिवस मावळल्यापासून मंडळी जमण्यास आरंभ झाला. निमंत्रणाची मंडळी येण्यापूर्वींच आगांतुक मंडळीनें जागा व्यापून टाकिल्यामुळें निमंत्रित मंडळीस उभें राहावें लागलें असें ही कित्येक ह्मणत होते असें झाल्यामुळें थोडीशी अव्यवस्था दिसून आली तरी व्यवस्था करणारी मंडळी दोनतीन असल्यामुळें त्यांनीं कोठेंकोठें ह्मणून पाहावें. यामुळें कोठें न्युंनाधिक्य झाल्यास त्याचा दोष व्यवस्थापकांवर नाहीं तर अव्यवस्था करण्यास कारण झाले असतील त्यांजवर देतां येईल.

ह्या समारभाकरितां हजर असलेल्या मंडळीपकीं मुख्य मंडळी—

Mr. Knowlys Deputy Commissioner
Mr. Heath Police Superintendent
Mr. Jones Civil Surgeon
Mr. More Missionery Preachar
Mr. Wilson Overseer.
Mr. Pandit Suraj Narayan Asst. Commissioner.
Mr. Ayodhya Prasad Extra Do. Do.
Mr. Hasmatali Attache
Mr. Rishi Deputy Edl. Inspector
Mr. Purushotam Ganesh Head Master.
Mr. Yeshwant Waman Pleader.
Mr. Pandurang Vinayak Do.
Mr. Ramrao Sahib Do.
Mr. Shesharao Raghunath Do.
Mr. Buldeo Sing Police Inspector.
Mr. Sayana chief Constable
Mr. Narayan Hari Pandit Do.
Mr. Tukaram Ramchandra Pathek,
Mr. Kavale Clerk of Court

ही मुख्य मंडळी असून या शिवाय आणखी पुष्कळ सभ्य गृहस्थ व बाळ समुह फार मोठा होता. सर्व लोक आल्या नंतर मिस्तर नौलीस साहेब यांची स्वारी साडे आठ वाजतां आल्याबरोबर पोलिसच्या शिपायांनी त्यांना सलामी दिली नंतर स्वारी पोलिस सुपरीटेंडंट साहेबा बरोबर आंत आल्यावर सर्वांनीं साहेब बाहादुरांना खडी ताजीम दिली. साहेब बाहादुर आपल्या आसनारुढ झाल्यावर सर्व जिकडे तिकडे नीट व्यवस्था झाल्यावर सभेचा उद्देश लोकांना कळल्यावर मिस्तर यशवंतराव वकील यांनीं टाऊनहाल रिपोर्ट वाचला नंतर मिस्तर जोन्स (Jones) सिव्हील सरजन यांचे इंग्रजींत व्याख्यान झालें त्याचा विषय [sanitation] प्रसिद्ध होता. व्याख्यान सुमारें अर्धातास झालें नंतर कित्येक मुलांनी सुस्वर कंठावर राज्ञो स्तोत्र म्हटलें नंतर मिस्तर नोलीस आपल्या देशी जातात या प्रीत्यर्थ एका गृहस्थानें केलेल्या कविता मुलांनीं म्हटल्या. ही गोष्ट येथें झाली ही अप्रासंगिक झाली असें कित्येकांचें मत पडलें कारण हा समारंभ मिस्तर नवलिस आपल्या स्वभुमीस जातात या बद्दल नव्हतां तेव्हां त्यांची स्तुती वगैरे करणें ती अन्य सभा भरऊन करणें उचित होतें. वर लिहिल्या प्रमाणें कविता झाल्या नंतर मिस्तर नवलिस यांनी टाऊन हालचा प्रवेश झाला असें सांगितलें नंतर पान सुपारी अत्तर लव्हेंडर वगैरे झालें नंतर सर्वांचे आभार मानून समारंभ आटपला ह्या समारंभाची खटपट मिस्तर यशवंतराव वकील मिस्तर शषराव रघुनाथ वकील व मिस्तर नारायण परशराम कमेटी कारकून या तीन गृहस्थांनीं मना पासून केली त्या बद्दल त्यांची जितकी स्तुती करावी तितकी थोडीच आहे कळावें ही विनंती.

आपला
"क्ष"

एलिचपूर, वऱ्हाड
ता० २१ माहे मे सन १८८९

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांस

वि. वि. खालील चार ओळी आपल्या कडे छापण्या करिता पाठविल्या आहेत तरी त्यास येत्या अंकीं जागा मिळेल अशी आशा आहे.

एडिटरराव तुमचीं कर्तव्य कर्में काय आहेत हीं तुम्हांस माहित असतीलच. निःस्पृहता, निःपक्षपातीपणा व रयतेचे तर्फेनें सरकारास प्रजेस होणारीं सुख दुःखें कळविणें तुमचे काम आहे असें लोक समजतात. एका कांहीं विशेष व्यक्तीची किंवा व्यक्ति वर्गाची बाजू घेऊन दुसऱ्या व्यक्तीस अनुलक्षून लिहिणें हें वर्तमानपत्रकारांचें कर्तव्य नव्हे. आमचे मनांत वरील विचार येण्यास गेला तारिख १९ मे चा "वैदर्भ" चा अंक कारण होय. नवीन "ज्युडिसिअल स्कीम" संबंधानें लिहित असतां वैदर्भ कारास नवीन स्कीम प्रमाणें डिस्ट्रिकटांत अपिलाचें काम फार राहिलें या मुळें जिल्ह्याचे वकिलांचे फळफळलें व उमरावती येथील बिचाऱ्या वकिलांचें फार नुकसान झालें व "त्यांचे तोंडचा घास नेला" या बदल फारच वाईट वाटून जिल्ह्याचे वकिला कडे मत्सर बुद्धीनें आलोचन केलें आहे असा भास होतो. बिचारे जिल्ह्याचे वकील अगोदरच काम नाहीं म्हणून फिकिरींत आहेत. नवीन स्कीम प्रमाणें त्यांचा मोठा फायदा झाला असें हा म्हणतां येत नाहीं. शिवाय नवीन स्कीम प्रमाणें फायदा झाला असें जरी घटकाभर मानिलें तरी अपिलें जिल्ह्यांत यावी याबद्दल त्यांणी कधीं ही प्रयत्न केला नाहीं. अनायासें सरकारानें जी न्यायपद्धती सुरू केली, त्याप्रमाणें व्यवस्था होणार आहे. यामध्यें उमरावतीचे वकिलांचा तोंडचा घास यानीं घेतला असें होत नाहीं. वैदर्भ कारांस उमरावतीचे वकिलांची कींव आली असें वर्तमान पत्रद्वारें सर्वांस कळलें याबदल उमरावतीचे वकील वैदर्भकारास आनंद प्रदर्शित करून त्यांचे ते ऋणी ही होतील यांत संशय नाहीं. परंतु उमरावती वकिला तर्फ जसा ह्लीं पक्ष घेतला त्या प्रमाणें जिल्ह्यांतील वकिलांचे नफ्यातोट्याकडे जर वैदर्भकार लक्ष पोंचविते तर फार चांगलें झालें असतें!

एलिचपूर कोर्टाचा दर्यापूर तालुक्यापैकीं मोकदम्याचा ५००० चा अधिकार दर्यापुरास रा. रा. वि. ना. दांडेकर यांजकडे गेल्या ह्यामुळें येथील वकिलांचे फार नुकसान झालें या गोष्टीकडे वैदर्भकाराचे कधीं लक्ष गेलें नाहीं व त्यांनीं दुःख ही प्रदर्शित केल्याचें ऐकिवांत नाहीं. जुडिशियल स्कीमचे योगानें वकिलांचें नुकसान आहे किंवा नफा आहे हा महत्वाचा मुद्दा नाहीं असें आह्मी समजतों. रयतेचें व पक्षकारांचें नफानुकसान व अडचण पाहणें हा मुख्य मुद्दा आहे. असें असतां उमरावतीचे वकिलांचीच कींव कां आली हा एक गूढ प्रश्न आहे. असो तूर्त येथेंच पुरें करितों. कळावें लोभ असावा. ही विनंती.

आपला
"क"

मुकाम वाशीम ता० २०।६।८९

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

कृतानेक सा० नमस्कार वि० वि० हल्लीं

उष्णता फार झाली आहे. त्राही भगवान करून सोडलें आहे. रात्रंदिवस गार पाणी प्यावयास व पंखा हातांत या शिवाय कांहीं सुचत नाहीं. हर्ली विहिरी आटून गेल्या. कित्येक तर आटण्याच्या पंथास आहेत. बैरण फार महाग झाली. पाणी व वैरणी वांचून गुरें मरूं लागलीं. जेव्हां सर्व गोष्टी निर्विघ्नपणें चालतात तेव्हां मनुष्याला ईश्वराचें स्मरण सुद्धां होत नाहीं. परंतु जेव्हां असा दुर्घट प्रसंग येतो तेव्हां त्याचे वांचून कोण तारणारा आहे! असें आहे तर या ज्या अडचणी येतात त्या ईश्वरी सुत्रांचें महत्ववाढविण्या करितांच येतात असें खास आहे. ह्मणून, जन हो, त्या प्रभूला भजा, धर्माचरणानें वागा, नीतीचें बीज आपल्या अंतःकरणांत पेरा, ह्मणजे तुम्हावर देव्याची आभाळें कधींही येणार नाहींत. अनुपम सुख तुह्मास मिळेल. व अखेरीस तुमची सुकिर्ती होऊन अनाद्यंत सुखाची स्थिती तुह्मास प्राप्त होईल.

मि॰ दहिगांवकर गणेश गोपाळ बढुळी क्लार्क आफ दी कोर्ट यांची स्वारी कायमचे क्लार्क मि॰ कावळे यांस आपलें कामाचा चार्ज देऊन स्वस्थानीं गेली. हे जागली इकडे किती खेपा घालणार कोण जाणे!! मनुष्याची आशा मोठी वाईट आहे. पुढें आपल्यास लवकर कायमची जागा मिळेल ह्मणून दोन तीन वेळी बिचाऱ्यानें गेल्या वर्षांत बदली काम केलें! आणखी किती दिसके घालावे लागतात नकळे!! अशा पाशामध्यें मनुष्य गुंतला कीं त्याची स्थिती कशी होत असेल याचा प्रत्येकानें स्वानुभव घ्हावा. मनुष्य फार शिकलेला असून त्याची आशा भंग झाल्यानें त्याला जितकें दुःख वाटेंत तितकें दुसऱ्यास वाटत नाहीं. जबाबदारीचीं कामें करण्यास फार शिकलेले लोकच पाहिजेत. रयतेला सुख मिळण्यास जितके चांगले सुशिक्षित लोक कारण होतात तितके इतर दुःखप्रद होतात.

मि. नौलीस साहेब डे. कमिशनर यांची स्वगृहीं जाण्याची तयारी असल्या मुळें त्यांचें सामान विकून टाकण्याची तयारी फार जारीनें चालली आहे. रजा सहा महिन्यांची आहे. परंतु एकंदर व्यवस्थेवरून साहेब बहादूर परत येतील असें वाटत नाहीं. यामुळें कित्येक लाडक्या माणसांचीं तोंडें सुकून जात आहेत. व पुढें किती सुकतील याचा नेम नाहीं. नीतीनें जो मनुष्य चालतो त्याला मनाची तरी शांती असते. परंतु तद्व्यतिरिक्त मनुष्यांच्या कपाळीं भाळीं लिहिलेलें नसल्यामुळें तें सौख्य कोठचें! असो. साहेब बहादुरांनीं या जिल्ह्यांत कारकीर्द कशी चालविली, लोकांना कितपत ती सुखकारक झाली याचा विचार पुढें एखादे वेळीं करूं. साहेब बहादूर आतां लवकरच प्रयाण करतील असें दिसतें. यांचा प्रवास त्यांना सुखावह होवो व ते पुन्हा लवकर आमच्यावर अंमल चालविण्यास येवोत. अशी ईश्वरापाशीं विनयपूर्वक प्रार्थना आहे.

येथील सिटी पोस्ट ऑफिस वीस रुपयांचें आहे त्याची व्यवस्था पाहाण्या करितां मिस्तर लालकाका अक्टींग डेप्युटी पोस्टमास्तर जनरल यांची स्वारि आली होती. ऑफीस पाहून खुष झाले परंतु इतक्या पगाराचें हें ऑफिस न ठेवतां तें बंच केलें पाहिजे असें म्हणाले असें ह्मणतात. कारण या ऑफिसांत काम फार नसून व हें आफिस फारेन आकाउंट ठेवीत नसून इतका पगार कां असावा असें त्यांस वाटतें. एकूण काकासाहेबांची दृष्टी काटकसरिकडे बरीच आहे असें वाटतें असो. पत्रकर्तेराव वेडेवाकडे लिहितो. ध्या गोड करूननी काय असेंच गोड करीत गेला तर मी ही असेंच मानीन कळावें हें विनंती.

आपला
"ल्ल"

वऱ्हाडसमाचार.

मिती वैशाख वद्य १३ शके १८११

## रूसदेशाचा राज्य विस्तार.

हिंदुस्थानासंबंधानें इंग्लंड आणि रशिया या उभय राष्ट्रामध्यें आफगाणिस्थान विरेस पडलें असल्यामुळें रशियास पुढें चाल करणें मोठें दुरापास्त काम झालें आहे. कांहीं धुरंधर मुत्सद्यांचें ह्मणणें आहे कीं कदाचित रुशिया यास येथून पेट आफगाणिस्थानापर्यंत रशियास मुलुख मिळाला आहे तर रशियानें हिंदुस्थानचा नाद सोडावा ह्मणजे त्या राष्ट्राचें कोटकल्याण होईल. या पुढें हिंदुस्थान घेण्याचा हव्यास केला तर कावीज केलेला प्रांत ही क्वचित् प्रसंगीं इंग्रजांशीं सामना करण्यांत हरावा लागेल. हें एक कारण आणि दुसरें कारण कीं हिंदुस्थानांत कांहीं त्राण उरलें नाहीं. हिंदुस्थानापेक्षां हल्लीं संपादन केलेले देश शेंकडों पटीनें धनाढ्य आणि सुपीक आहेत. हें शेंकडों नवीन घेतलेले देश ह्मणजे रशियन राष्ट्र युरोपांत बळिष्ट होण्यास भक्कम पाठीराखे आहेत.

परचक्र आलें नाहीं तर रशिया बाहेरच्या राष्ट्रांतले लोक फार येऊं न देतां आरमिनियन आणि इराणी या लोकांच्या साह्यानें आपल्या वसाहती मध्य आशिया खंडांत स्थापित करील आणि अवघ्या मुलखाची जमाबंदी नवीन लागवड व पेरा होत गेल्यानें एका मोठ्या राष्ट्राच्या जमाबंदी प्रमाणें येऊं लागेल. काकेशियस पर्वताच्या अलीकडचा देश तर तुर्कस्थानच्या पाण्याच्या विपुलतेमुळें फार सुपीक आहे. मुख्य सेनापती जनरल अनेल काफ यांनीं ओझन एडापासून तहत समरकंद पर्यंत आगगाडी सुरू केली ही गोष्ट कांहीं सामान्य नव्हे. ह्या रेलवेमुळें आशिया खंडांत रशिया आणि इंग्लंड या उभय राष्ट्रां मध्यें व्यापार चालूं लागला तर मध्य आशिया खंड सुधारणेच्या आणि सुबत्तेच्या शिखरास जाऊन पोंचेल अशी भरवसा निल्हे जनरल यांची पक्की समजूत आहे. परंतु इंग्लीश पक्षाकडील सर चार्लस डिल्क यांस वाटत आहे कीं रशियन सरकार हिरात मार्गानें हिंदुस्थानावर चालून येत आहे आणि योग्य तजवीज न झाल्यास या गोष्टिस विलंब लागणार नाहीं. हें अनुमान चुकीचें आहे असें ह्मणण्यास मुख्य कारण हें दिसतें कीं काराकोरमच्या दरी पर्यंत अंमल बसल्या नंतर रशियानें आपला मोर्चा पुन्हा त्यारा व समर्कंद कडे फिरविला आणि जनरल अनेलकाफ यांनीं महत्प्रयत्नानें आश्गाबाद नांवाचें शहर राजधानी ह्मणून वसविलें आहे.

मि. डि कालेट यांनीं आपल्या पुस्तकांत अमुदारीया नदी वरील रेलवेच्या पुला संबंधानें हकीकत दिली आहे ती खरोखर लक्षांत ठेवण्या सारखी आहे. हा पुल सर्द बगांत मोठा आहे. याची लांबी दुरे सव्वा दोन मैल पेक्षां ज्यास्त आहे. जनरल अनेल काफ सारखे थोर मुत्सदी अग्रणी होते म्हणून जगांत नवल वाटण्या सारखा हा अजब पूल तयार झाला आहे. देशांत शांतता असल्या शिवाय तारायंत्रें आगगाड्या इत्यादि लोकोपयोगीं कामें निर्धोक चालत नाहींत ह्मणून रशियन सरकार मध्य आशिया खंडांत आपला अंमल चांगला बसविण्याच्या कामांत गढलेले आहेत व लोकांची मनधरणी करून स्वस्थता करीत आहेत. आणखी बरींच वर्षें हिंदुस्थानाप्रीत्यर्थ इंग्लंडची आणि रशियाची लढाई जुंपणार नाहीं असा सुमार आहे. काबुली लोकांच्या आणि रशियन लोकांच्या चकमकी अनेक वेळां मध्यंतरी होतात तरी त्या पासून राष्ट्रावर अरिष्ट ओढवण्याचा तूर्त काळ समीप दिसत नाहीं. रशियाची आणि इंग्लंडची परस्पर सल्लामसलत होऊं लागली आणि उभय राष्ट्रें एक मतानें वागूं लागलीं तर लढाईचीं चिन्हें समूळ नाहींशीं होतील असें कळविण्यास हरकत नाहीं. परंतु वरील स्नेहभाव जोडण्या साठीं इंग्रजांनीं तिबेटाशीं चालविलेली लढाई बंद करणें इष्ट आहे कारण तिबेटांत इंग्रजांचा पाय शिरकल्यास रशियाच्या आशियांतील राज्यास धोका बसणार आहे.

## मृत्यू.

वऱ्हाडांत नांवाजलेले हैदराबादचे अमीर कैलासवासी चंदुलाल यांचे नातु राजे नारायण प्रसाद नरेंद्र बहादूर यांस गेल्याच्या मागील मंगळवारी देवाज्ञा झाली हें कळविण्यास आम्हास वाईट वाटतें. हें अमीर घराणें मशहूर असून हिंदुमध्यें पहिल्या प्रतीचे आहे तेव्हां ते राजवाड्याचे मुख्य नायक परलोकवासी झाले हें ऐकून वऱ्हाडांतल्या आणि हैदराबाद संस्थानच्या लोकांस पराकाष्ठेचें दुःख होईल पण ईश्वरेच्छे पुढें नाइलाज आहे. मरणकाल पावेतों राजे नारायण प्रसाद हे हैदराबादचे बडे मुत्सद्दी होते. हे वयानें ६९ वर्षांचे होते. यांचा अनुभव फार दिवसांचा असून विचार अती पोक्त आणि थोर असत. जुन्या काळच्या पद्धतींतले हे थोर गृहस्थ हैदराबादच्या दरबारीं असल्यामुळें प्रसिद्ध कै॰ सालरजंग दिवाण बहाद्दर यांच्या मागें अनेक प्रसंगीं त्या दरबारची बाणी राखली गेली हें सर्वांस मशहूर आहे. हे कांहीं दिवस स्वतां दिवाण होते. यांचे पितामह ही दिवाण मीर आलमच्या पश्चात् सन १८०८ पासून पस्तीस वर्षें दिवाणगिरीचें काम पहात होते. हैदराबाद संस्थानांतलें या अमिरांच्या मरणानें एक रत्न हरपलें ह्मणून खुद्द निजाम सरकार आणि दिवाण फार दिलगीर आहेत. या बड्या आणि उदार गृहस्थाच्या प्रेतविधीच्या प्रसंगीं वीस हजारावर लोक जमले होते असें सांगतात. वाडवडिला प्रमाणें राजे नारायण प्रसाद मोठमोठे दानधर्म करण्यांत फार तत्पर असत. याचें प्रत्यंतर हजारो लोकांच्या तोंडांत यांच्या नांवाची स्मरणी कानीं पडली ह्मणजे सहजी येण्या सारखें आहे. यांच्या प्रशंसनीय राजसेवे बद्दल मामुल वहिवाटी प्रमाणें निजाम सरकार पेष्कारीची वस्त्रें त्यांच्या कन्येचे चिरंजीव राजा किसन प्रसाद यांस देणार आहेत. अखेरीस राजे नारायण प्रसाद यांच्या उदार आत्म्यास उत्तम लोक प्राप्त होवो ह्मणून आम्ही ईश्वरापाशीं प्रार्थना करितों.

वऱ्हाडांतील जुन्या लोकप्रिय सरदार मंडळी पैकीं मेजर जनरल बुशबी साहेब हे गेल्या महिन्याच्या १८ वे तारखेस स्वगृहीं विलायतेस निवर्तले हें ऐकून वऱ्हाडांतील सर्व लोकांस अत्यंत वाईट वाटलें. मेजर बुशबी साहेब पेन्शन घेऊन हुशारीनें कालक्षेप करण्या साठीं स्वदेशास परत गेले त्या वेळीं साहेबांचा आणि वऱ्हाडचा संबंध अखेर तुटला होता तरी चांगला रयतेचा कनवाळू गृहस्थ थोड्या बहुत दिवसांनीं वृद्धापकाळीं मरण पावला ह्मणजे त्यांच्या इष्टमित्र मंडळीच्या तोंडांतून दुःखोद्गार निघणें मनुष्यधर्म होय.

बडोद्याचे मैराळ घराण्यांतले गादीचे मालक आणि प्रसिद्ध कै. गोपाळराव मैराळ यांचे नातु श्रीमंत रा. रा. गंगाधरराव यशवंत ऊर्फ बाप्पा साहेब मैराळ हे मुंबई मुक्कामीं गेल्या २१ तारखेस पक्षता मुळें स्वर्गस्थ झाले. मैराळ घराण्यांतल्या औदार्याचो आख्या सर्व गुजराथ प्रांतांत अबाल वृद्धांस माहीत आहे. श्री. रा. रा. बाप्पा साहेब हे अल्प वयांत वारले आणि थोड्या वर्षांत त्यांच्या घराण्यांतल्या चौथ्या पिढीस आरंभ होत आहे हें पाहून कोणासही दुःख झाल्या वांचून रहाणार नाहीं. 'दानधर्म विषयीं व वैभवा विषयीं बाप्पा साहेब मैराळ यांचे आजे गोपाळराव मैराळ हे राजाची दुसरी प्रत होते. हरि कीर्तनांनीं व इतर धार्मिक कृत्यांनीं अष्टौप्रहर त्यांचा वाडा दुमदुमलेला असे.' या थोर घराण्याची श्री. बाप्पा साहेब यांनीं आपल्या सद्वर्तनानें पिढीजादी पेढी मोठ्या अब्रूनें चालविली आणि लोकांकडून चांगलें ह्मणवून घेतलें परंतु या जगांतली इतिकर्तव्यता लवकर

आटपकी ह्मणून फार खेद होतो. नाप्पा साहेब यांनीं मृत्युपत्र करून ठेविलें आहे त्या प्रमाणें श्री. संपतराव गाईकवाड नीटपणें व्यवस्था करतील अशी आह्मास आशा आहे.

The Berar Samachar

MONDAY MAY 27 1889.

## THE REVISION SURVEY AND ASSESSMENT IN BERAR.

(Continued from our last issue.)

But it may be asked, why if the rates are high, do the people stick to the land they have? What is there to account for this dogged tenacity of the ryot to cling to his parcel of land? And again if the rates are high, how is it that lands have increased in value and are daily increasing? Do not these two facts viz the desire to keep on to the lands which they have already, and the competition to buy fresh lands— do not these two facts go to prove that the rates of the lands are not a burden on the ryots? The selling values of lands are, it must be admitted, some index of the lightness or the heaviness of the land-tax; but under the existing circumstances of this country the selling values of land are not an independent test as we shall presently show. The masses in this country are notoriously poor and the occupation of a very great majority is the cultivation of the soil. Industries and manufactures in the country have been fast decaying for years past and some have altogether disappeared. The masses therefore have necessarily to fall back upon agriculture as the only means of living. If a ryot is not an agriculturist, he is nothing; he must be half fed if not actually starved. This explains why the ryot is so very anxious to secure the possession to himself of lands that he has and to secure more by bidding for them at higher rates. Indeed the ryot has no option in the matter of retaining or giving up lands. Even if he feels the government demand as oppressive what else *can* he do? He has to choose between continuing where he is, with the burden of rent or starvation and naturally he prefers the first alternative. Then again government in this country enjoys a very unique position as a land holder who has no competitor in the field. The government is one great land lord wherever you go; in other countries if the ryot feels one land-lord as an oppressive rent-racker he leaves him and goes to another; but here in India where can he go? So he has to pay what that one land-lord demands of him. Then again the increase in the selling values of land is also explicable on these same grounds. Non-agricultural people who have capital to invest find it to their advantage to invest in a thing so sure as land is. There are no considerable industries that absorb the capital seeking investment and so the only refuge is land and hence a rush of buyers and consequently a rise in prices of land.

There are some people who think it we are told a test about the lightness of land-revenue, that the land-revenue *is* paid by ryots without a hitch. If it really pressed many properties would have to be brought to the hammer every year for unpaid arrears of land-revenue; and as that is not the case as the government can without much trouble get their land-revenue, the burden must be such as to be lightly borne. But the causes mentioned above completely explain why the government may get its revenue without trouble and yet the pressure may be very hard. For, as we said, not paying the land-revenue means an auction-sale of land by government and that means utter starvation to the ryot and his family. He *must* therefore pay the government demand whether he can or no. As a matter of fact we know that in the Marwari's accounts of a ryot, rents of lands paid to government are always considerable items on the debit side; and when the lands eventually go to a Marwari, the total amount due includes a good deal for rent of lands. It is also generally well known that when the rental has to be paid, there occur many mortgages and sales of immoveable property and it would be curious to verify the fact by actual statistics from the Registering offices if a goodly percentage of these mortgages and sales do take place at or about the time when the rental is paid. That the government is able to realize the land-tax without much trouble, is therefore no fair criterion. It is what they call in Berar a 'common-sense-view' test and would be good under normal circumstances of a country.

Then again are the letting values any test of the lightness or heaviness of the government demand? They are some test no doubt but the one grand reason appears in this case also. People having nothing else to fall back upon must take the lands from owners of land at any cost. Perchance the field may produce nothing in a particular year and yet the tenant has to pay the amount agreed upon to the lessor. The competition between tenants is so great that the amount they pay to the lessor represents really the utmost they can pay and is in a fact a rack-rent which no civilized government ought to take as an absolutely reliable data for justifying an increase in the revenue of lands. The need in which parties stand at the inception of the lease also regulate the lease-moneys in several instances and there are many other considerations which influence those contracts that they cannot be taken as any absolutely correct test for finding out the lightness or otherwise of a certain amount of land-revenue.

There is again a consideration about the increased facilities, the consequent rise in prices of food—grains and other exportable commodities. New roads have been made; railways have been opened up and consequently the produce of lands has incerased facilities of sale. Prices have therefore risen during the last 30 years and the government tries to justify an increase in the land revenue by demanding a fair share of the advanced prices. They argue, if for 5 seers of grain you got a rupee 30 years ago and you now get 2 rupees for those same five seers, why should you not give government a share in the extra one rupee that you get as a result of facilities increased and peace maintained by Government. With regard to this however, there are four things to be considered: First— Is the produce of the land the same as it was 30 years ago. Secondly, Have prices of produce of fields alone risen and not those of other commodities—necessaries of life and others— also risen during this interval of 30 years. Thirdly, Has not the status of the ryots increased during the period so as to increase their wants and consequently to require a greater proportion of the produce. Lastly— the increase of population— there being so many more months to feed during the last 30 years on the produce of the self same piece of land.

These considerations go a great way in proving that a rise in prices of food grains and other produce of lands does not justify the government in demanding a proportionate share in the increased prices. And when we remember how the tables of prices current are perfunctorily prepared, signed away by a series of authorities till they reach government it would be hard to base any calculations on the so-called rise in prices.

We shall enunciate in one of our next the principles which government should adopt in making a fresh assessment, if they feel constrained to make one at all. In the meantime we shall await the result of the Berar Sarvajanik Sabha's doings in the matter.

## वऱ्हाड.

हवामानः—पावसाळा सुरू होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. वारा सोसाट्यानें वहात असतो, आणि ह्या आठवड्यांत थोडा पाऊसही पडला. रोगराई ह्मणण्या सारखी विशेष नाहीं.

मि. प्राईस एक्स्ट्रा असि. कमिशनर वर्ग ४ यांस गेल्या महिन्याच्या २३ वे तारखे पासून किंवा त्यांस पसंत पडेल त्या तारखे पासून ४२ दिवसांची हक्काची रजा मिळाली आहे.

सन १८७० सालच्या सप्टेंबरच्या तिसावे तारखेच्या हिंदुस्थान सरकारच्या १९६ वे नोटिफिकेशन प्रमाणें अलिशान रेसिडेंट साहेबांनीं मि. आरदेसर दिनसाजी चिनाय एक्स्ट्रा असि. कमिशनर. जिल्हा इलिचपूर यांच्या कोडतांस पांच हजार रुपये पर्यंत दावे चालविण्याचे ह्मणजे पांचवे वर्ग कोडताचे अधिकार दिले आहेत.

जुलई महिन्याच्या पहिले तारखेस रेसिडेंट मी. हावेल साहेब हे मि. फिटझप्याट्रिक यांस आपले कामाचा चार्ज देतील असें ठरलें होतें परंतु मी. फिटझप्याट्रिक यांच्य आसामच्या जागीं नवीन येणारे गृहस्थ मि वेस्टलांड यांस उशीर लागेल तेव्हां वर ठरलेली तारीख पुढें ढकलणें भाग होईल असा अंदाज आहे.

दारव्ह्याचे आक्टिंग तहशीलदार रा. रा. गोपाळ बळवंत यांस दुसरे वर्ग माजिस्ट्रेटचा आणि सन १८८२ च्या दहावे आक्टांतील बत्तीसावे कलमा प्रमाणें फटक्याची शिक्षा देण्याचा अधिकार मिळाला आहे.

आह्मी मागें मोघमांत लिहिलें आहे कीं अकोला जिल्ह्याचे पोलिस सुपरिंटेंडंट मि. एफ़्. राईट हे तीन महिन्यांचे रजेवर जात आहेत पण आतां गेल्या रेसीडेन्सी आरडर्स वरून कळतें कीं साहेबांची रजा तारीख १३ मे पासून मंजूर झाली असून बरोबर १ महिना १९ दिवसांची हक्काची आहे. त्यांच्या रजेंत पूर्वी ठरल्या प्रमाणें उमरावतीचे असि. सुपरिंटेंडेंट मि. वाय्. आर. व्हीकाजी हे अकोल्यास आले आहेत आणि त्यांच्या जागीं अकोल्याचे अक्टिंग असि. सुपरिंटेंडेंट मि. एफ़्. टी. कुट हे उमरावतीस गेले आहेत.

अकोट आणि शेगांव या दोन ठिकाणच्या सभासदांचीं नांवें सरकारी रिती प्रमाणें गेल्या रेसिडेन्सी आरडर्स मध्यें प्रसिद्ध झालीं आहेत तेव्हां ह्या दोन मुनसिपालिटीच्या कामास नवीन पद्धती प्रमाणें सुरुवात होईल. ह्या मुनसिपालिट्या एप्रीलच्या पंधरावे तारखे पासून अस्तित्वांत आल्या असें समजलें जाईल ह्मणून रेसिडेंट साहेबांनीं फर्माविलें आहे.

रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे बी. ए. एल्. एल्. बी. आणि एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांनीं वऱ्हाडांत नविन होणाऱ्या सरकार तर्फे वकिलाच्या चारशें रुपयांच्या जागे साठीं मागणी केली आहे. वैदर्भ कर्ते म्हणतात कीं ही मागणी रेसिडेंट साहेबांस मान्य झाली तर ते आपले मस्तुतचे जागेचा राजिनामा देतील. परंतु प्रमोदसिंधु कर्त्यांनीं दाट वदंता ऐकीली आहे कीं त्यांनीं 'सरकारी नोकरीचा राजिनामा दिला व ते पुर्ववत् वकिलीचें काम करणार' आहेत. खरा प्रकार बाहेर येईल तेव्हां विशेष लिहितां येईल.

मे. कुमार श्री हरबानजी असि. कमिशनर यांस एक महिन्याची रजा मिळाल्या वरून त्यांनीं आपले कामाचा चार्ज रेसिडेंट साहेबांचे अत्याची मि. हैदर अली यांस द्यावा असें ठरलें.

कर्नल लेन साहेब सव्वा वर्षाच्या रजेवर गेल्या नंतर त्यांच्या इन्स्पेक्टर जनरलच्या जागीं मध्यप्रांतांतले पोलीस सुपरिंटेंडेंट मि. हावेड हे येणार आहेत असें ह्मणतात.

रा. रा. गणेश गोविंद तहशिलदार पुसद यांची बदली चांदुरास झाली आणि चांदूरचे तहशील्दार रा. रा. कृष्णाजी अनंत यांस पुसदास बदललें आहे.

## जाहिरात.

सर्व लोकांस खालीं सही करणार यांजकडोन आपल्या वर्तमानपत्रांत एक जाहिरात देण्यांत येते कीं आम्ही चंद्रकांत ह्या नांवाचा प्रेस खामगांव मुक्कामीं स्थापन केला आहे त्या ठिकाणीं चांगला हुशार नौकरी कलेला इंग्रजींत व मराठीत वर्तमानपत्र चालविल असा एक एडिटर पाहिजे ज्याची खुषी असेल त्यानें आपल्या हुशारीचें व नोकरीचें सार्टिफिकीट व पत्ता हीं खामगांव मुकामी पाठवावीं अगर त्या सुद्धां स्वतां भेटावें व पगार काय घेणार हें ही कळवावें.

(सही) तयबअली महमदअली

दस्तुर खुद्द मुकाम खामगांव

## वर्तमानसार.

गेल्या गुरुवारच्या सरकारी ग्याझेटांत हायकोर्टानें मुंबई दिवाणी कायद्याच्या बावीसाव्या कलमाच्या आधारानें भावी सबारडिनेट जज्जामार्गे एक नवीनच परीक्षा लाविली आहे. सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेंत सिलेक्टेड क्यांडिडेटना कायद्या संबंधीं प्रश्नाचा एक कागद विलायतेंत देण्यांत येतो, त्या नमुन्याचा प्रश्नाचा एक कागद यांना देण्यांत येणार आहे. त्यांत पास होतील त्यांनां जागा मिळावयाची. मग हा नवा प्रश्नाचा कागद नेहमीचे परीक्षेचे वेळींच देणार कीं, मागून देणार हें समजत नाहीं. याचा खुलासा लवकरच होईल.

कोण हा तामसीपणा— ठाणें जिल्ह्याचे ता. पका एका इसमानें आपली बायको माहेरी गेलेली मुदतशीर आली नाहीं म्हणून संतापून रहात्या घराला आग लावून दिली! याबद्दल पण त्याला ६ महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा झाली.

नाटक गृहास आग लागली असतां प्रेक्षकांस एकदम भिंतीला भोक पाडून बाहेर निघून जाण्याची युक्ती अमेरिकेंत निघाली आहे. बा० वृ०

यंदा महाराणीच्या जन्म दिवसा निमित्त ज्या पदव्या द्यावयाच्या त्या फारच थोड्या मिळतील असें प्रसिद्ध झालें आहे. पदव्या थोड्या मिळण्याचें कारण त्या शिलक नाहींत असें सांगितलें आहे. यावरून पदव्यांचे एखादें भांडार गृह आहे कीं काय अशी शंका येते. पण वस्तुतः पाहिलें तर तसा प्रकार मुळींच नसून या सालीं पदव्या घेण्यास योग्य असे पुरुष मुळींच आढळण्यांत आले नाहींत एवढें मात्र खरें आहे! इंग्रज लोकांची गोष्ट वेगळी, पण आमच्या लोकांस जें फुकट पदव्या दान होत असे तें या वर्षीं तरी टळलें हें पाहून आह्मांस तर आनंद वाटतो. कारण कांहीं एक न करतां फुकट पदव्या मिळण्याची संवय एकदा हाडीं खिळली ह्मणजे येत्या भिकेवर निर्वाह करण्याऱ्या भिकेकऱ्या प्रमाणें आमचे लोक ऐदी बनावयाचे! म्हणून तो एक प्रसंग टळला हें चांगलेंच झालें! पु० वै०

केसाळ मनुष्य— मुंगफोसिट नांवाचा एक ब्रह्मी मनुष्य, व त्याची मोडफोनि नामक वृद्ध माता— ह्या माणसांच्या शरीराचे सर्वत्र भागावर एक वितभर लांब असे केस आहेत! ही केसाळ माणसें पूर्वीं ब्रह्मी राज्याच्या दरबारी असत. परंतु ब्रम्हदेश आमच्या सरकारानें घेतल्यावर थीबा राज्याच्या एका इटालीयन अमलदारानें त्यांस आपणांबरोबर युरोपांत नेलें. व ताच सध्या पारीस शहरीं, त्यांचें प्रदर्शन करीत फिरत आहे.

पुनर्विवाह— दमो येथें दक्षिणी ब्राम्हणांत एक पुनर्विवाह झाला. वधूचें नांव कृष्णाबाई, वय १७ वर्षे ही कैलासवासी गणपतराव नाखरे सागरकर यांची कन्या व वराचें नांव रानारामपंत असिस्टंट सेटलमेंट आफिसर वय १९ वर्षे. कन्यादान वधूचे चुलते रा. रा. नारायण साखरे यांनीं केलें. लग्न समारंभ सुरक्षित तडीस गेला. हीं वधुवरें दीर्घायु आणि सुखी राहात असें आम्ही इच्छितों. दी० बं०

रशियानें आपली फौज वाढविण्याचें काम मोठ्या जारानें सुरू केलें आहे नुकतेंच त्या बादशहानें पायदळांत बरीच भरती केली व घोडेस्वार तर चौपट वाढविलें आहे. युरोपांत लढाई खास होणार हें यावरून ठरतें पुष्कळ दिवस धुमसत राहिलेला अग्नी केव्हांना केव्हां तरी पेट घेणारच मात्र त्याला वायू भरपूर मिळाला पाहिजे आतां य अग्नीस कोण फुंकर घालतो पहावें. ठा. अ.

सालाबाद प्रमाणें कलकत्ता युनिव्हरासिटीच्या परीक्षेचे निकाल बाहेर येऊं लागले आहेत. चालूं सालीं एफ. ए चे परीक्षेंत ७१३ विद्यार्थी पसार झाले आणि कालेज प्रवेश परीक्षेंत १४७४ विद्यार्थी पसार झाले. मुंबई युनिव्हरसिटीच्या मानानें एफ्. ए. परीक्षेंत पसार झालेल्या उमेदवाराचें प्रमाण फार भारी आहे. म्हणजे सुमारें तिप्पटी नवळ आहे.

सिबपूर येथील सिव्हिल इंजिनिअरिंग कालेजचे विद्यार्थी होऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनीं ता० २१ मे च्या आंत अर्ज केल्या नंतर पुढें उमेदवारांची निवडा निवड तारीख ३ जून रोजीं होणार आहे. युनिव्हरसिटीच्या प्रवेश परीक्षेंत पसार झालेल्या विद्यार्थ्यांस १९ वर्षांची आणि एफ. ए. पास झालेल्यास २१ बर्षांची अट आहे. मुंबई युनिव्हरासिटीच्या परीक्षा नोव्हेंबरांत होत असल्या मुळें वयाची इयत्ता एकुणीस बर्षांची आहे ती मुंबई कडील विद्यार्थ्यांसाठीं एक वर्षानें वाढविणें फार अगत्याचें आहे कारण नोव्हेंबर पासून जून पावेतों बयाची संख्या एक वर्षानें वाढण्यासारखी असते. मुंबई कडील विद्यार्थ्यांस ही मोठी अडचण आहे आणि शिवाय सिबपूर कालेजांत येणाऱ्याचे चांगले साहा महिने व्यर्थ जाणार आहेत. तर ह्या गोष्टी संबंधानें मुंबई युनिव्हरासिटीच्या परीक्षा एप्रिलमध्यें व्हाव्या किंवा हल्लींची ह्या कालेजची व्यवस्था बदलली पाहिजे असे दोन मार्ग खुले दिसतात. उभयतां युनिव्हरसिटीकडून या विषयासंबंधानें विचार झाल्यास पुष्कळ फायदा होईल. निदान सहा महिने विनकारण खर्ची पडतात म्हणून लिहिलें आहे. नड मुंबई कडचे विद्यार्थी ही कलकत्याकडे व मुंबईकडे येत असल्यास त्यांस अनेक प्रकारें भोंवतें. ह्या गोष्टीचा ही त्या वेळीं निकाल होणें इष्ट आहे.

भावनगरचे ठाकूर साहेबांनीं महाबळेश्वरचे ब्राह्मणास १ माशांची पुतळी, नैवेद्याच्या ९ वाट्या आणि १ रु० दक्षणा या प्रमाणें धर्म केला. त्याच प्रमाणें होळकरणि बाईनें प्रत्येक सुवासिनीस एक एक जरीकाठी खण वाटला. म. मि.

हिंदुस्थानच्या सरहद्दीवर चोर नांवाचे एक डोंगराळ ठिकाण आहे त्या ठिकाणीं तोफा नेऊन ठेवण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार चालूं आहे असें ह्मणतात. वेळ पडल्यास हें ठिकाण शत्रूवर हल्ला करण्यास चांगलें आहे; येथून गोळ्यांचा भडिमार चांगला करतां येईल. अशा सोई तेथें आहेत पण तेथें अतीशय थंडी असल्या मुळें जगतील किंवा नाहीं शंका आहे असेंही बाहेर आलें आहे. यावरून आपल्यावर शत्रूचा हल्ला होणार व त्या करतां आपण एव्हां पासून तयारी करून ठेविली पाहिजे ही गोष्ट आतां सरकारास पक्की भासूं लागली आहे असें दिसतें.

सर्व ऐरिश लोकांनीं एकत्र जमून त्यांच्यांत पडलेला जमिनीबद्दलाच तंटा मोडून टाकावा ह्मणजे हल्लींचा दंगा बंद होईल व सर्व ऐर्लंडांत शांतता होईल असें लार्ड हार्टिंगटण यांनीं बोलून दाखविलें. होय असें होईल ऐरिश लोकांस दंगा करण्याची मुळींच हौस पण इंग्लिश जमीनदार व विलायतेंतील मतलबी लोक यांस हें करणें कबूल होईल तेव्हां ना!

जमालपूर येथें विमानाचा तमाशा करणारा स्पेन्सर विमान उडवीत असतां एका एकीं विमानास उलटा वारा लागून भीतीनें स्पेन्सर साहेबांनीं आपल्या छत्रीसह खालीं उडी घेतली त्या बरोबर ते एका डोंगरावर आले, व तेथून पाय घसरून डोंगराच्या तळ मजल्यावर आले, या मुळें साहेबास बरीच दुखापत झाली होती पण आतां बरे आहेत.

जगांत मोठा मनोरा—फ्रांसचें राज्य प्रजासत्ताक झाल्यास १०० वर्षे झालीं त्याचें स्मारक ह्मणून हा मनोरा आहे याची उंची ११७८ फूट आहे. हा सगळा लोखंडी आहे. याच्या माथ्यावर जाण्यास आंतून जिना केला आहे व २००।७०० आणि ९०० फुटांवर बसण्या सारखीं तबकें केलीं आहेत. आंतल्या जिन्यानें खालपासून वर पर्यंत जाण्यास ४० मिनिटें लागतात. पाळण्यांतून जाण्यास ९ मिनिटें लागतात यावर विजेचा दिवा लावण्याची तजवीज केली आहे. त्याच्या प्रकाशानें ७ मैल लांबीवर वर्तमानपत्र वाचतां येईल, इतका तो दिवा मोठा असणार यावरून जगांतील अद्भुत गोष्टी पैकींच हें एक धूड आहे असें समजण्यास हरकत नाहीं. शु. सू.

मि. केन साहेबांच्या मोठ्या प्रयत्ना बद्दल आभार मानण्या करितां सोपूलार येथील पीपल्स असोशिएशन सभेंत विचार निघाला होता. त्या वेळीं ह्या मद्यपानाच कांहीं तरी प्रतिबंध व्हावा. या उद्देशानें एक सूचना पास झाली. ती अशी कीं, "हल्लीं एकल्या कलेक्टरास वाटेल तेव्हां वाटतील तितकीं दारूचीं दुकानें घालूं देण्याचा जो अधिकार आहे, तो मर्यादित करण्या करितां प्राव्हिशियल कान्फरन्सनें सरकारास अशी विनंती करावी कीं, म्युनिसिपल किंवा लोकलबोर्डाचे हद्दींत दुकान घालण्याचा कलेक्टरास अधिकार नसावा." ही सूचना योग्य व साध्य आहे. पण सरकारच्या पसंतीस उतरेल तेव्हां खरी. क त.

इराणचे शहा हे टिफलीस येथें जाऊन पोंचले. ते सेंटपिटर्सबर्ग येथें जाणार आहेत.

राजा नारायणप्रसाद हैदराबादचे माजी पेशकार हे गेल्या १४ व्या तारखेस वारल्याचें दुःखकारक वर्तमान कळतें. हे पूर्वीं हल्लींच्या सालरजंगच्या जागेवर हैदराबादचे दिवाण होते.

कान्स्टान्टीनोपल येथील मशिदीपासून २५० फूट लांब पर्यंत ज्या ख्रिस्ती लोकांचे दारूचे पिठे आहेत ते अगदीं बंद करण्याचा हुकूम झाला आहे असें कळतें. सु. प.

यलो नदीला पूर आल्यामुळें १ कोटी चिनी लोक निराश्रित झाले आहेत असें समजतें.

चुटका— एका भटजीबोवांस गंजिफा खेळण्याचा इतका नाद लागला होता कीं, गंजिफाच्या खेळावांचून त्यांना कांहीं एक सुचत नसे. एके दिवशीं सदर भटजीबोवास श्राद्धाचें आमंत्रण आल्या वरून ते यजमानाचे घरीं गेले. श्राद्धकर्म आटपल्यावर भोजनास बसले असतां भटजीला झोंपेची चांगली गुंगी आली व त्या वेळेस त्यांच्या हातांत एक पुरी होती ती त्यांस गंजिफाच आहे, व आपण खेळावयास बसलों आहों असें वाटून त्यांनीं हुकूम असें म्हणून शेजारच्या भटजीच्या पानांत टाकली शेजारीं बसलेल्या भटजीनें हें काय म्हणून ह्मटलें त्यावर लायक नसेल तर मारून घ्या, असें भटजीनीं उत्तर दिलें. ब

## दामोदर काशीनाथ काळे आणि कंपनी यांचा दवाखाना.


या ठिकाणीं मनुष्याचे व गुरांचे सर्व रोगांवर औषधें मिळतात.

औषधें घेण्यास फार सुलभ आहेत. कोणत्याही रोगांवर वैद्य व अलोपाथिक डाक्टर जीं औषधें देतात त्याहून आमचे जवळ असलेल्या औषधांनीं फार लौकर चांगला व फार वेळ टिकणारा गुण येतो.

पटकी, मूळव्याधि, परमा, अम्लपित्त खरूज, पेण, नायटे, खवडे, हिवताप संधिवायू दमा व खोकला, भगंदर लहान मुलांचे अंगांत येणें, मुलांचे पोटांतील डबा, गरोदर अवस्थेंतील ओकारी, बाळंतरोग व इतर प्रकारचे माणसांचे सर्व रोग ह्यांजवर उत्तम गुण देणारीं औषधें आह्मी आमचे दवाखान्यांत ठेविलीं आहेत.

गुरांचे रोग—पटकी, लाळ खेसणें, पाठीला लागणें. पोट फुगणें, गळा सुजणें, आवरक, आंचळांतून रक्त येणें, क्षतें, पोटांतील कृमी, ज्वर व इतर सर्व रोग यांजवर या दवाखान्यांत औषधें ठेविलीं आहेत. गाई, बैल, म्हशी, हेले घोडे.कुत्रीं मांजरें, बकरी, या जनावरांचे सर्व रोगांवर आह्मी औषधें ठेविलीं आहेत.

या दवाखान्यांत रोग्यांना औषधाबद्दल थोडी किंमत द्यावयास लागेल.

बाहेर गांवीं राहणारे लोकांना आपआपले रोगाची हकिकत लिहून कळविली असतां माफकदरान त्यांस अभिप्राय मिळेल. औषधें मागविलीं असतां जीं औषधें आह्मी पाठवूं त्यांजबरोबर औषधें घेण्याचे माहितीचा कागद पाठवूं.

वर लिहिलेल्या कित्येक रोगांवरील औषधाचे एका कुपींत पांच मनुष्यांस पुरण्याइतकें औषध असतें.

जुने रोग व ज्या रोगांना बरे करण्यास वेळ लागतो अशा रोगांना पिडलेल्या लोकांस त्यांची मर्जी असेल तर ठराव करूं. ठरावाची जी रकम ठरेल त्यापैकीं कांहीं अगाऊ द्यावी लागेल.

"हा दवाखाना उमरावती येथें भुसार दरवाजा बाहेर मिस्टर प्रल्हाद नारायण जोग वकील यांचे वाड्यांत खालचे दिवाणखान्यांत आहे "

उमरावती मेडिकल हॉल ता० २४-१०-८८

दामोदर काशिनाथ काळे आणि कंपनी.


☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.